
वसंत बागुल

# दायित्व

नाटक



# दायित्व

नाटक

वसंत बागुल

ई साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दायित्व (नाटक)

लेखक : वसंत बागुल

३०२, न्यु शिवम अपार्टमेंट

स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १९ नोव्हेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री वसंत बागुल : एक कलंदर लेखक



वसंत बागुल एक शिक्षक. मालेगावच्या शाळेतले. पण PhD ला हेन्रिक इब्सेन च्या नाटकांचा अभ्यास करायचा म्हणून ते थेट नॉर्वेजिअन भाषा शिकायला नॉर्वेमध्ये पोचले. नोकरी धंदा तात्पुरता सोडून. तिथे राहून, पडतील ती कामं करून तिथली भाषा शिकून त्यांनी इब्सेनच्या मूळ पुस्तकांवरून मराठी अनुवाद केले. मग गेले जपानमध्ये तिथल्या साहित्याचा अभ्यास करायला. नंतर न्युयॉर्क (अमेरिका), बर्मिंगहॅम-लंदन-इंग्लंड- फ़्रॅंकफ़ुर्ट (जर्मनी)  अशी दुनिया फ़िरून तिथल्या भाषा शिकून त्यांनी डझनभर पुस्तकांचे (नॉर्वेजियन, इंग्लिश, अमेरिकन, जपानी) अनुवाद केले. शिवाय हिंदीतल्या हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशालाचा मराठीत छंदानुवाद केला आहे. या शिवाय त्यांची स्वतः लिहीलेली नाटके , एकांकिका, लेख, कविता आहेतच. प्रकाशझोतापासून दूर राहिलेला हा एक मनस्वी कलंदर लेखक. त्यांची डझनभर पुस्तकं आता एक एक करून ई साहित्य मधून वाचकांकडे येतीलच.

आपल्या अभिप्रायांची वाट ते पहात आहेत.

त्यांचा पत्ता

वसंत बागुल, ३०२, न्यु शिवम अपार्टमेंट, स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

आयुष्यभर माझी सावली बनलेल्या

सौ कविता हीस ही नाट्यकृती सप्रेम अर्पण

वसंत बागुल

# दायित्व

# पात्रपरिचय

श्री. महेश दामले : सेवानिवृत्त प्राध्यापक व लेखक

सौ. उमा दामले : त्यांची पत्नी (गृहिणी)

दिनकर : त्यांचा विवाहित मुलगा

कंचन : त्यांची विवाहित मुलगी

निर्मला : त्यांची सून, दिनकरची पत्नी

केदार : दिनकरचा मुलगा

जनार्दन (जॉन) : निर्मलेचा भाऊ

हरजिंदर : जनार्दनचा पंजाबी मित्र

श्री. यशवंत जहागिरदार : वकील, महेश यांचा जुना व जिवलग मित्र

नाटकातील सर्व घटना बंगल्यातच घडतात.

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

ब्रिटिशांच्या काळातील एक छोटेखानी, जुना पण टुमदार बंगला. बंगल्याला दगडी भिंतीचे कुंपण. प्रवेशद्वाराच्या आत उजव्या बाजूस एक डेरेदार आम्रवृक्ष तर डाव्या बाजूस प्राजक्ताचे फुलझाड स्वागतासाठी उभे. कुंपणाच्या आत बंगल्याभोवती गुलाब, मोगरा, जाई, जुई, शेवंती व रातराणीच्या फुलांनी बहरलेले उद्यान. आम्रवृक्षाच्या किंचित पुढे छोटेसे पण छानसे पांढऱ्याशुभ्र संगमरवराचे गणेशाचे मंदिर. आत श्री गणेशाची सिंधुरचर्चित रमणीय बैठी मूर्ती. दारावर मोठी पितळी घंटा जी वाजवल्यावर संपूर्ण बंगल्यात तिचा नाद घुमावा. प्रवेशद्वारापुढे सुंदरसे तुळशी वृंदावन त्यात हिरवीगार व मंजिऱ्यांनी बहरलेली तुळस. संध्याकाळची वेळ असल्याने वृंदावनात दिवा ठेवण्याच्या जागी लावलेला दिवा तेवत आहे.

प्रवेशद्वारातून बंगल्यात प्रवेश करण्यापूर्वी घंटा वाजवून श्री गणेशाला नमन करावे हा शिरस्ता. ही घंटा ऐकून कुणीतरी आल्याची सूचना ऐकून बंगल्याचे दार उघडले जाते. दारावरची बेल वाजवण्याची आवश्यकता नसते.

पडदा वर जातो तेव्हा दिसतो प्रशस्त दिवाणखाना. जुन्या पण किमती शिसवाच्या फर्निचरने सजविलेला. डाव्या बाजूच्या भिंतीत प्रवेशद्वार. उजव्या बाजूच्या भिंतीत महेशच्या अभ्यासिकेकडे व बेडरूमकडे जाणारा दरवाजा व त्याच भिंतीत दिनकर व केदारच्या रूमकडे तसेच किचन व डायनिंग रूमकडे जाणारा दरवाजा.

तक्तपोशीवर गालीचा पसरलेला व त्यावर भिंतीलगत असलेला सोफासेट. सोफ्याच्या मध्यभागी एक टीपॉय, त्यावर फुलदाणी, काही पुस्तके व वर्तमानपत्रे. बाजूला एका कोपऱ्यात छोट्या छोट्या कलापूर्ण वस्तू आणि किमती बांधणी असलेली पुस्तके ठेवलेले काचेचे कपाट. सोफ्यामागील भिंतीला एक लांब प्रशस्त स्लायडिंगची खिडकी, जी उघडल्यावर बंगल्याभोवतालची फुलबाग दिसावी. खिडकीवर पडदे सोडलेले. उजव्या बाजूस एक उंच स्टूल, त्यावर फोन ठेवलेला. भिंतीवर कलापूर्ण पेंटींग्ज आणि तैलचित्रे आणि रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, सरस्वती इ. चे सुंदर फोटो लावलेले.

भाऊबीजेचा दिवस. सायंकाळ. बंगल्याभोवती आणि आत दिव्यांची आरास. सुगंधी आणि मंगल वातावरण. बंगल्याबाहेरील श्रीगणेशाच्या मंदिरातील घंटेचा नाद घुमतो व पाठोपाठ स्त्रीच्या धीरगंभीर आवाजात

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।

निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।

हे गणेशाचे स्तोत्र ऐकू येते. त्यानंतर काही क्षणात किचनमधून उमा येते व दरवाजा उघडते. दारातून औक्षणाचे ताट घेतलेली निर्मला प्रवेश करते. तिने लाल रंगाची पैठणी नेसलेली असून डोक्यावर पदर घेतलेला आहे. तिच्या मागून यशवंत येतो.

निर्मलाः (यशवंतास) या ना काका! बसा. (व ती आत निघून जाते.)

उमाः बसा ना भावोजी; ते असतील अभ्यासिकेत. मी बोलविते त्यांना. (ती अभ्यासिकेच्या दाराजवळ जाते.) अहो, यशवंत भावोजी आलेत. (आतून आवाज येतो... हो हो आलो!)

महेशः (बाहेर येतो. त्याच्या हातात पुस्तक असून डोळ्याला चष्मा आहे. सत्तरीच्या आसपास असून केस रूपेरी व चेहऱ्यावर वार्धक्याच्या खुणा आहेत. थोडा झुकला आहे.) अरे यशवंता? केव्हा आलास?

उमाः (खुर्चीत बसत) आत्ताच आलेत.

महेशः गणपतीची घंटा वाजली तेव्हाच थोडासा अंदाज आला होता. (यशवंतजवळ बसतो.)

यशवंतः (महेशच्या हातातून पुस्तक घेऊन) अरे आज तरी ते पुस्तक बाजूला ठेव. आज भाऊबीज आहे. ठाऊक आहे ना? लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदत नाहीत असं म्हणतात ; आणि आता तर लक्ष्मीचे दिवस! (दुसऱ्या हातातील दोन पार्सले व पुस्तक टीपॉयवर ठेवतो.)

उमाः त्या दोघींना एकत्र नांदायला लावायचा त्यांचा कसोशीने प्रयत्न चालू आहे. (सगळे हसतात.) सारखे पुस्तकात डोके घालून बसतात नाहीतर काहीतरी लिहित तरी बसतात. स्वर्गात गेल्यावर तेथेही पुस्तके वाचत बसतील कुणास ठाऊक?

यशवंतः स्वर्गात पुस्तके असतात?

महेशः स्वर्गात पुस्तके असतात की नाही माहित नाही; पण पुस्तकांत स्वर्ग असतो हे नक्की! पण संस्कारशून्य पुस्तकांत नाही बरं का, तर सत्प्रवृत्ती प्रधान पुस्तकांत. उदा. रामायण, महाभारत, कालिदास, भवभूती, ज्ञानेश्वर, तुकाराम, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद यांच्या अशा कितीतरी संस्कारक्षम ग्रंथांची नावे सांगता येतील.

यशवंतः फारच प्रेम आणि आदर बाबा तुला पुस्तकांबाबत. अरे हो, बरं झालं आठवलं. तू तुझं बाड काढून ठेवलंस का, जाण्यापूर्वी मला देणार होतास ते?

महेशः अरे हो! (टीपॉयच्या खालच्या कप्प्यातून एक निळया रंगाच्या कापडात बांधलेला गठ्ठा देतो.)

उमाः अहो तो गठ्ठा नाही! तो तर तुम्हाला बरोबर न्यायचा ना? त्याच्या बाजूला लाल रंगाच्या कापडात बांधलेला आहे तो.

महेशः (लाल रंगाच्या कापडातील गठ्ठा यशवंतास देत) कवी हरिवंशराय बच्चन यांच्या ‘मधुशाला’ ह्या काव्याचा अनुवाद ‘मदिरालय’ ह्या नावाने करून स्वतःच्या पैशाने प्रकाशित केला होता. हे तुला ठाऊक आहेच. त्याच्या प्रती अध्र्याच्या वर पडून आहेत. त्यामुळे हे लिखाण छापण्याच्या भानगडीत मी पुन्हा पडलो नाही. आता तू.....

यशवंतः होय. माझा एक प्रकाशक मित्र आहे त्याला दाखवून बघतो. बरं तू हे सांग ही किती आणि कोणती पुस्तके तू लिहून ठेवली आहेत?

महेशः ह्यात ना? इब्सेनवरचं लिखाण, त्याच्या दोन नाटकांची भाषांतरे, जपानी व अमेरिकन परीकथांचे अनुवाद व माझी स्वतंत्र कादंबरी 'दायित्व' अशी सहा पुस्तके आहेत. बाकी लेखन चालूच आहे. पण हे बघ यशवंता त्याने छापले नाही तरी चालेल पण हस्तलिखिते गहाळ व्हायला नकोत.

उमाः खरंच भावोजी, ह्यांनी खूप परिश्रम घेतलेत, प्रसंगी तहानभूकही विसरलेत हे लिहिताना.

यशवंतः काहीही काळजी करू नका वहिनी, अगदी पाताळात जरी कोणी चोरून घेऊन गेलं तरी तुकारामबुवांच्या गाथेसारखं वर आणील. (सगळे हसतात.)

महेशः दिवसरात्र हेच करीत बसतो मी. नोकरी करताना मनसोक्त वेळ मिळाला नव्हता. आता सेवानिवृत्त झाल्यावर साहित्याची यथेच्छ सेवा करता येतेय. पण आता पूर्वीसारखा स्टॅमिना नाही राहिला.

यशवंतः तुला कंटाळा येत नाही का रे?

महेशः तुला येतो? तू वकिल... तुझ्याकडे इंटरेस्टिंग केसेस येत असतील नाही?

यशवंतः कधी कधी! बाकी सारं रटाळ, निरस. तू कसा कथा कादंबरी, नाटक आणि काव्याच्या रम्य, काल्पनिक जगात रमणारा स्वच्छंदी माणूस! नाचू गाऊ शकणारा. माझं तसं नाही. प्रॅक्टिकल सारं..... कुणाच्या डोळयातलं पाणी किंवा कुणाच्या तोंडावरचं हसू बघून भूलून जायचं नसतं, तर हृदयावर दगड, डोळयांवर काळी पट्टी बांधून समतोल, निष्पक्ष निवाडा द्यायचा असतो न्यायदेवतेप्रमाणे.

उमाः मी निर्मलेला चहा टाकायला सांगते. (असे म्हणून ती किचनकडे निघून जाते.)

महेशः बरं आत्ता कुठली केस आली आहे?

यशवंतः आत्ता ना?... सांगतो. एक वृद्ध गृहस्थ आले होते, माझ्या थोड्या परिचयाचे आहेत. ते कुणावर केस करणार आहेत ठाऊक आहे?

महेशः (उत्कंठेने) कुणावर?

यशवंतः स्वतःच्या एकुलत्या एक मुलावर!

महेशः (आश्चर्याने) काय म्हणतोस काय?

यशवंतः होय रे बाबा. मलाही आश्चर्य वाटलं होतं आधी. पण जेव्हा मी त्यांची बाजू नीट ऐकून घेतली तेव्हा मलाही ते बरोबर वाटलं!

महेशः काय होतं त्याचं म्हणणं?

यशवंतः तो एका श्रीमंत माणसाकडे ४०/४५ वर्षांपासून ड्रायव्हर होता. आता साठी उलटून गेल्यामुळे दृष्टीही कमी झाली होती आणि इतकी वर्षे ड्रायव्हिंग केल्यामुळे गुडघेदुखीचाही आजार लागला होता. मालकाचा त्याच्यावर जीव होता पण तो मेल्यावर मालकाच्या मुलांनी त्याला कामावरून काढून टाकले. दरम्यानच्या काळात त्याच्या बायकोला कॅन्सर झाला होता, त्यात त्याने त्याच्याजवळ होता नव्हता सारा पैसा खर्च करून टाकला; पण तरीही ती वाचली नाही. त्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर ठेवून निघून गेली. एकुलता एक मुलगा आहे त्याला. नुकतेच त्याचे लग्न झाले. गुडघेदुखीमुळे म्हातारा सतत घरात पडून. सुनेला त्याचा त्रास होतोय. राजा राणीच्या संसारात एकांत नाही, म्हणून दोघा नवराबायकोनी त्याला घराबाहेर काढून टाकायचा व त्याची वृद्धाश्रमात रवानगी करण्याचा कट रचला.

महेशः मग, म्हाताऱ्याला अटॅक नाही आला हे कळून?

यशवंतः अटॅक कसला येतो त्याला? इतका वृद्ध झाला, गात्रे शिथिल झाली तरी मेंदू पक्का आणि हृदय भक्कम! म्हणून तर बायको गेली, आयुष्यातली इतक्या वर्षांची सोबत गेली पण म्हातारा डगमगला नाही!

उमाः (फराळाचे आणून टीपॉयवर ठेवीत) काय भावोजी अशीही असतात मुलं?

महेशः आमच्याकडून नसतं झालं एवढं सहन! वादळातल्या जीर्ण वृक्षासारखी उन्मळून पडलो असतो आम्ही, होय ना उमा?

उमाः अहो कशाला अभद्र बोलता? आपल्यावर असला प्रसंगच येणार नाही मुळी!

महेशः खरं आहे तुझं! आपली मुलं इतकी निष्ठुर नाहीत.

यशवंतः घर म्हाताऱ्याच्या मालकीचे म्हणून, 'त्यांच्याकडून माझे होत नसेल व मी त्यांना जड झालो असेन तर त्यांनी भाड्याचे घर पहावे' असे त्या म्हाताऱ्याचे म्हणणे.

महेशः मग तू काय सांगितलंस? काय निर्वाळा दिला?

यशवंतः काय सांगणार? म्हाताऱ्याची बाजू पटली. कोर्टात केस जाण्यापूर्वी दोघात समझोता घालावा, मुलाला सुनेला दोन शब्द सांगावे असे वाटते. बघुया किती ऐकतात ते.

महेशः (डिश पुढे करीत) अरे हे फराळाचे घे ना! आजकाल ऐकावं ते नवलच.

उमाः प्रेम, माया, वात्सल्य आणि वडिलधाऱ्यांबद्दल आदर ह्या गोष्टी आता हळूहळू नाहीशा व्हायला लागल्यात.

महेशः ही दोन पिढ्यांमधील जनरेशन गॅप इतकी वाढत चालली की..... !

यशवंतः हा साऱ्या पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव!

महेशः प्रत्येक संस्कृतीत चांगलेच गुण असतात. चालीरिती, रूढी परंपरा, हवामान ह्यात देशपरत्वे भिन्नता असते आणि गुणदोषही असतात. पण मूर्ख लोक वाईट तेवढं उचलतात. दुधात पाणी असले तर त्यात दुधाचा दोष नाही, सोने अशुद्ध असले तर त्यात सोन्याचा दोष नाही. पण योग्य- अयोग्य ठरविण्याची कुवतच नाही- सारासार विचारच नाही. पाश्चात्त्य संस्कृतीत काही उणेपणा असता तर तेथे मोठे मोठे शास्त्रज्ञ, तत्ववेत्ते आणि साहित्यिक झालेच नसते.

(निर्मला चहा व पाणी घेऊन येते व ते टीपॉयवर ठेवून “नमस्कार करते” म्हणत, वाकून पायावर डोके ठेवून सर्वांना नमस्कार करते, आणि आत जाते.)

यशवंतः याला म्हणतात संस्कृती, चांगले संस्कार आणि वडिलधाऱ्यांचा आदर! (उमेकडे बघत) नाही वहिनी? दोन्ही हात आणि तिसरे मस्तक पायावर ठेवणे याला म्हणतात नमस्कार आणि तो फुकटही जात नाही. ज्याच्या पायावर डोके ठेवणार त्याचे पुण्य पाया पडणाऱ्यांना मिळते. पण असे भाग्यवान विरळेच! नाही तर मी काही नमस्काराचे प्रकार पाहिलेत हो! आपलं थोडसं अर्ध वाकायचं डोके तर राहू द्याच पण हात सुद्धा चवरीसारखे दोन फुटांवरून झाडतात, जणू काही पायाला स्पर्श केला तर काही स्पर्शजन्य आजार होईल अशी भीतीच वाटत असावी त्यांना.

महेशः ह्या बाबतीत आम्हीही भाग्यवान आणि आमची सूनही भाग्यवान!!

उमाः खरंच भावोजी, आमची सून निर्मला जशी रूपवान तशीच गुणवान. अंतःकरणानंही तशीच कोमल.

महेशः सर्वगुणसंपन्न, सुविद्दय, शालीन, नम्र आणि विशेष म्हणजे सासू-सासऱ्यांच्या आणि पतीच्या आज्ञेत वागणारी.

यशवंतः आणि लाजाळू किती? लाजाळूचं झाडच म्हणाना!

उमाः अगदी खरं भावोजी. दिनूला पुष्कळ मुली सांगून आल्या होत्या. अगदी करोडपतींच्या सुद्धा, आमच्या बंगल्याला पाहून!

महेशः पण आम्हाला गरीबाघरची का असेना पण सुस्वभावी, सुसंस्कारित, सुशील आणि सोज्वळ मुलगी हवी होती.

उमाः आणि त्यात आमचा थोडा स्वार्थही होता, सासू-सासऱ्यांना सांभाळून घेणारी हवी- असा!

यशवंतः आणि तुमच्या अपेक्षेप्रमाणे सर्वगुणसंपन्न सून तुम्हाला मिळाली, बावनकशी सोनं!

महेशः पण त्यासाठी आम्हाला खूपच प्रतिक्षा करावी लागली. खूप पारखून घ्यावे लागले!

यशवंतः तेव्हा कुठे हे रत्न तुमच्या हाती लागले, होय ना?

उमाः अगदी बरोबर! आम्हाला जशी हवी होती तशी मुलगी आम्हाला सून म्हणून मिळाली. तिचे आईवडिल अतिशय गरीब.

महेशः स्वभावानेही आणि परिस्थितीनेही!

यशवंतः म्हणजे?

उमाः वडिल शाळा मास्तर, आई शिवणकाम करायची. चाळीत राहतात.

महेशः स्वभावाने अगदी सोज्वळ, सात्विक वृत्तीची, साधी माणसं! देवभोळी.!!

उमाः दोघेही हात जोडून म्हणायची, "आमची ही एकुलती एक मुलगी. फक्त एवढंच धन आमच्याजवळ आहे, ते तुमच्या स्वाधीन करतो. ह्या व्यतिरिक्त आमच्याजवळ कपर्दिकही नाही." पण तिची आई म्हणाली होती, "नाही कसं? माझ्या लग्नाच्या वेळी माझ्या सासूबाईंनी दिलेले दागिने आहेत ना! अगदी जीवापाड सांभाळून ठेवलेत. प्रसंगी उपाशी राहिलोत पण त्या दागिन्यांना हात लावला नाही. तेवढे दागिने आहेत आमच्याजवळ तिची पाठवणी करताना तिच्या अंगावर घालण्यासाठी."

यशवंतः तेच ना? तुमच्या घरातल्या नोकरांनी त्या बिहारी जोडप्याने चोरून नेले होते?

महेशः होय, तेच दागिने, सोबत घरातले दागिने आणि रोकडही!

उमाः तुमच्या मदतीने परत मिळालेत! तिच्या गरीब आईबापाचे व आमचेही कष्टाचे होते म्हणून परत मिळालेत. आम्ही त्यांना म्हणालो देवाच्या कृपेने सारं काही आहे आमच्याजवळ! आम्हाला आमच्या साऱ्या अपेक्षा

पूर्ण करणारी मनासारखी मुलगी मिळाली. बस्स, आम्हला एवढेच हवे होते.

महेशः मुलीचा बाप म्हणायचा, “आमची गरीबाघरची चाळीत राहणारी पोर, थोरामोठ्यांची सून होणार, बंगल्यात राहणार ह्या परते अजून काय हवे असणार आम्हाला?”

उमाः आणि विशेष म्हणजे दिनूलाही मुलगी पसंत होती आणि तिलाही दिनू.

यशवंतः (उमेस) वहिनी मी निर्मलास कित्येक वर्षांपासून बघतोय. ती तर गुणी आहेच ; पण तुम्हीही तिला कधी सासूपणा दाखविला नाही. किंबहुना सासुरवास म्हणजे काय हे तिला जाणवू दिलेच नाही.

उमाः भावोजी यांच्या आणि माझ्या स्वभावातच तसे नाही. आणि त्यात निर्मलाचे आईवडील लग्न लागल्यानंतर पाठवणीच्या वेळी डोळयात पाणी आणून सद्गदित अंतःकरणाने म्हणाले होते, “हा आमच्या काळजाचा तुकडा तुमच्या हवाली करीत आहोत. आता तुम्हीच तिचे आईबाप; आत्तापर्यंत आम्ही तिला खूप जीव लावला. तळहातावरच्या फोडासारखं जपलं. आम्ही तिला चांगले संस्कार दिलेत, चांगलं शिक्षण दिलं. त्यामुळे ती तुमचा आदर करील; तुमच्या आज्ञेबाहेर जाणार नाही. आईबापासारखी तुमची काळजी घेईल याची ग्वाही देतो.”

महेशः आणि खरंच बरं का यशवंता नवऱ्याची व मुलाची तर काळजी घेतेच पण आमचीही काळजी घेते. वयोमानाप्रमाणे आम्हालाही आता लहान

मोठ्या व्याधींनी पछाडायला सुरूवात केली आहे. उमाला डायबेटीस व ब्लड प्रेशर आहे. मला तर हृदयाचे विकार आहेतच पण गुडघे तर पार कामातून गेलेत. दोन पावलं चालायला नखरे करतात बेटे! कधी कधी अशी जीवघेणी ठणक लागते की विचारू नकोस त्यात उमेला राजयक्ष्मा-क्षय. पण तिच्या दक्षतेमुळे, काटेकोर आणि नियमित सुश्रुषेमुळे व्याधींना जास्त छळायला अवधी मिळत नाही. उमा लपवत राहिली; आता तो आजार बळावला व डॉ. चा सल्ला मानणं भाग पडलं!

बरं तू तिकिटे आणि पासपोर्ट्स आणलेत?

यशवंतः अरे हो (एक छोटीशी बॅग त्याच्या हातात देतो.) हे घे. वहिनीचे आणि तुझे असे दोन पासपोर्ट व तिकिटे आहेत; विमानाची! मुंबई ते भागदोगरा. भागदोगरा विमानतळावर उतरल्यावर सिलिगुडीला न्यायला तेथील सॅनिटोरियमची बस येईल तुम्हाला घ्यायला. तेथे पोहोचल्यावर तेथील सॅनिटोरियमचे संचालक देवेंद्र मुखर्जी यांना भेटा. ते माझे मित्रच आहेत. त्यांच्याकडूनच सॅनिटोरियममध्ये सहा महिन्यांच्या वास्तव्याचे ऍडव्हान्स बुकिंग केलेले आहे. ह्या बॅगेत त्यासंदर्भात सर्व कागदपत्रे आहेत. आज रात्री दहा वाजताची फ्लाईट आहे. २/३ तास आधी निघा.

महेशः आधी माझे बायपास आणि त्यानंतर..... उमेचं हे असं.

उमाः आजारांचा ससेमिराच लागलाय आमच्या पाठीशी. पण होईल सुटका त्यातून आम्ही भाग्यवान तसेच पुण्यवानही आहोत.

यशवंतः आता तुझं हृदयविकाराचं बरं आहे ना? औषधं घेतोस ना वेळेवर?

महेशः होय बाबा! निर्मलाच बघत होती सारं. आता तेथे मलाच बघावं लागेल माझं आणि उमेचं सुद्धा!

यशवंतः तुझं बायपास झालं तेव्हा नव्हतो मी येथे. म्हणजे नेमकं काय झालं होतं तुला?

महेशः मी हॉलमध्येच- येथेच वाचत बसलो होतो. अचानक छातीतून तीव्र कळा येऊ लागल्या, मी जोरात उमा SS अशी हाक मारली. पण घरात निर्मलेशिवाय कुणीही नव्हतं. ती किचनमधून धावतच आली. तिला मी सांगितलं,... "माझं हृदय पिळवटून निघत आहे"... डॉ. ना फोन कर... तिने रिक्षावाल्याला फोन केला... मला दरदरून घाम फुटला होता, श्वास घ्यायला खूप प्रयास पडत होते... रिक्षा आल्यावर तिने रिक्षावाल्याच्या मदतीने मला रिक्षात बसविले व डायरेक्ट हृदयरोगतज्ज्ञ डॉ. देशपांडेंच्या क्लिनिकमध्ये नेले. तेथे त्यांनी ताबडतोब कार्डिओग्राम काढला, इंजेक्शन दिले... मला थोडे बरे वाटले. तो एक मोठा अटॅक होता असे निदान झाले.

उमाः मला कळल्यावर मी ताबडतोब हॉस्पिटल गाठले. मी खूप घाबरले होते. यांच्या तोंडाला ऑक्सिजन लावलेला होता... मी डॉ.ना भेटले तेव्हा ते म्हणाले, "बाई घाबरू नका-धोका टळला. पण अजून पाच मिनिटे उशीर झाला असता तर सांगता येत नाही काय झाले असते ते..." निर्मलाकडे पाहून डॉ. म्हणाले, "ह्या बाई कोण?" तेव्हा मी म्हणाले, "ही माझी सून निर्मला," तेव्हा डॉ. म्हणाले, "ताई तुम्ही फार

भाग्यवान आहात, तुम्हाला अशी सून मिळाली आहे. तुमच्या सुनेने प्रसंगावधान दाखविले म्हणून तुमचे मिस्टर वाचले."

महेशः त्यानंतर आठवडाभरातच माझी बायपास सर्जरी झाली व काही दिवसांनी मला घरी आणण्यात आले. डॉ. नी लिहून दिलेले प्रिस्क्रिप्शन नीट वाचून त्याप्रमाणे वेळेवर गोळया औषधे तीच नियमितपणे द्यायची. एवढेच नव्हे तर प्रिकॉशन घेऊन पथ्यपाणीही तिनेच सांभाळले. म्हणून बायपास होऊन ४/५ वर्षे झाली तरी माझी प्रकृती ठणठणीत आहे.... ती निर्मलामुळेच.

यशवंतः बरोबर आहे बाबा तुझं! घरातल्या घरात सुश्रुषा करणारी नर्स म्हणून सूनबाई असेल तर तुला डॉ.ची गरजच कशाला?

उमाः अहो भावोजी ती एवढ्यावरच थांबली नाही तर हृदयरोगावरची आणि आरोग्यविषयक पुस्तके मागवून त्यांचा अभ्यास करून दैनंदिन आहार कोणता असावा त्याप्रमाणे यांच्यासाठी वेगळं जेवण बनवते.

महेशः सात्विक गुण तिच्यात खूप आहेत. त्यामुळे नावाप्रमाणेच ती निर्मळ आहे. आणि ह्या गुणांच्या जोडीला तिची देवावर भक्ती आहे, श्रद्धा आहे! धर्मनिष्ठ, धर्मपत्नी, साक्षात् अनुपम लक्ष्मी आहे.

उमाः आम्हा सर्वांच्या आधी पहाटे उठेल आणि शुचिर्भूत होऊन गणेश मंदिराकडे जाईल. आजूबाजूचा पाचोळा झाडून परिसर स्वच्छ करील. दिवा लावील, श्री गणेशाला दुर्वा फुले वाहिल, चंदन धुपाने केलेला घमघमाट साऱ्या बंगल्यात पसरतो आणि नंदादीपाने लखलखलेलं मंदिर खिडकीतूनही उजळलेलं दिसतं. गणपती स्तोत्र म्हणेल, घंटा

वाजवील. त्या आवाजाने मात्र आम्ही सर्व सोडून हेच उठतात. मग दिनू आणि केदारचा डबा करील. त्यांना उठवून त्यांची तयारी करून, सर्वांना नाष्टा देईल.

महेशः देवावर तिची खूप श्रद्धा, गीता वाचते रोज आणि व्रतवैकल्ये चालूच असतात नेहमी!

उमाः आईवडिलांनी केलेले संस्कार जोपासले तिने आणि त्याचा चांगला परिणाम बंगल्यातल्या साऱ्यांवर झाला.

यशवंतः पण तो तिचा भाऊ?

उमाः तो जन्या ना? तोच तेवढा दिवटा निघाला.

यशवंतः अरे हो, तो अमेरिकेला आहे ना?

महेशः हो. तिकडेच आहे आणि तिकडे गेला म्हणून बरे झाले. नाहीतर नसती ब्याद लागून गेली असती आमच्या मागे! (यशवंताकडे व त्याने आणलेल्या पॅकेट्सकडे बघून) अरे यशवंता हे काय आहे?

यशवंतः (आठवून) अरे हो! बोलण्याच्या भरात विसरलोच! (पॅकेट्स उचलून) ही एक पैठणी वहिनींसाठी आणि दुसरी निर्मलासाठी! आणि तुला ही शाल! चला वहिनी ओवाळून घ्या! ! आज भाऊबीज ना? (पार्सल उघडून दाखवितो.)

उमाः ओवाळते मी, पण एवढ्या भारी किंमतीच्या पैठण्या आणायची काही आवश्यकता होती का?

महेशः दिनकर आणि केदार कसे आले नाहीत अजून?

यशवंतः अरे हो कोठे गेलेत ते?

महेशः ते आमच्यासाठी स्वेटर्स, मफलर, शाली वगैरे कपडे आणायला. थंडी आहे ना तिकडे खूप.

यशवंतः होय, दार्जिलिंगच्या जवळच आहे ते.

महेशः दिनकर खूप काळजी घेतो आमची! आमचं हे असं त्याला सोडून जाणं त्याला आवडत नव्हतं. खूप नाराज आहे पण काय करणार प्रकृतीपुढे?

उमाः काय सांगू भावोजी लहानपणापासून फार लाडका तो ह्यांचा! तो लहान असताना त्याला थोडं जरी काही झालं तरी हे लगेच डॉ. ना बोलवायचे. ह्यांचं निम्मं कपाट यांच्या पुस्तकांनी निम्मं कपाट त्याच्या औषधांच्या, टॉनिकच्या बाटल्यांनी भरलेलं असायचं.

महेशः लहानपणी मी त्याला जेऊ घालायचो तेव्हा पहिला घास तो मला भरवायचा!

उमाः आताही घरी असला की ह्यांच्याशिवाय जेवत नाही व हेही त्याच्याशिवाय.

महेशः कांचन नेहमी फुरंगटून बसायची... म्हणायची तुमचा दिनूवरच जास्त जीव! तुम्हाला दिनूच जास्त आवडतो.

यशवंतः वहिनी निर्मलाला बोलवा ना, तीही ओवाळून घेईल. (उमा निर्मलास बोलविते.)

उमाः अगं औक्षणाचं ताट आण. यशवंत भावोजींना ओवाळून घेऊ. (ती आत जाते.)

यशवंतः इतकं सुंदर आणि आनंदाने पूर्ण भरलेलं घर क्वचितच बघायला मिळतं महेश!

महेशः घर? अरे स्वर्ग म्हटले तरी चालेल. घरात ही पाखरांची किलबिल, आणि सभोवती नंदनवन. आम्रवृक्षावर कोकिळा गाते. रात्री रातराणीचा सुगंध दरवळतो तर दिवसा पारिजात सुगंध उधळायला सुरूवात करतो. मग गुलाब, जाई, जुई, मोगरा आणि चाफा!

उमाः आमच्या घरात आनंदाचा नंदादीप नित्य घर उजळीत राहतो. (तेवढ्यात निर्मला येते. तिच्या हातात औक्षणाचं ताट असतं व त्यात निरांजन तेवत असते.) आणि घरात ह्या गृहलक्ष्मीचा निवास! (निर्मला लाजतच औक्षणाचं ताट उमेजवळ देते व आत जायला निघते...तिला थांबवून) अगं थांब! माझं ओवाळून झालं भावोजींना की मग तू ओवाळ. (ती थांबते. उमा यशवंतास ओवाळते व त्यानंतर निर्मला ओवाळते.) त्यात ह्यांचा दानधर्मात हातखंडा. गावाबाहेर स्वतःच्या पैशांनी गणेश मंदिर बांधलं!

यशवंतः (दोघींना पैठणी देत) ह्या घ्या दोघींना पैठण्या! भाऊबीजेची ओवाळणी.

निर्मलाः (पैठणी घेते व सर्वांच्या पाया पडते व उमा आणि यशवंताकडे काहीशा संकोचाने बघून महेशला म्हणते) बाबा!

महेशः (तिचा कावरा बावरा चेहरा बघून) काय बेटा? बोल ना!

निर्मलाः (सगळं धैर्य एकवटून) बाबा मला तुम्हाला एक विनंती करायची आहे... नाही.. म्हणजे मला तुमच्याकडे काही मागायचं आहे.

महेशः (यशवंत आणि उमेकडे बघून) काय? माग ना बेटा. काय हवंय तुला? आणि एवढा संकोच का?

निर्मलाः (विनवणीच्या सुरात) अगोदर मला वचन द्या!

महेशः काय?

निर्मलाः नाही म्हणणार नाहीत असं!

महेशः (यशवंत आणि उमेकडे बघून) तुला जे काही हवं ते माग बेटा. मी नाही म्हणणार नाही. निदान ह्या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर तरी!

निर्मलाः (सर्वांकडे बघत, हळूच) बाबा...नाही म्हणजे दोन दिवसांपूर्वी मला फोन आला होता.

उमाः फोन? आणि कुणाचा गं?

निर्मलाः माझ्या भावाचा! जानूचा.

उमाः कोण?... तो जन्या त्या नालायकाचा तुला अधून मधून फोन येत असतो हे कळलंय मला.

निर्मलाः होय... तो नालायक होता... पण आता त्याच्या स्वभावात खूपच फरक पडलाय... आता तो चांगला झालाय, सुधारलाय तो!

उमाः पण नेहमी त्याचे फोन येतात तुला तेव्हा सांगत नाही

आणि आजच सांगायचं कारण?

यशवंतः तो न्यूयॉर्कला आहे ना? अमेरिकेत?

निर्मलाः होय! पण तो येतोय इथे परत!

महेशः पण त्याला तिथलं ग्रीन कार्ड मिळालं असं कळलं मला!

निर्मलाः होय पण तो फक्त तीनचार महिन्यांसाठीच येतोय. मला आणि आपल्या सर्वांना भेटायला.

यशवंतः म्हणजे त्याच्या आईवडिलांना भेटणार नाही तो?

निर्मलाः (शरमेने) नाही! माझ्या आईवडिलांनी त्याला मनाई केली आहे.

महेशः का?

निर्मलाः बाबा, तुम्हाला सारे ठाऊक आहे.

महेशः होय, खरंच मी तर माझ्या घराची पायरीही चढू द्यायचा  नाही त्याला!

निर्मलाः बाबा! (उमेकडे बघून) आई! खरं तर तो येथेच येतो आहे आपल्या घरी! (महेश, उमा आणि यशवंत एकमेकांकडे बघतात.) नाही म्हणू नका! हीच विनंती आणि मागणी आहे माझी.

उमाः हे बघ निमू, तो पूर्वी आई बापाशी भांडला व त्याला त्यांनी घराबाहेर काढले होते. तेव्हा आम्ही त्याला आश्रय दिला होता. त्याला सहकारी पतपेढीत नोकरी लावून दिली होती... तेथेही त्याने पैसे खाल्ले... आणि गजाआड

झाला होता तेव्हा (यशवंताकडे बघून) बरं का भावोजी ह्यांनी त्याला पैसे भरून सोडविले.

महेशः तुझ्यावरील मायेपोटी आम्ही त्याची ही थेरं सहन केलीत. नंतर तर त्याने कडीच केली, खाल्ल्या घरचे वासे मोजले!

उमाः कंचनला भुरळ पाडली!

निर्मलाः पण कंचनताईंचंही त्याच्यावर...!

उमाः (रागाने) गप्प बस! तुला काय वाटलं होतं, अशा लुच्च्या, लफंग्याच्या गळयात माझी सोन्यासारखी पोर बांधली असती आम्ही?

महेशः उमा, जाऊ दे ना तो विषय आत्ता कशाला?

निर्मलाः तेच म्हणते मी! कंचनताईंचं लग्न झालं! त्या सासरी सुखात नांदताहेत! (हात जोडून) बाबा, आई, विसरून जा हो मागच्या साऱ्या गोष्टी! येऊ द्या हो त्याला! पाठचा भाऊ आहे माझा! राहिल ३/४ महिने. त्याला माझ्याशिवाय कुणीही नाही हो! त्याच्यासाठी मी तुमची क्षमा मागते! याचना करते मी तुमची, आई, बाबा! (पाया पडते दोघांच्या.) पाया पडते मी तुमच्या! (पदराने डोळे पुसते.) नाही म्हणू नका हो!

महेशः निर्मला, तुझं हे बंधुप्रेम ठीक आहे. पण येथे आल्यावर त्याने गुण उधळायला नकोत.

निर्मलाः ती जबाबदारी माझी! तो तसं करणार नाही याची ग्वाही देते मी!

महेशः मग ठीक आहे.

उमाः (वैतागून) काय डोंबलाचं ठीक आहे?

महेशः अगं येऊ दे! ह्या निर्मलेकडे बघावं लागतंय. आणि किती दिवस राहणार आहे तो येथे? आणि आपणही आता चाललोत ना ४/६ महिने? कुठं त्याचं तोंड बघणार आहोत आपण रोज?

उमाः ठीक आहे! तुमची मर्जी. पण दिनकरला ठाऊक आहे का हे सगळं प्रकरण?

निर्मलाः होय, त्यांनी होकार दिला म्हणून तर! पण तुमचं मन वळविण्याची जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली.

उमाः (आश्चर्याने) अगंबाई! म्हणजे हे आधीच सारं काही शिजून गेलेलं आहे तर!

महेशः अगं जाऊ दे! आहे ना दोघा नवराबायकोंची इच्छा!

निर्मलाः आणि बाबा! खूप बदललाय तो आता! नेहमी मला फोन करून चौकशी करतो, “आई कशा आहेत? बाबा कसे आहेत? आमचे मेव्हणे काय म्हणतात? केदार अभ्यास करतोय ना नीट? प्रत्येकासाठी मी काही ना काही वस्तू घेऊन ठेवल्या आहेत. येईन तेव्हा सरप्राईज देईन इ. इ. ”

उमाः ठीक आहे... ठीक आहे. तू आत जा व थोडा चहा टाक! डोकं ठणकायला माझं (निर्मला खूष होऊन आत जाते, यशवंतास) काय करावं भावोजी सांगा तुम्ही आता.

महेशः ह्या पोरीला नाहीही म्हणवत नाही आणि त्याचं इथे येणं मला मुळीच आवडत नाही!

यशवंतः तुम्ही काही काळजी करू नका. लक्ष राहिल माझं!

उमाः भरल्या घराला कुणाची दृष्ट ना लागो म्हणजे झालं!

महेशः उमा, दिनू आणि केदार कसे आले नाहीत अजून?

उमाः अहो पण ऐकलंत का?

महेशः काय?

उमाः अहो माझा डावा डोळा उडतोय, काही अरिष्ट तर नाही ना येणार?

महेशः छे! काय वेडी आहेस तू? अरिष्ट कोठून येणार? (तेवढ्यात दारावरची बेल तीनदा वाजते.)

उमाः कोण असेल? गणपतीची घंटा वाजली नाही. कोण असेल हा? गणेशाचे दर्शन न घेता घराचे नियम मोडून येणारा उपटसुंभ? (उमा दरवाजा उघडते. जनार्दन प्रवेश करतो. त्याच्या हातात दोन हॅंडबॅग्ज असतात. त्याचे डोक्यावरचे केस वाढलेले असून त्यांना रबर लावलेले आहे. फ्रेंचकट दाढी असून गॉगल कपाळावर ठेवलेला आहे. त्याने जीन्स पॅंट व टी शर्ट घातलेला आहे. एका कानात बाळी आहे. एकंदरीत स्वारी एअरपोर्ट वरून सरळ घरी आलेली दिसते. अचानक जोराचा सुसाट वारा सुटतो. खिडक्यांचे दरवाजे एकमेकांवर आपटून आवाज येतो. तेवढ्यात लाईट जाते. जनार्दन मोठ्याने म्हणतो, “धिस इज इनक्रेडिबल

इंडिया! ओ प्लिज पुट ऑन द लाईट!" तेवढ्यात लाईट येते. घाबरून म्हणतो, हाऊ स्केअर आय ऍम! ओ माय सिस्टर व्हॉट इज धिस ऑल? ओ गॉड! रेन धिस टाईम? आय ऍम कम्प्लिटली वेट! धिस इज रिडिक्युलस...(उमेकडे बघून) गुड इव्हिनिंग, सॉरी नमस्कार आई... आमची सिस्टर... बहना कोठे आहे? (बाहेरची गडबड ऐकून निर्मला घाईने बाहेर येते... तिच्याकडे बघून,) ओ... देअर यू... आर! ओ माय सिस्टर आय मिन ताई."

निर्मलाः अरे दादा! तू? आणि असा अचानक?

जनार्दनः सरप्राईझ! आय हॅव अ हॅबिट टू गिव्ह सरप्राईझ! (बाहेर उभ्या असलेल्या ड्रायव्हरला) हाऊ मच? (निर्मलेला) जस्ट अ मिनिट! व्हॉट? थ्री थावझंट? आय डोंट हॅव चेंज! आय मिन आय डोंट हॅव इंडियन रूपीज. ओ बहना, प्लिज गिव्ह थ्री थावझंट रूपीज. (निर्मला आत जाऊन पैसे घेऊन येते व जनार्दनला देते. बाहेर उभ्या असलेल्या ड्रायव्हरला देतो.) व्हॉट? यू डोंट हॅव चेंज? ओके. ब्रिंग द लगेज इनसाईड. टीप?... ओके. कीप द चेंज ऍज अ टीप! (सर्व बॅगा आत घेतो व ड्रायव्हरला पैसे देतो. त्याचा हात बघून...) व्हॉट अ डर्टी हँड! कीप युवर हँड्स क्लिन... टेक. द टीप इज इन्क्लुडेड इन!

निर्मलाः (आश्चर्याने) एवढ्या सर्व बॅगा, दादा?

जनार्दनः फॉर यू माय डियर सिस्टर, फॉर यू! (सर्वांकडे लक्ष जाऊन) फॉर ऑल ऑफ यू!... (उमज पडून... सावंत आणि महेशकडे बघून) ओऽ आय ऍम सॉरी (शेकहॅंड करायला जातो पण एकदम लक्षात येऊन ओशाळून त्यांच्या पाया पडतो.) फर्स्ट आय डिड नॉट सी यू फॉर डॅम डार्कनेस! (निर्मलाकडे बघून) एनी वे व्हेअर इज माय नेफ्यू? माय डियर केदार? माय चिकन् अँड माय ब्रदर इन लॉ? दिनू?

निर्मलाः (वरमून) ते गेलेत बाहेर, बाजार करायला आई बाबांसाठी... ते बाहेर चाललेत ना!

जनार्दनः व्हेरी गुड... (ओशाळून) आय मिन... व्हाय? व्हेअर अँड हाऊ लॉंग?

निर्मलाः आईंची तब्येत बरी नाही म्हणून ते सिलिगुडीला चाललेत सॅनिटोरियममध्ये ४/६ महिन्यांसाठी! (उमा तिच्याकडे रागाने बघते तिच्या बाबतीत हे सांगितलेले तिला आवडलेले नसते.)

जनार्दनः ओ आय सी! बट... (निर्मला त्याला पुढे बोलू देत नाही.)

निर्मलाः चल दादा बॅगा आत ठेव!

जनार्दनः ओके, आय ऍम व्हेरी व्हेरी टायर्ड अँड वेट विथ स्वेट अँड रेन. (निर्मला दोन बॅगा घेते व त्याला मागून येण्यासाठी खुणावते. तो हातात बॅगा घेतो व सर्वांकडे पाहून) आय विल बी राईट बॅक! (तो बॅगा घेऊन निर्मलाच्या मागे जातो.)

(ह्या प्रसंगाने आत्तापर्यंत स्तंभित झालेले महेश, यशवंत व उमा एकमेकांकडे बघतात व हसतात.)

उमाः (यशवंतकडे बघून) बघितलात भावोजी हा प्रकार? हे कार्टून? देव जाणे कुठल्या नक्षत्रावर जन्माला आलं हे! आईबाप किती सोज्वळ! ह्या निर्मलेचा भाऊ शोभतो का हा?

महेशः (तिला शांत करीत) अगं हो... पण काय करणार? निर्मलेच्या मर्जीखातर करावे लागले रे... नाही तर...

यशवंतः (दोघांना) तुम्ही असा त्रागा करून घेऊ नका वहिनी आणि महेश!

उमाः का त्रागा करून घेऊ नको भावोजी? सर्वात आधी म्हणजे आमच्या गणेशाला नमन न करता आला तो आत! हा पहिलाच असा माणूस आहे की जो आमच्या देवाचं दर्शन न घेता आत आला. तो बदमाश आत आल्याबरोबर अंधार पसरला साऱ्या बंगल्यात! वावटळ सुटली! अकाली पाऊस आला. हे दुश्चिन्ह, अशुभसूचक अपशकून नाही तर काय?

महेशः जाऊ दे! अचानक वीज गेली, त्याला तो काय करणार?

उमाः तुमचा नाही विश्वास. पण माझा आहे. काही शुभाशुभ घडणार असेल तर आसमंतही शुभाशुभ लक्षणांनी भाकित करतो.

यशवंतः महेश, वहिनी म्हणतात त्यात काही तथ्य असेल बरं का!

महेशः देव जाणे! (निर्मला येते.)

निर्मलाः तो कपडे बदलतोय, ओलाचिंब झाला होता पावसात.

उमाः हो, ते ठिक आहे, पण त्याला थांबायला कुठली रूम दिलीस तू?

निर्मलाः केदारची!

महेशः (आश्चर्याने व काहीशा नाखुषीने) काय? केदारची? अगं निर्मला त्याने आधीच एक पराक्रम केला आहे आता त्यात ह्याची सोबत, म्हणजे बिघडायचाच तो पुरता!

निर्मलाः माझा भाऊ आता सुधारलाय. तो काही केदारला बिघडवणार नाही. आणि आम्ही आहोत ना केदारची काळजी घ्यायला! (ती आत जाते.)

उमाः मला काही ही लक्षणे ठीक दिसत नाहीत. भाऊ आल्यावर बहिणीच्या बोलण्यातही झालेला काहीसा बदल दिसला तुम्हाला? (आतून जनार्दनचा निर्मलेला हाक मारण्याचा आवाज येतो, 'बहना निमू?' ) बघा भावाबहिणीचं प्रेम कसं ऊतू जातंय ते!

महेशः ते ठीक आहे, पण आपण त्यात होरपळायला नको. माझ्याही मनात थोडी पाल चुकचुकायला लागली खरी!

उमाः अहो आपण प्रवासाला जायचं कॅन्सल करायचं का?

यशवंतः नाही, नाही, वहिनी असं काही करु नका. तुमची तब्येत सर्वात महत्त्वाची! आणि तयारी किती झाली आहे! विमानाचं तिकिटं, प्रवासाचं

एवढं पॅकेज, सॅनिटोरियमचं सहा महिन्यांचं बुकिंग! कशाला त्या गाढवासाठी एवढं नुकसान करुन घ्यायचं?

उमाः अहो भावोजी, आम्ही गेल्यावर त्याने ह्या घरावर गाढवाचा नांगर न फिरवला म्हणजे झाले.

यशवंतः तुम्ही काही चिंता करु नका. मी घेईन सर्व काळजी. माझं लक्ष राहिल.

उमाः काय होईल ते देव जाणे. (ती आत जाते.)

महेशः मला तर त्याच्या तोंडाचा वास आला होता! विमानात तर नसेल ना ढोसली? (जनार्दन येतो इंग्रजी गाणं गुणगुणत.)

जनार्दनः (त्याला वाटते यशवंतच हे बोलले) यू आर ऍबसुल्यूटली राईट! बाय द वे, आपण कोण? फर्स्ट टाईम आय सी यू!

यशवंतः आय सी!

महेशः अरे गाढवा, हे माझे मित्र यशवंत. वकिल आहेत ते. क्रिमिनल लॉयर.

जनार्दनः यू मिन लॉयर?

महेशः होय, आणि पोलिस डिपार्टमेंटमध्ये त्यांची चांगली ओळख आहे. (जनार्दन दचकतो, पण तसे न दाखविता)

जनार्दनः ओ! व्हेरी गुड! नाईस टू मीट यू. ओके, व्हेअर व्हेअर वुई (आठवून) इन फ्लाईट, विमानात. वास्तविक बघा अंकल! इंटरनॅशनल फ्लाईट. फ्रॉम

न्यूयॉर्क टू बॉम्बे! वीस-बावीस तासांचा प्रवास. अंग नुसतं आंबून गेलेलं... व्हेरी टायर्ड... एअर होस्टेसला बोलवलं... म्हटलं जेवणापूर्वी ३/४ पेग दे म्हटलं, तर म्हणते कशी..... नॉट मोअर दॅन टू पेग्ज! व्हाय? तर ती निघून गेली तणतणत. मग फ्लाईट पर्सरला बोलविले.... पण तो तिचा बाप... त्याची न् माझी बाचा बाची झाली. स्टुपिड, बास्टर्ड खिशावरचा बॅच दाखवून म्हणतो कसा काय करणार तुम्ही? घ्या माझे नाव लिहून... मी तर थक्कच झालो... नंतर माझ्या शेजारी बसलेल्या पॅसेंजरने सांगितले की.... अहो साहेब हे लोक चोरून लपवून बाहेर नेतात. हे क्र्यू म्हणून ह्यांना कुणीही चेक करीत नाही. बाहेर जाऊन दामदुपटीने विकतात.. तुम्हाला फुकट कशी देणार? काय भ्रष्टाचार हा? इनक्रेडिबल इंडिया! (यशवंताला शिंक येते.) इट्स टू! सफरिंग फ्रॉम कोल्ड? सर्दी झाली? त्यावर वाईन हे उत्तम औषध! दोन पेग घेऊन, टंच जेवण करुन झोपलं की दरदरुन घाम येतो आणि सर्दी गायब, व्हॅनिश! तसे ते बायकांचे पेय आहे पण पुरुषांनाही घामाघूम करुन सोडते.

महेशः (रागाने) पुरे झालं तुझं तळीरामायण.... दारुचं नाव सुद्धा काढलेलं येथे चालणार नाही.

जनार्दनः ओ माय डियर अंकल, सॉरी, एक्स्ट्रीमली सॉरी!

यशवंतः काय आहे जनार्दन....

जनार्दनः (त्यांना थांबवून) हे बघा अंकल, तुम्ही मला जॉन म्हटलं तरी चालेल... म्हणजे शॉर्टकट.... अमेरिकेतल्या लोकांना माझं हे लांबलचक नाव

घ्यायला खूपच कष्ट पडायचे. मग मला तेथे कुणी विचारलं की, व्हॉट्स युवर गुड नेम? तर मी त्यांना शॉर्ट ऍन्ड स्वीट गुडनेम सांगायचो जॉन! त्यांना हे नाव सोपं वाटायचं...आणि काय आहे... त्यात डिग्निटी आहे... जॉन म्हणजे किंग... किंग ऑफ इंग्लंड, न्यूयॉर्क एअरपोर्टवर बुटपॉलीशवाला दहाबारा फूट उंच खुर्चीवर बसवून बूट पॉलीश करतो तेव्हा आपण सिंहासनावर बसलेले किंग आहोत असे वाटते.

यशवंतः जनार्दन! तू जॉन नाहीस....आणि हे इंग्लंड किंवा अमेरिका नाही. हा भारत देश आहे.

महेशः तू आपली मायबोलीही विसरलास आणि संस्कृतीही!

जनार्दनः मी मायबोली पूर्ण नाही विसरलो, पण संस्कृती....म्हणजे

महेशः म्हणजे संस्कार, परंपरा!

जनार्दनः म्हणजे?...माझं काही चुकलं का? एनी मिस्टेक आय डीड?

महेशः हो चूक केलीस तू...आणि साधी चूक नाही घोडचूक!

जनार्दनः यू मिन ब्लंडर?

महेशः होय. आणि ती ही की तू विसरलास की ह्या बंगल्याचं नाव हेरंब आहे... म्हणजे गणेश. आमचं आराध्य दैवत आणि तुला ठाऊक आहे, प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला श्री गणेशाचे मंदिर आहे.

जनार्दनः हो ठाऊक आहे.

महेशः बंगल्यात येण्याच्याआधी गणेशाचे दर्शन घ्यायचे व मंदिरातील घंटा वाजवायची...ती संपूर्ण बंगल्यात ऐकू येते. दरवाजा उघडण्यासाठी दारावरची बेल वाजवायची आवश्यकता नसते.

जनार्दनः ओ! आय ऍम एक्सट्रीमली सॉरी!...पार्डन मी! हे मला ठाऊक होते. पण बरीच वर्षे झाली ना फरगॉट! विसरलो आणि बाबा काय झाले... मी बंगल्यात प्रवेश करताच अंधारुन आले, वादळ सुटले, सगळीकडे डार्कनेस.....काळा कुट्ट अंधार ब्लॅकआऊट! आणि बॅगा किती माझ्याजवळ? हाऊ वॉज स्केअर! ओ माय गॉड!! जिझस ख्राइस्ट!!!

यशवंतः काय? ख्रिश्चन धर्म स्विकारलास की काय?

जनार्दनः तसं नाही पण ती म्हण आहे ना. डू इन रोम ऍज द रोमन्स डू! जसा देश तसा वेश. पण ह्यानंतर पुन्हा अमेरिकेत जाईन तेव्हा नक्की ख्रिश्चन धर्म स्विकारेन!

यशवंतः पण मग इथली संस्कृती, देव धर्म सगळं विसरणार?

जनार्दनः ह्या इथल्या साऱ्या गोष्टींनी मला दुःखाशिवाय काहीच दिलं नाही. ते दुःख विसरण्यासाठी दुसरं काहीतरी स्विकारावं लागणारच! (त्याचा गळा दाटून येतो, तो जातो.)

यशवंतः काय रे महेश, ह्याच्या डोळयात पाणी का आलं असेल?

महेशः (तिरस्काराने) आठवलं असेल त्याला पूर्वीचं काही!

यशवंतः म्हणजे?

महेशः यशवंत! तू त्या दिवसात येथे नव्हतास. दिनूचं लग्न झालं... निर्मला आमच्या घरी आली तेव्हा ती तिच्या ह्या भावाला बरोबर घेऊन. तेव्हाही तिने ह्याच्यासाठी अशाच विनवण्या केल्या होत्या... काय तर म्हणे त्याचं त्याच्या आई-वडिलांशी पटायचं नाही...मी संमती दिली पण नंतर हळुहळू कळलं की गांधारी जशी विवाह करुन सासरी येताना तिच्या भावाला शकुनीला घेऊन आली होती तसाच हा शकुनी मामा आहे.

यशवंतः पण निर्मला मध्ये आणि ह्याच्यात किती जमीन अस्मानाचा फरक आहे? एकाच बापाची अपत्ये पण इतका फरक?

महेशः काय आहे यशवंता, समुद्रमंथनातून अमृतही बाहेर पडलं आणि विषही! काही दिवसानंतर त्यानं जी काही थेरं माजवली त्यामुळे मी संतापलो आणि दिलं घराबाहेर हाकलून! अक्षरशः लोटला त्याला बाहेर. पडला जाऊन मग दाराबाहेरच्या तुळशीवृंदावनावर! पडली कपाळाला खोक! मग परत आलाच नाही! पण आत्ता आला बऱ्याच वर्षांनी, निर्मलेच्या वेड्या मायेखातर घेतला त्याला घरात!

यशवंतः पण हे सारं विसरला असेल तो?

महेशः ९/१० वर्षे झालीत.... एव्हढी पुरेत विसरायला आणि विसरला नसता तर आला नसता येथे तो!

जनार्दनः (आत येत) यस, यस लेट बाय गॉन्स बी बाय गॉन्स. पूर्वीचं विसरून गेलो सारं! झालं गेलं गंगेला मिळालं!

यशवंतः  थोडं गंगाजल घेऊन आलास वाटतं?

जनार्दनः  (ओशाळून) काय करणार? मेनी टाईम्स आय स्टॉप ड्रींकिंग ऍन्ड ट्राइड टू बिकम टी टोटलर. पण काय आहे ना अंकल! धिस इज ए वॉटर ऑफ लाईफ अक्काविते (aquavitae) असे फ्रेंच डॉक्टर म्हणतात. हे जगातील सर्वात गुणकारी टॉनिक आहे.

यशवंतः  काय बडबडतोस? अरे हे वाईट व्यसन आहे. त्यामुळे लिव्हर-यकृत खराब होते.

जनार्दनः  मे बी, असेलही कदाचित पण हे समुद्रमंथनातून देवदानवांनी काढलेल्या चौदा रत्नांपैकी एक आहे असे एकदा आमच्या बाबांनीच सांगितले होते. (महेशला) हो ना बाबा?

महेशः  झालं का पुन्हा सुरु तुझं मदिरापुराण!

जनार्दनः  तुम्हीच नाही का बाबा कवी हरिवंशराय बच्चनांच्या ‘मधुशाला’चा मदिरालय म्हणून अनुवाद केला आहे! ते पुस्तक मी नेलं होतं अमेरिकेला, जाताना फावल्या वेळात वाचायचो.

महेशः  पण तुला त्याचा अर्थ कळायला हवा ना? तूच लोकांना सांगत सुटला होता ना पूर्वी की आमच्या बाबांनी दारुवर पुस्तक लिहिलं म्हणून?

जनार्दनः  दारुवरच तर आहे ते पुस्तक! प्रत्येक चारोळयात दारु हा शब्द आहेच ह्या ‘हाऊस ऑफ वाईन’ मध्ये.

महेशः अरे मूर्खा कवीने मदिरा म्हणजे भक्ती, पिणारे म्हणजे भक्तजन आणि साकी म्हणजे परमेश्वर अशा गूढार्थाने ते लिहिले आहे. मधुशाला ही जीवनाची शाळा आहे. दारुचा गुत्ता नव्हे. गांधीजींनी सुद्धा प्रशंसा केली आहे तिची!

जनार्दनः मला कुठे एवढे तत्वज्ञान ठाऊक? मला तर त्यातल्या ह्याच ओळी आवडल्या ज्या माझ्या जीवनातील दुःखाशी निगडीत आहेत. मदिरा म्हणजे औषध आहे माझ्या दुःखावर!

महेशः (हसतो) कोणत्या?

जनार्दनः याद न येवो दुःखमय जीवन, ह्याकरिता पितो मदिरा, जग-

चिंतेपासून राहण्या मुक्त, घेतो चषक करा, छंद,

इच्छा, रुचीसाठी जग पिते मदिरा,

पण मी तो रोगी आहे ज्यावर, एकच औषध हे मदिरालय.

यशवंतः वा! वा! छान म्हणजे ह्या सुंदर काव्यातून तू हा गलिच्छ धडा घेतला! अरे दारूमुळे लिव्हर खराब होते, सिऱ्हासिस होतो.

जनार्दनः लिव्हर खराब होते? येथे हृदयाचे तुकडे तुकडे झालेत! तेथे लिव्हरची पर्वा कुणाला? आणि दारूला वाईट म्हणू नका. देवाला सुद्धा चालते.

यशवंतः कुठल्या देवाला?

जनार्दनः महादेवाचा अवतार, कालभैरव-महाकाल-काशीचा कोतवाल! उज्जैनला त्याचं मोठं मंदिर आहे. मी दरवर्षी जायचो मदिरेचा नैवेद्य द्यायला! पण मी परदेशात होतो त्यामुळे नाईलाज झाला होता. पण मी जितकी वर्षे बाहेर होतो तितक्या बाटल्या आणल्यात देवाला अर्पण करायला. शनिवारी येणाऱ्या भैरवाष्टमीच्या दिवशी मद्याचा नैवेद्य दाखविला जातो तेव्हा ह्या मद्याच्या वर्षावाने मी कालभैरवाला संतुष्ट करून टाकीन. (हसतो.)

महेशः पाहिलंस यशवंता किती बेफिकीर आहे तो?

जनार्दनः खरे तर फकिरालाच असते फिकीर! आपण बिनधास्त! सारं काही आहे माझ्याजवळ!! पैसा, अडका, धनदौलत! मनी इज पॉवर! सारं काही घेता येतं पैशाने, सुख, ऐषाराम, एक्सेट्रा एक्सेट्रा... आय हॅव लॉट ऑफ बक्स डॉलर्स. अमेरिकन डॉलर्स.

महेशः काय रे, काय करीत होतास अमेरिकेत? ज्यामुळे तुझ्याजवळ एवढा पैसा आला?

जनार्दनः कष्ट, हार्ड वर्क माय लॉर्ड हार्ड वर्क!

यशवंतः हार्ड वर्क? म्हणजे नक्की काय काम करीत होतास तू तेथे? आणि गेलास कसा?

जनार्दनः गेलो कसा? (महेशकडे बघून) ह्यांची लाथ बनली माझं नशीब! ह्यांनी लाथाबुक्क्यांनी बाहेर काढलं! बेघर झालो. एका गुजराथी मित्राकडे

गेलो! त्याने मार्ग दाखविला. तो म्हणाला, " अमेरिकेला जातोस? न्यूयॉर्कला?" मी तात्काळ हो म्हटलं!

यशवंतः बरं मग?

जनार्दनः तो त्याच्या मालकाच्या मित्राशी बोलला. त्यांची तेथे मोटल होती. मोठा बंगला होता. त्यांना नोकराची गरज होती. पासपोर्ट होताच. त्यांनी कागदपत्रे पाठविली. दहाबारा टक्क्याने कर्ज काढले... आणि मारली उडी अंधारात. नशिबाने साथ दिली आणि बसलो विमानात. पुढे त्यांनी मला मोटलमध्येच काम दिले.

यशवंतः मोटल की होटल?

जनार्दनः मोटल!

यशवंतः हा काय प्रकार आहे?

जनार्दनः मोटल म्हणजे हायवेवरील होटल. फक्त पार्किंग आणि काही तास राहण्याची सोय. गुजराथी मालक होते. हसमुख पटेल. पण त्यांच्या तोंडावर कधीच हासू दिसले नाही! नॉट इव्हन स्माईल. अमेरिकेत मोटलचे मालक बहुतकरून पटेलच आहेत. पटेल आणि मोटल असे समीकरणच आहे मुळी!

यशवंतः म्हणजे नेमके कोणते कस्टमर येतात?

जनार्दनः म्हणजे बघा इफ द... फ्लाईट, सॉरी! म्हणजे एखाद्याचं विमान लेट असेल तर ते ३-४ तास तेथे थांबू शकतात आणि दुसरे म्हणजे गुलह्रौशी प्रेमी जोडपे मौजमस्ती करण्यासाठी रात्रभर थांबतात.

यशवंतः मग तू काय काम करायचास तेथे?

जनार्दनः क्लिनिंगचे! कस्टमर गेल्यावर रूम क्लिन करायचं. पण ४-६ महिन्यानंतर काऊंटरवर काम मिळाले. फाईव्ह डॉलर्स पर अवर. एका रूममध्ये मला रहायला जागा मिळाली होती. पण फ्रायडेला खूप गर्दी. मग त्या रूममधून माझ्या बिऱ्हाडाची हकालपट्टी व्हायची.

(उमा येते- निर्मला किचनच्या दरवाज्यातून जनार्दनला खुणावते.)

जनार्दनः (सर्वांकडे बघत उठतो) एक्स्क्यूज् मी! आय विल बी राईट बॅक! (तो आत जातो.)

(उमा, महेश व यशवंत एकमेकांकडे बघतात.)

यशवंतः महेश, वहिनी, प्रकरण जरा अवघडच दिसते!

उमाः (चिंताक्रांत होत) भावोजी काही सुचत नाही! आम्ही गेल्यावर हे माकड येथे काय धिंगाणा घालेल ते कळत नाही.

महेशः मलाही काळजी वाटायला लागली.

यशवंतः तुम्ही दोघंही काळजी करू नका माझं लक्ष राहिल येथे.

(गणपती मंदिराची घंटा वाजते. उमा दरवाजा उघडते. दिनकर आणि केदार शॉपिंगच्या पिशव्या घेऊन येतात.)

केदारः आज्जी मम्मी कोठे आहे? (उमा किचनकडे निर्देश करते- तो तिकडे जातो.)

दिनकरः (उमेकडे बघून, काळजीने) आई काय झालं? अशी चिंताक्रांत का दिसते आहेस? (महेशकडे बघत) बाबांशी काही भांडण वगैरे झालं का?

उमाः नाही रे! काही नाही! तुझ्या बायकोचा भाऊ आलाय.

दिनकरः (हर्षभरीत) कोण? जनार्दन?

उमाः (कपाळावर हात ठेवत उद्विग्न स्वरात) होय!

दिनकरः (उत्कंठेने) अमेरिकेहून?

उमाः (वैतागून) तो अमेरिकेलाच होता ना? मग दुसरीकडून कुठून येईल?

दिनकरः अगं पण काल त्याचा फोन आला होता की त्याचं तिकीट अजून कन्फर्म झालं नाही म्हणून!

उमाः अरे तो किती खोटं बोलतो हे तुला ठाऊक आहे ना? गंमत असो की सिरीयस असो तो त्याची खोटं बोलण्याची सवय सोडणार होय? खोटं बोलून दुसऱ्याला फसविण्यात त्याला आनंद वाटतो, गंमत वाटते. मग समोरच्यांचा जीव का जाईना!

दिनकरः अगं पण आहे कोठे तो?

उमाः (किचनकडे बोट दाखवित) शिजते आहे भावाबहिणीची खिचडी आत!

दिनकरः (हसतो) काय आई?.... बघतो मी आत जाऊन. (किचनकडे जातो.)

महेशः मला काही खरं दिसत नाही.

उमाः माझ्या मनात तर सारखी पाल चुकचुकतेय.

महेशः (यशवंतास) यशवंत? हा सारा प्रवास! हा बंगला सोडून सॅनिटोरियममध्ये इतके दिवस राहणे, मला काही सुरक्षित वाटत नाही.

यशवंतः अरे पण ह्या सर्व गोष्टींपेक्षा वहिनींची तब्येत सुधारणं महत्त्वाचं नाही का? राहिलं तुमच्या चिंता काळजीचं! मी सांगितलं ना माझं सारं लक्ष राहील येथे. नेहमी तुला... तुम्हाला सारं सारखं कळवित राहीन.

उमाः आमची सारी भिस्त आता तुमच्यावर! तुमच्यावरच ही जबाबदारी!

महेशः पण यशवंता हा नसता सारा उपद्व्याप तुला!

यशवंतः काय रे महेश? परका समजतोस काय मला? वहिनी तुम्ही फक्त स्वतःची काळजी घ्यायची, दुसरी कसलीही चिंता करायची नाही. मी गाडी बोलवितो.(तो जातो.)

(तेवढ्यात जनार्दन, दिनकर व केदार येतात. जनार्दनचा डावा हात केदारच्या गळ्याभोवती असतो तर उजव्या हाताने त्याने दिनकरचा हात धरलेला असतो.)

जनार्दनः तुम्हाला ती चेन आवडली ना दिनकर राव? (दिनकर स्मित करून होकार देतो) आणि केदू तुला आवडले ना ते ब्रेसलेट?

केदारः (पसंती दर्शवित, खूष होत) होय मामा, खूप छान आहे.

जनार्दनः आणि रिस्ट वॉच?

केदारः ते तर फार आवडलं मला... पण मामा रॅडोचं घड्याळ म्हणजे खूपच महाग ना?

जनार्दनः (त्याच्या पाठीवर थोपटीत) अरे डोन्ट वरी माय सनी बॉय इट्स नथिंग... अजून खूप काही काही आणलं आहे तुझ्यासाठी... आणि खूप काही काही करायचंय तुझ्यासाठी. अमेरिकेला ना आय मिन न्यूयॉर्कला खूप दुकाने आहेत सोन्या-चांदीची, ज्वेलरीची. गुजराथी, पंजाबी लोकांची. बावनकशी सोनं! आणि इंडियापेक्षा कितीतरी स्वस्त! म्हणून मी तेथून तुमच्या सर्वांसाठी दागिने आणलेत बरं का! आणि दिनकरराव हे हॅंडकफ....सोन्याचे आणि बाबांसाठी ना ३००ग्रॅम सोन्याची चेन! तीनशे ग्रॅम म्हणजे तीन तोळे ना?

महेशः मला नको तुझी चेन!

जनार्दनः व्हाय फॉर? का? का? मी आणली म्हणून?

महेशः मी सोन्याचे दागिने वापरत नाही आणि फुकटचे तर मुळीच नाही.

जनार्दनः वापरा आजपासून! ओल्ड इज गोल्ड आणि गोल्ड इज ओल्ड! आणि बरं का आई तुमच्यासाठी पण आणला आहे च....प....ला.....हा......र!

उमाः (तिरस्काराने) मला नको तुझा चपलाहार!

केदारः मामा! पण मी अजून एक सुंदरशी छोटी पेटी बघितली... त्यात पण दागिने आहेत?

जनार्दनः होय बेटा!

केदारः कोणासाठी?

जनार्दनः जिने डागण्या दिल्या... पण ते जाऊ दे फरगेट इट!

केदारः म्हणजे?

जनार्दनः म्हणजे इथं एक होतं माझ्या जीवाभावाचं...प्रेमाचं! पण प्रेम आंधळं असतं आणि प्रेम करणारा मूर्ख! वाटलं होतं अभिसारिका बनून वाट पाहील! पण वाट लावली तिनं माझी! (उमा आणि महेश अस्वस्थ होतात. गणेश मंदिराची घंटा वाजते. केदार दरवाजा उघडतो. यशवंत येतो.)

यशवंतः (उमा व महेशला) चला गाडी आली. तुम्हाला निघायला हवं.

उमाः (निर्मलाला हाक मारते. ती येते.) निर्मला, दिनकर, केदार येतो आम्ही.

निर्मलाः होय आई, सर्व बॅगा व सामान आधीच ठेवलंय बाहेर.

जनार्दनः तुमचं एटीएम कार्ड, मोबाईल चार्जर घेतलं सर्व बरोबर?

महेशः होय घेतलंय सगळं बरोबर.

निर्मलाः काळजी घ्या औषधे वेळेवर घेत जा.

दिनकरः संपण्यापूर्वीच मेडिकल मधून मागवून घेत जा.

उमाः होय. आम्ही घेऊ सगळी काळजी. पण म्हणतात ना घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलांपाशी! तुझ्यावर आणि दिनकरवर सर्व जबाबदारी आहे.

जनार्दनः डोन्ट वरी आय विल ऑल्सो टेक केअर ऑफ धिस बंगलो अँड एव्हरीबडी !

उमाः (जनार्दनकडे दुर्लक्ष करीत) आणि बरं का निर्मला, सर्वात प्रथम म्हणजे श्री गणेशाच्या मंदिरात नंदादीप तेवत ठेव. तुळशी वृंदावनातही रोज सकाळी पाणी घाल व सायंकाळी दिवा लाव, ‘जे तुळशीपाशी सारविती। नित्य घृतदीप उजळती तया घरची न सरे संपत्ती ।।’ आणि बंगल्याभोवतीच्या सर्व झाडांना, फुलझाडांना पाणी घालीत जा. त्यांची निगराणी ठेव.

महेशः आणि दिनकर कुठलाही बाहेरचा नोकर चाकर ठेवू नका. फसलो आहोत एकदा आपण. रात्री दहा वाजता मुख्य गेटला कुलूप लावीत जा. केदारकडे लक्ष दे.

उमाः (केदारला जवळ घेत) बरं का रे पोरा, काळजी घे. कुणाच्याही मोटरसायकलवर बसू नको. आपला रिक्षानेच जात जा. (त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत) आपल्या गणरायाला नवस केला आहे तुला चांगली नोकरी मिळावी म्हणून. रोज गणपत्यथर्वशीर्ष म्हणत जा. आणि त्या कारटीचा नाद सोड.

केदारः होय आई तू माझी काळजी करू नको. मिळेल मला चांगली नोकरी. तू फक्त बाबांची काळजी घेत जा. आमच्यासोबत आता मामा आहेत ना!

जनार्दनः फेअरवेल! आई बाबा! (दोघेही त्याच्याकडे लक्ष देत नाहीत.)

महेशः यशवंत, चल.

यशवंतः होय चल, सर्व सामान गाडीत ठेवलंय.

उमाः गाडीत बसण्यापूर्वी गणरायाचे दर्शन घेऊ. (सर्वजण बाहेर जातात... जनार्दन सोडून. पुन्हा स्तोत्र ऐकू येते.)

*वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।*

*निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।*

(जनार्दन दरवाजा उघडतो. निर्मला, दिनकर, केदार आत येतात.)

जनार्दनः (स्वतःला सोफ्यावर झोकून देत) नाऊ आय ऍम रिलॅक्स! फ्री फ्रॉम ऑल अँक्झायटी! (सर्वांकडे पाहून) ओ के! नाऊ हॅव अ गुड टाईम अँड एंजॉय युवरसेल्फ! (सगळे त्याच्याकडे आश्चर्याने बघतात) ऑल, ऑल, ऑल ऑफ यू! (मोठ्याने हसतो.) देवाने, आय मिन गॉड हॅज मेड नाईट. रात्र का बनविली आहे ठाऊक? रिलॅक्स... रिलॅक्स होण्यासाठी! दिवसभराचा शारीरिक मानसिक थकवा घालवण्यासाठी! पक्षी कसे थकून भागून झाडावरील उबदार घरट्यात येतात... शीतल अंधार आणि आईचं उबदार प्रेम! फक्त जागी असतात वटवाघळं... कारण त्यांना अंधारात दिसतं... अंधार पडला की त्यांचा दिवस उजाडतो... पण फिरू द्या त्यांना अंधारात... चला जा तुम्ही... विश्रांती घ्या!... आई बाबा गेलेत- त्यांचा प्रवास सुखाचा होवो... हे चिंतन करू या! शुभास्ते पंथानः संतु। गुड नाईट... ! (दिनकर आणि केदार आत जातात.)

निर्मलाः (जनार्दनला) दादा, तूही झोप आता. उद्या ह्यांना कामावर जायचंय आणि केदारला इंटरव्ह्यूला. डबे करावे लागणार!

जनार्दनः किती काम करतेस? आल्यापासून बघतोय!

निर्मलाः अरे पण मग कोण करणार?

जनार्दनः नोकर चाकरही काढून टाकलेत! अजब आहे. आणि एवढं करून कदर आहे का कुणाला तुझी? म्हणतात ना, 'मॅन मे वर्क फ्रॉम सन टू सन बट वुमन्स वर्क इज नेव्हर डन!'

निर्मलाः म्हणजे काय रे दादा?

जनार्दनः ये जरा बस विश्रांती घे. (ती त्याच्या जवळ बसते.) म्हणजे असं की नवरा सकाळी कामावर जातो आणि सायंकाळी परत येतो. लोकलच्या प्रवासाची दगदग, कामावरचा उबग म्हणून तो सहानुभूतीस पात्र! पण बाईमाणूस? पहाटे चार-पाच वाजता उठणं! मुलांची शाळेची तयारी! त्यांचा आणि नवऱ्याचा डबा! मुलांना शाळेत पोहचवणं-आणणं-त्यांचा अभ्यास बघणं जेवण खाणं, धुणीभांडी साफसफाई! काही अंत असतो का बायकांच्या कामांना? यादी केली तर ही भिंतही पुरायची नाही.

निर्मलाः होय दादा तू म्हणतोस ते पटतंय मला!

जनार्दनः मला नाही सहन होत तुझा हा त्रास! मी करतो नोकरांची व्यवस्था.

निर्मलाः वेड्या बहिणीची माया भाऊरायाला कळली तर! (दोघेही हसतात) पण एक आहे दादा तुला पाहून मन भरून गेलं! अमेरिकेला गेला तेव्हा किती काटकुळा, निस्तेज दिसत होतास पण आता कसा गब्रु जवान होऊन आलास!

जनार्दनः दिसतं तसं नसतं ताई! खोल खोल आहे माझ्या मनाची बाख. त्यात किती सुसरी आणि भयंकर जलचर प्राणी आहेत हे वरून शांत दिसणाऱ्या पाण्याला पाहून कसे कळणार?

निर्मलाः (आश्चर्याने) म्हणजे म्हणायचंय काय तुला?

जनार्दनः काय निमूताई? फक्त तूच तर एक अशी जीवाभावाची होतीस आणि आहेस की जिच्या जवळ मी माझं मन मोकळं करावं! अजूनही मी तिला (आवंढा गिळत) विसरलो नाही! आणि विसरणार नाही.

निर्मलाः कोण? कंचन?

जनार्दनः काय तू विसरलीस ताई? तिनं मला वचन दिलं होतं, की ती माझी वाट पाहिल म्हणून आणि ही गोष्ट तुलाही ठाऊक होती.

निर्मलाः होय ठाऊक होती.

जनार्दनः मग का होऊ दिलं असं? का पाळलं नाही तिने माझं वचन?

निर्मलाः अरे दादा, पोरखेळ वाटला का तुला हा? १७-१८ वर्षांची पोर! तुझे तिच्याशी चाललेले चाळे बंगल्यातील सर्वांच्या लक्षात आले होते.

त्यामुळे तू परदेशात गेल्यावर आई बाबांनी पटकन निर्णय घेतला आणि एक चांगले स्थळ बघून तिचा विवाह उरकून टाकला.

जनार्दनः का बरं? मी चांगला नव्हतो? चुकलंच माझं; तिला घेऊन पळून जायला हवं होतं. तशी तिची पण तयारी होती. पण तू आली ना मध्ये आडवी! आणि मीही विचार केला होता तुझा! आणि मीही काही वाईट नव्हतो इतका.

निर्मलाः स्वतःच्या मनालाच विचार! तुला बाबांनी पतपेढीत नोकरी लावून दिली होती तेथेही तू भ्रष्टाचार केलास?

जनार्दनः (तिला थांबवीत) थांब ताई हा धादांत खोटा आरोप होता माझ्यावर! मी किती आरडाओरडा केला तरी माझं खरंच मानलं नाही कुणी! खरंच ताई तुझी शपथ... माझा यात काहीही संबंध नव्हता.

निर्मला (अगतिक होत, निराशेने) आता काय त्याचा उपयोग?

जनार्दनः (दुःखाने) होय. आता काय उपयोग!

निर्मलाः अरे पण तुझ्या उचापती काय कमी होत्या? खुशाल उजळ माथ्यानं त्या कंचनला पत्र लिहायचास. तिला एकांतात भेटायचा प्रयत्न करायचास! तुला काहीच का लाज, भीतीही वाटायची नाही या गोष्टींची?

जनार्दनः प्रेमात पडल्यावर एखाद्या सशाचाही सिंह होऊन जातो, आणि एखाद्या हरिणीचीही वाघीण!

निर्मलाः अरे पण तुझ्या या जंगलीपणाला काही सीमा? तुझं ते एक प्रेमपत्र बाबांच्या हाती पडलं आणि काय गदारोळ उडाला! किती संतापले होते ते! आणि तुला जाब विचारल्यावर वर तोंड करून बोललास, मग पडलास तोंडघशी!

जनार्दनः होय. मग मला त्यांनी धक्काबुक्की केली. आणि घराबाहेर हाकलले... अक्षरशः लोटले दाराबाहेर! मी जाऊन कोसळलो त्या तुळशी वृंदावनावर! कपाळमोक्ष झाला! कपाळाला खोक पडली... रक्त वाहत होते भळाभळा! तू पदर फाडला आणि बांधली पट्टी कपाळावर! बघ (कपाळाला हात लावून दाखवित) हा व्रण! आरशात पाहिलं की आठवण येते. हे माझ्या कपाळी का आलं? आणि एवढं सहन करूनही मी तिची वाट बघितली ...पण तिने नाही बघितली! तिचं पत्र तू मला पोस्ट केलं होतंस... हरली म्हणून लिहिलं होतं त्यात!

निर्मलाः काय करणार, बिचारी अगदी अगतिक झाली होती. तिचं लग्न झाल्यावर पत्र पाठवलं मी तुला.

जनार्दनः होय. न्यूयॉर्कला बेसमेंटमध्ये रहायचो मी! ....सकाळी दहा वाजता पोस्टमन दाराबाहेर असलेल्या पोस्टबॉक्समध्ये पत्र टाकून जायचा. त्यादिवशी सकाळी बाहेर आलो...तुझे पत्र बघून खूप आनंद झाला. वरुन बर्फ पडत होता. चालताना अनवाणी पाय अर्धाफूट बर्फात घुसत होते. तरी न राहवून ते पत्र तेथेच फोडले आणि तिच्या लग्नाबद्दल वाचल्याबरोबर अंगाची लाही लाही झाली....वरुन बर्फ पडत नव्हते तर आगीचे लोळ पडताहेत असं वाटलं. बेडवर येऊन अंथरुणात घुसून कितीतरी वेळ रडत होतो!

निर्मलाः झालं गेलं विसरुन जा दादा!

जनार्दनः (तोंड हाताने झाकून रडत) कसा विसरू? ताई माझ्या निष्पाप, निरागस हरिणीची पारध झाली ग ताई! पारध झाली! दोन जीवांचा तळतळाट घेतला ह्यांनी! ताटातूट केली आमची! ह्याच वास्तूत! आय विल टेक रिव्हेंज विथ एव्हरीथींग!

निर्मलाः काहीतरी वायफळ बडबड करू नकोस. तिचं लग्न झालं, ती सुखात आहे.

जनार्दनः मला नाही वाटत.

निर्मलाः आणि तू?

जनार्दनः दुःख विसरण्यासाठी बरंच काही करून पाहिलं पण....व्यर्थ. ते कोणाशी शेअरही करता येत नाही.

निर्मलाः आता हे सारं विसर. तुला ह्या घरात बाबा आणि आईंनी येऊ दिलं, त्यांचे आभार मान. नाहीतर एवढं घडूनही...!

जनार्दनः होय खरंच ताई, तुझेच आभार मानायला हवेत, त्यांचे नाही!

निर्मलाः निर्लज्ज कुठला! धमकी दिली होतीस ना मला की कंचनची सर्व पत्रे माझ्याकडे असून मी ती तिच्या नवऱ्याला पोस्ट करीन म्हणून? ब्लॅकमेल करीत होतास?

जनार्दनः वाचली तुझ्यामुळे ती!

निर्मलाः अटच तशी घातली होती ना मला तू की दिनकर आणि त्यांच्या आई-वडिलांचं मन वळवशील. जेणे करून मी तुझ्या घरी येऊ शकेन, तरच मी ती पत्रे तिच्या नवऱ्याला पाठविणार नाही म्हणून? त्या बिचारीचा संसार मोडू नये म्हणून मी तुझी अट पाळली आणि आई-बाबांची आणि त्यांची विनवणी करून तुला येथे येण्याची परवानगी काढली.

जनार्दनः तुला आठवतंय बहना? पूर्वी मी तुझ्या या बंगल्यात रहायचो... परदेशात जाण्यापूर्वी! किती कामं करायचो! फुकट खायचो नाही बरं का! म्हणून तर तुझ्या सासू सासऱ्यांनी माझ्या येथे राहण्याला नाकं मुरडली नाहीत! या बंगल्याभोवतालची बाग किती स्वच्छ ठेवायचो? पालापाचोळा झाडून स्वच्छ करायचो. साऱ्या फुलझाडांना, फळझाडांना पाणी घालायचो, त्यांची निगा ठेवायचो! कुठल्या फुलझाडाची कळी केव्हा उमलणार हे सुद्धा मला सरावानं कळायला लागलं होतं. कंचन असायची सोबत. तिच्यासाठी तिच्या पसंतीचा गजरा बनवायचो. किती आनंद व्हायचा तिला? निरागस पोरगी होती. स्वच्छ, सुंदर मनाची, निष्पाप! मी तिचं नाव मधुरा ठेवलं होतं! मधु नावानंच मी तिला हाक मारायचो! तिचं मधाळ बोलणं, मधुर दृष्टीक्षेप टाकणं, ते मधुर स्मितहास्य, तो मधुर चेहरा, चाफेकळीसारखं रूप..... लावण्य... मला खूप आवडायची ती! या बागेतलं सर्वात सुंदर फूल होती ती! सर्व फुलझाडांवरची उमललेली सुंदर सुवासिक फुलं तिच्या केसात मी माळायचो... फुलराणी दिसायची तेव्हा! तिनं तिचं सुकुमार हृदय माझ्या पूर्ण हवाली केलं होतं! बहना... माझं हृदयही तिच्या सहवासात

कोवळं झालं होतं.संगमरवरी मूर्ती होती ती! दुधावरच्या सायीसारखी, पारिजातकाच्या फुलासारखी नाजूक, कोमल आणि प्रेमळ. मी तिच्यावर... मुग्धावर मुग्ध होतो, आणि ती माझ्या जीवापाड प्रेमावर!

निर्मला: तू तिचं नाव काढणंसुद्धा पाप आहे. हे प्रेमभंगाचं दुःख तुला विसरावंच लागेल. अन्यथा काहीतरी अनर्थ घडेल आणि तुझ्याबरोबर सर्वांना संकटात ओढून घेशील! (ती आत जाते.)

जनार्दन: तिचं नाव काढेन की नाही हे नाही सांगत! पण ह्या बंगल्याची नाव मात्र बुडवेन हे नक्की!

## अंक पहिला

## प्रवेश दुसरा

तीन महिने उलटून गेले आहेत.

(पडदा वर जातो तेव्हा रंगमंचावर मंद निळा पहाटेचा प्रकाश दिसतो व स्त्रीच्या धीरगंभीर आवाजात श्री गणेशाचे स्तोत्रः

*वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।*

*निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।*

ऐकू येते. दिनकर डोळे चोळीत हॉल मध्ये येतो. त्याने नाईट ड्रेस घातलेला आहे. तो दरवाजा पूर्ण उघडतो. निर्मला आत येते. तिच्या एका हातात पूजेचे ताट व दुसऱ्या हातात वर्तमानपत्र असते.)

निर्मलाः (आश्चर्याने दिनकरकडे बघत) अगंबाई! अजूनही तुमची अंघोळ झाली नाही वाटतं?

दिनकरः (तिच्या हातातून वर्तमानपत्र घेत व तिला दाखवित) अगं ए माझी आई... सुट्टीच्या दिवशीही कामावर जायला लावतेस का?

निर्मलाः म्हणजे?

दिनकरः (तिला पेपर उघडून तारीख दाखवित) बघ रविवारची लोकसत्ता!

निर्मलाः अगंबाई खरंच की! तो पेपरवाला घाईघाईने देऊन गेला माझ्या हातात! मी बघितलंच नाही!

दिनकरः (पेपर तिच्या हातात कोंबत, त्वरेने) मी जातो परत झोपायला. दहा-बारा वाजेपर्यंत उठवू नकोस मला! (तो जातो.)

निर्मलाः दहा-बारा? काय बाई... ! (इथवर जनार्दन सोफ्यावर बसलेला असतो हे तिच्या लक्षातच आलेलं नसतं.)

जनार्दनः (खोकत) मी आहे म्हटलं येथे आठही दिवस संडे असणारा!

निर्मलाः (साश्चर्य) अरे दादा तुझ्याकडे तर बघितलंच नाही मी.

जनार्दनः माझ्याकडे बघणाऱ्यांची संख्या आता खूप कमी झाली आहे! नाहीच म्हटलं तरी चालेल.

निर्मलाः (सहानुभूतीने) असं रे काय म्हणतोस दादा? आणि तू झोपला होतास की नाही?

जनार्दनः नाही म्हटलं तरी चालेल. तू बस ना. (ती सोफ्यावर बसते.)

निर्मलाः (त्याच्यावरील काळजीने) दादा, नको रे असा त्रागा करून घेऊस! सोड सारं! मी लहान होते तेव्हा किती माया करायचास माझ्यावर? त्या मायेची शपथ तुला! आता झालं गेलं विसरून जा. साऱ्यांनाच सारं मिळत नाही रे. जे आहे त्यात समाधान मानलं तरच आपण सुखी राहू शकतो.

जनार्दनः नाही बहना! मी त्यातला माणूस नाही! मला हवं ते मिळालं नाही तर मी तडफडून उठतो असा! जीव कासावीस होतो माझा! एखाद्याच्या नरडीचा घोट घ्यावासा वाटतो. (टी पॉयखाली ठेवलेली बाटली आणि ग्लास काढतो. ग्लासात दारू ओतून पितो.)

निर्मलाः (ते बघून) काय रे दादा, सकाळी सकाळी हे जहर पितोस?

जनार्दनः जहर? हे माझ्या दुर्धर आजारावरचं औषध आहे! (स्वतःला सावरीत, सोफ्याला पाठ लावून आरामात बसत) बरं ते जाऊ दे बहना, एवढा मोठा बंगला आणि तू एकटीच राबतेस. नोकर चाकरांना तर तुझ्या सासू सासऱ्यांनी हुसकावून लावले. तुला आठवतं, मी एकदा तुला बोललो होतो, की मी तुझ्यासाठी नोकराची व्यवस्था करतो म्हणून?

निर्मलाः होय, पण कुणावर विश्वास ठेवणं म्हणजे... ?

जनार्दनः तुझा माझ्यावर विश्वास आहे? (ती मान हलवून होकार देते.) झालं तर मग!

निर्मलाः तुझं म्हणणं खरं आहे दादा. पण आम्हाला फार भयंकर व विचित्र अनुभव आला आहे. कोण कुठले होते ते जोडपे! बिहार का राजस्थानकडचे. चारपाच वर्षे त्यांनी इमानेइतबारे काम करून विश्वास संपादन केला आणि एक दिवस घरातील सर्व दागिने व रोकड घेऊन पोबारा केला. यशवंत काकांनी मदत केली तेव्हा कुठे ते दागिने आणि पैसे हाती लागले. ते सर्व तळघरातल्या तिजोरीत सुरक्षित ठेवले तेव्हापासून. त्यामुळे आता आई बाबा नोकरांचे नावच काढीत नाहीत.

जनार्दनः पण बहना, मला सांग हे यशवंतकाका कोण? पूर्वी कधी मी त्यांना बघितलं नव्हतं.

निर्मलाः अरे ते बाबांचे जुने मित्र! तू होतास तेव्हा ते कुठे... दार्जिलिंगला होते.

जनार्दनः पण करतात काय ते?

निर्मलाः ते स्वतः वकील आहेत. आणि पोलीस डिपार्टमेंटमध्ये त्यांची चांगलीच ओळख आहे. (तो दचकतो.)

जनार्दनः (काहीतरी उमगून) काय म्हणालीस? दार्जिलिंगला?

निर्मलाः होय. तेथे ते बरीच वर्षे होते, त्यामुळे त्यांची तेथे ओळखही भरपूर!

जनार्दनः आणि आई आणि बाबाही तिकडेच गेलेत ना?

निर्मलाः होय. आमच्या फॅमिली डॉक्टरांनी त्यांना सल्ला दिला की थंड हवेच्या ठिकाणी ५-६ महिने तरी विश्रांती घ्यावी!

जनार्दनः सॅनिटोरियम मध्ये?

निर्मलाः होय.

जनार्दनः कळलं मला. दुर्धर आजाराने पछाडलंय त्यांना. पण केवढे आश्चर्य नाही? एवढा मोठा बंगला व त्याची रखवालीची आणि निगराणीची जबाबदारी तुझ्या एकटीवर टाकून ते खुशाल चैन आणि आराम करायला गेले... आजाराचं निमित्त करून... मौज मारायला गेलेत. (ती काही बोलणार तोच तिला थांबवीत) कसे लोक असतात बघ! सासुरवासाची व्याख्या देता येत नाही हेच खरं! काही सासू सासरे काय त्रास द्यायचा

असेल तो डायरेक्ट देतात. पण मला येथे वेगळेच दिसते. खोटी सहानुभूती, खोटं प्रेम, खोटी स्तुती साखरपेरणी करून सुनेला हरभऱ्याच्या झाडावर चढवायचं आणि आपला हेतू बरोब्बर साध्य करून घ्यायचा. आणि तू तरी किती वेडी, भोळी? त्यांच्या खोट्या प्रशंसेला सहज बळी पडते. म्हणतात ना सासू मागे सून नाचे!

निर्मलाः दादा!

जनार्दनः नाहीतर काय? ते म्हणत असतील, "आमच्या सुनेसारखी प्रेमळ, साध्वी, कामसू आणि सुसंस्कारित सून जगात सापडणार नाही."

निर्मलाः (विचार करून, स्वतःशीच) म्हणतात खरे असे.

जनार्दनः (ते ऐकून) हं अगदी बरोबर. तुझ्यावर या शब्दांचा जादूटोणा केला आहे त्यांनी. धिस इज अ ब्लॅक आर्ट! काळी जादू! विचक्राफ्ट! त्यांनी मृत्युपत्र केल्याचं आठवतंय तुला?

निर्मलाः होय.

जनार्दनः पण आठवतंय ते त्यावेळी काय बोलत होते ते? दिवसाला डोळे असतात आणि रात्रीला कान. (कानांना हात लावीत) ह्या कानांनी ऐकलंय ते! "हे मृत्युपत्र मी नंतर बदलू शकतो का?" असे ते वकीलाला विचारत होते. तो म्हणाला, "होय, तुम्ही त्यात फेरफार करून दुसरंही बनवू शकता." तुझे सासरे म्हणाले आजकाल सुनांचा भरवसा नाही. पण माझ्या सुनेनं

माझ्या मुलाला फितवलं तर? मुलांपेक्षा मुलींना जास्त माया असते. म्हणून मग मी हा बंगला कंचनच्या नावावर करीन, निदान उर्वरित आयुष्य तिच्या सहवासात आणि निगराणीत जाईल आमचं म्हातारपण!

निर्मला: असं म्हणाले ते?

जनार्दन: भ्रांतीत राहू नकोस ताई!

निर्मला: (त्याला टाळीत) खूप कामं पडलीत. बोलू आपण नंतर... पण... तू म्हणतोस ते खरं असेल तर... !

जनार्दन: मला रात्री झोपच आली नाही.

निर्मला: का रे?

जनार्दन: सारखा विचार करीत होतो.

निर्मला: कसला विचार?

जनार्दन: कसला म्हणजे? तुझ्या सुखाचा! दिनकररावांच्या सुखाचा! केदारच्या सुखाचा!

निर्मला: म्हणजे काय?

जनार्दन: सबंध रात्रभर विचार करून माझ्या डोक्यात एक कल्पना आली!

निर्मला: कसली?

जनार्दन: तुमच्या तोंडचा घास कुणी काढून घेण्यापूर्वी...

निर्मलाः म्हणजे?

जनार्दनः मी ऐकल्याप्रमाणे मृत्युपत्रामध्ये फेरफार होण्यापूर्वी...हे सारं करायला हवं!

निर्मलाः काय?

जनार्दनः दिनकररावांच्या नावावर हा बंगला आहे की नाही?

निर्मलाः होय!

जनार्दनः मग मी सांगतो तसं करा. माझ्या ओळखीचा एक गुजराथी बिल्डर आहे, मनीषभाई पटेल. त्याला हा बंगला विकू. येथे तो मोठा १५-१६ माळयांचा टॉवर बंधेल. आपल्याला मोठा चार रूम किचनचा फ्लॅट आणि वरून मोठी भरगच्च रक्कम देईल. हा बंगला अतिशय जुना झाला आहे. इंग्रजांच्या काळातला. शंभर दीडशे वर्षांपूर्वीचा. त्याचं रिनोव्हेशन होऊ शकत नाही. शिवाय काय ते बंगल्याभोवती जंगल माजवून ठेवलंय. केदार सांगत होता की त्याने एकदा एक सर्प बघितला होता. बरं त्याचा पाय त्यावर पडला नाही, नाहीतर दंश केला असता त्याने. बागेत बिळं झाली आहेत. उंदरावळ झाली आहे. मग असं होणार नाही का? धोकादायक?

निर्मलाः पण दादा, तू म्हणतेस तसं करायला... बाबांना न विचारता करायला दिनू मुळीच ऐकायचा नाही.

जनार्दनः (विचार करून) मग... एक काम करू... हा बंगला गहाण ठेवू! मॉर्टगेज. त्यावर दिनूला लोन काढायला सांगू. माझ्या नजरेत एका टॉवर कॉम्प्लेक्स मध्ये मोठा फ्लॅट आहे... चार रूम किचनचा... अरे बापरे... माय गॉड... किती अमेनिटीज आहे त्यात! गार्डन, फाऊंटन, थिएटर आणि ह्या तुझ्या फतरूड गणपती मंदिराला काय करतो भलं मोठं शिवमंदिर!

निर्मलाः दिनकरशी बोल बाबा!

जनार्दनः बरं मी बोलेन त्यांच्याशी. पण हे सर्व होईपर्यंत ह्या बंगल्यात आपण मौजमस्ती करू. मौजमस्ती करायचा ठेका काही आई बाबांनीच घेतला नाही.

निर्मलाः म्हणजे?

जनार्दनः तुला नोकर चाकरही ठेवायचे नाहीत आणि माझ्यासारखा चैनी विलासी पाहुणा आल्यावर तुला सरबराई करणं भाग!... त्याच्यासाठी मी एक मार्ग काढला आहे... मी न्यूयॉर्कला होतो ना तेव्हा एका पंजाबी माणसाने मला एका भल्या मोठ्या गुरूद्वारात नेले होते. तेव्हापासून मी रोज तेथे लंगरला जायचो. म्हणजे अन्नछत्रात. स्वयंपाक करायची कटकट नाही आणि जेवणाचा खर्च नाही... अगदी दोन्ही वेळचं जेवण फुकट! तर सांगायचं काय होतं?... हं! तर तो पंजाबी मला रोज तेथे भेटायचा. आधी तो एका इंडियन रेस्टॉरंटमध्ये कूक- म्हणजे स्वयंपाकी होता... तेथे त्याचं त्याच्या मालकाशी बिनसलं... मग तो यलो कॅब चालवायला लागला म्हणजे टॅक्सी. तोही माझ्याबरोबरच आला. काल त्याच्याशी फोनवर बोलणे झाले. येथे येणार आहे तो मला भेटायला.

निर्मलाः बरं मग?

जनार्दनः त्याला नोकरी नाही आणि रहायची सोय नाही. तो सांगत होता मला त्याची कहाणी... तो न्यूयॉर्कला गेल्यावर भावाने कर्जामुळे घर विकून टाकलं आणि आता ते नवराबायको दहा बाय बाराच्या खोलीत. त्यामुळे ह्याचे वाजले बारा!

निर्मलाः बरं मग तू काय मदत करणार त्याला?

जनार्दनः मी त्याला मदत करीन पण त्यासाठी तुला माझी मदत करावी लागणार.

निर्मलाः काय ती?

जनार्दनः त्याला आपल्याकडे ठेवून घेऊया!

निर्मलाः आपल्याकडे? म्हणजे तो येथे राहणार? आई बाबा आणि दिनकर काय म्हणतील? त्यांना विचारल्याशिवाय!

जनार्दनः अगं माझं पूर्ण ऐकून घे! तो आपल्याकडे राहणार म्हणजे कूक- स्वयंपाकी म्हणून. आणि ड्रायव्हर म्हणून सुद्धा.

निर्मलाः कूक?

जनार्दनः त्याला व्हेज, नॉनव्हेज सर्व प्रकारच्या डिशेस येतात.

निर्मलाः आणि ड्रायव्हर म्हणजे?

जनार्दनः ते एक सिक्रेट आहे! आणि तेही तुमच्या सर्वांच्या फायद्याचं... बरं तो येतच असेल आता. (तेवढ्यात दारावरची बेल वाजते.)

निर्मलाः श्री गणेशाची घंटा न वाजवता आला म्हणजे कोणीतरी नवीनच असणार. (ती दरवाजा उघडते व अनोळखी व्यक्ती दारात उभी असलेली पाहून) कोण पाहिजे आपल्याला?

हरजिंदरः (दारातूनच) वो मेरा दोस्त जॉन... नही जनार्दन!

निर्मलाः हो हो. दादा का? (जनार्दनला) दादा बघ रे! (जनार्दन सोफ्यावरून उठून दरवाज्याकडे येतो.)

जनार्दनः अरे, हॅरी सत् श्री अकाल! ये आत ये. (हरजिंदर आत येतो. गोरापान व तरणाबांड तिशीतल्या हरजिंदरने टी शर्ट व जीन्स पँट असे साधे कपडे घातलेले असून त्याच्या चेहऱ्यावर निरागसता व सोज्वळता आहे. त्याच्याशी आधी हात मिळवितो व नंतर मिठी मारतो.) मेरे यार! हाऊ आर यू?

हरजिंदरः आय ऍम फाईन यार! तू बता, तू कैसा है?

जनार्दनः (त्याचा हात धरून त्याला सोफ्याकडे नेऊन सोफ्यावर बसवितो.निर्मला त्याच्याकडे आशचर्याने बघते.) अगं हाच तो पंजाबी मुंडा! ज्याच्याविषयी मी तुला सांगत होतो. हॅरी ही माझी बहना, सिस्टर निर्मला.

हरजिंदरः (उठून हात जोडून नमस्कार करतो.) नमस्कार ताई. जॉन नेहमी तुमच्याबद्दल सांगायचा. (ती पण हात जोडून नमस्कार करते.)

निर्मलाः (जनार्दनला) दादा तुम्ही बसा, मी फराळ व चहा आणते.

जनार्दनः ताई चहा नको फक्त फराळाचं आण. चहा आहे आमच्याजवळ.

निर्मलाः चहा आहे? (जनार्दन टीपॉयखालची बाटली वर काढून दाखवितो.) काय हे दादा!

जनार्दनः अगं आम्ही दोघं जसे कट्टर मित्र तसंच आमच्या सवयीसुद्धा सारख्याच! ह्यालाही सकाळी... बरं एक ग्लास पण आण. (ती जाते.)

हरजिंदरः अरे फराळ क्या होता है?

जनार्दनः फराळ ना... ? चखणा... मंचींग!

हरजिंदरः अरे पर इतनी सुबह सुबह? ये इंडिया है. अमरिका नही!

जनार्दनः अरे इस बंगले को मैने अमरिका बना दिया है। तू डर मत। डोंट वरी! (निर्मला ग्लास व फराळाचे घेऊन येऊन टी पॉयवर ठेवून निघून जाते. तो दुसरा ग्लास भरतो व त्याला देत ग्लासाला ग्लास लावीत चिअर्स म्हणतो. हरजिंदर भीत भीत पितो.) अरे घबरा मत। मैने चारपाच कार्टून लाए है। और तूने लाए है वो भी इधर लेके आ। अब यही तेरा आशियाँ! डेरा!

हरजिंदरः मतलब?

जनार्दनः अरे तूने मुझे फोन पर जो दर्दभरी कहानी सुनाई उस पर मैने बहुत सोचा और तेरी सारी समस्याओं का हल निकाल के रखा।

हरजिंदरः मै समझा नही।

जनार्दनः देख यार, तुझे नौकरी की सख्त जरूरत है?

हरजिंदरः हाँ यार!

जनार्दनः और तेरा रहने का, खानेपीने का कोई ठिकाना नही है?

हरजिंदरः बिलकुल!

जनार्दनः यही तेरी दो समस्याएँ है?

हरजिंदरः हां यार यही बडी समस्याएँ है।

जनार्दनः तो समझ इसका हल हो गया।

हरजिंदरः कैसे?

जनार्दनः पहली बात. तुझे इस बंगलेमें रहना पडेगा मेरे साथ मेरे रूम में। दुसरी बात, तुझे खाना पकाना तो बहुत अच्छा आता है। तो तुझे तू पकड के पाँच लोगों का खाना बनाना पडेगा।

हरजिंदरः मंजूर।

जनार्दनः सुन, मैने अबतक किसी को बताय नही, तुझे बताता हूँ।

हरजिंदरः क्या?

जनार्दनः मैने एक सेकंड हँड काले रंग की स्कॉर्पिओ फोर व्हीलर खरीदी है। उसकी ड्रायव्हिंग तू करना। (हरजिंदर चिंतेत दिसतो.) अरे खाना पिना फ्री और तुझे नाराज नही करूँगा। महिने का दस हजार दूँगा। बोल कबूल?

हरजिंदरः अरे तू तो काझी के जैसे सवाल पूछ रहा है।

जनार्दनः करेक्ट इन दो नौकरियों से तेरी शादी जो पक्की कर रहा हूँ। (दोघेही हसतात.)

हरजिंदरः कबूल, कबूल, कबूल! तू मेरा सच्चा यार है यार!

जनार्दनः ए फ्रेंड नीड इज अ फ्रेंड इन्डीड!

हरजिंदरः बिलकुल सच्ची बात कही यार तूने। आज मुझे जिस सहारे की जरूरत थी वो तूने दिया। तेरा मुझपर बहुत एहसान हो गया है यार!

जनार्दनः लेकिन दोस्त, इसके बदले में तुझे मेरा एक काम करना पड़ेगा।

हरजिंदरः बोल यार, तेरे लिए जान-ओ-जिगर हाजिर है।

जनार्दनः तू मेरा सच्चा दोस्त तभी बन सकता है जब तू मेरे दुश्मनों का दुश्मन बनेगा।

हरजिंदरः मै समझा नही।

जनार्दनः धीरे धीरे सब समझ जाओगे।

हरजिंदरः समझ रहा हूँ धीरे धीरे। लेकिन जॉन एक बात बता, इन लोगों ने तुझे धक्के मार कर बाहर निकाल दिया। इनकी वजह से तेरा प्यार बिछड़ गया। अपना देश छोड़ना पड़ा। जेल जाना पड़ा। फिर भी तू यहाँ कैसे रह रहा है? कैसे मनाया तूने इन लोगों को?

जनार्दनः गोल्डन की ओपन्स एनी डोअर. सोन्याच्या चावीने कुठलाही दरवाजा उघडू शकतो. साखरपेरणी, मनधरणी, नम्रता ह्यांचं ढोंग! आणि मी सर्वांना छोट्या छोट्या सोन्याच्या वस्तू भेट दिल्यात. ते खूष अँड आय

ऍम रिलॅक्स! आता अशानं सगळयांचा विश्वास संपादन केला की मग धिस फेथ विल रूइन धिस बंगलो. आता ह्या आयत्या बिळात नागोबाने प्रवेश केलाय! वेटोळे घालून बसलाय. एक दिवस असा डंख मारेन ना की.......!

हरजिंदरः म्हणजे अमेरिकेत असताना तू एकदा म्हणाला होतास की मी बदला घेणार..... ते खरं का?

जनार्दनः यस! आय विल टेक रिव्हेंज, बदला, सूड...!

हरजिंदरः म्हणजे... याने के तेरा ये मतलब तो नही के तेरी इस साज़िश में मैं तुझे मदत करूँ?

जनार्दनः ऑबव्हिअसली! यू आर राईट! मेरे दुश्मनों का दुश्मन तू बनेगा। (त्याला एक पेग बनवून देतो व स्वतःही घेतो.)

हरजिंदरः अरे यार, इस साज़िश में मुझे घसीटकर क्यों मुझे पाप का हिस्सेदार बना रहा है?

जनार्दनः हॅरी, अरे अभी बोल रहा था की तेरे लिए जान दे दूँगा और अभी मुकर रहा है?

हररजिंदरः ये तो वही हुआ ना 'आसमान से टपका और खजूर पे अटका।'

जनार्दनः खजूर भी खाने को मिलेगा।

हरजिंदरः और हुजूर के खजूर बनने के सिवा कोई चारा नही।

जनार्दनः   अब आया ना ऊँट पहाड़ के नीचे!

हरजिंदरः  समय पर गधे को भी बाप बनाना पडता है।

जनार्दनः   हाँ! बोल। तू भी मुझे गधा बोल। अरे इस घर के मालिक ने भी मुझे गधा कहा था। गाढव! गाढव काय! आता गाढवाचा नांगर फिरणार या बंगल्यावरून! गधे का हल चलेगा यहाँ। माझ्या कंचनला माझ्यापासून हिरावून घेऊन मला निष्कांचन केलं ना? बघ मी ह्या बंगल्याला कशी आग लावतो ते! बदला लेना है मुझे बदला! क्या क्या सपने देखे थे मैने? मेरे सारे सपनों को जलाकर राख कर दिया इन्होने! ये गुनहगार है मेरे, हॅरी, गुनहगार! इसकी सज़ा मै इनको दूँगा! (दोघांच्या ग्लासात पुन्हा दारू ओतून त्याला देत व स्वतःच्या ग्लासाकडे बघून)

*ही अग्नी शिखेसम लाल*

*सुरेची धार, ही धगधगती ज्वाला*

*करीतसे शितल मम हृदयाला*

चल घे दोस्त हम प्याला ओ हम निवाला (हरजिंदर ग्लास घेतो व दोघे चिअर्स! म्हणून पितात. तेवढ्यात निर्मला येते.)

निर्मलाः   (जनार्दनला) काय दादा? काय लावलंस हे? कुणी पाहिलं तर काय म्हणेल?

जनार्दनः कोण पाहिल आणि कोण काय म्हणेल? जे पाहून काही म्हणतील ते आहेत कुठे इथे काही म्हणायला! अजून तीन महिने बाकी आहेत त्यांना यायला! अजून मुक्काम वाढवून घ्या म्हणावं!

निर्मलाः काय दादा? अरे पण ह्यांनी पाहिलं तर?

जनार्दनः कोण दिनकरराव? ते तर खातात पितात अधून मधून...! बाहेर!

निर्मलाः तुला कसं ठाऊक?

जनार्दनः काय ताई तुलाही ते ठाऊक आहे हे मला ठाऊक आहे. त्यांनी मला येताना स्कॉच व्हिस्कीच्या दहाबारा बाटल्या सांगितल्या होत्या आणायला. तेव्हा त्यांना मी म्हटलं होतं की ताई काय म्हणेल म्हणून...! आणि ते म्हणाले की तिला सर्व ठाऊक आहे.

निर्मलाः आणि त्या तू आणल्यास?

जनार्दनः (छातीवर हात ठेवून) मी त्यांच्या बायकोचा भाऊ आहे! त्यांचा अतिशय लाडका शालक! त्यांनी मला येथे येऊ देण्याची परवानगी मिळवून दिली आणि ती म्हण खरी करून दाखविली!

निर्मलाः कोणती म्हण?

जनार्दनः जोरू का भाई एक तरफ और सारी दुनिया एक तरफ! (तेवढ्यात दिनकर बेडरूममधून हॉलमध्ये येतो. त्याच्या अंगावर नाईट ड्रेस आहे.)

दिनकरः (निर्मलास) अगं गिझर चालू कर. उशीर झाला आज खूप! (ती जाते. जनार्दन व हरजिंदरकडे बघून, आश्चर्याने) जनू तुम्ही? आणि हे काय? एवढ्या सकाळी सकाळी?

जनार्दनः (उभा राहून त्याचे हात धरून सोफ्यावर बसवितो.) बसा दिनकरराव (दिनकर हरजिंदरकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघतो. ते पाहून) तुमची ओळख करून देतो. (हरजिंदरच्या खांद्यावर हात ठेवून) ये मेरा यार... माझा जिगरी दोस्त! पंजाब दा शेर! हॅरी... सॉरी हरजिंदर सिंग (हरजिंदर वाकून दिनकरच्या पायांना स्पर्श करतो. दिनकर पाय मागे घेतो व त्याला उठवितो.)

दिनकरः अरे... अरे भाईसाहब ये क्या कर रहे है आप? आप मेरे से बड़े है।

हरजिंदरः लेकिन रिश्ते में तो आप बडे है। जॉन... जनार्दन के बहनोई तो मेरे भी बहनोई हुए ना? (टी पॉयवर मांडलेल्या आरासकडे बघून शरमेने) इस के लिए मै शरमिंदा हूँ। माफ करना।

दिनकरः कोई बात नही भाईसाहब। (जनार्दनकडे बघून) पण हे एवढ्या सकाळी?

जनार्दनः अहो दिनकरराव, न्यूयॉर्कमध्ये असताना ह्याची पण नाईट ड्यूटी आणि माझी पण! हा आणि मी सायंकाळी एकाच वेळी कामावर निघायचो व दोघेही सकाळीच घरी पोहचायचो. मग ब्रश आणि शॉवर केल्यावर आमच्या दोघांचा सकाळचा चहा हाच... बकार्डी ब्लॅक रम... बिगर दुधाच्या चहासारखा रंग... चहाने झोप उडते पण हिच्याने...! (हसतो.) दिनकरराव, एक रिक्वेस्ट होती.

दिनकरः असे काय करता सांगा ना!

जनार्दनः आपला हा एवढा मोठा बंगला... पण एकही नोकर चाकर नाही की स्वयंपाकी नाही. हा माझा दोस्त आहे ना, हा न्यूयॉर्कमध्ये इंडियन रेस्टॉरंटमध्ये काम करायचा. त्याला सर्व इंडियन व्हेज नॉनव्हेज डिशेस येतात. आजपासून आपला हा कूक... स्वयंपाकी. चालेल ना?

दिनकरः अं... (विचार करतो.) पण ह्यांची तयारी आहे?

जनार्दनः अगदी फुल्ल! आणि आम्ही एकाच रूममध्ये राहू बाबांच्या.

दिनकरः ठीक आहे. जशी तुमची मर्जी. मी अंघोळ करून येतो. (तो जातो.)

जनार्दनः (हरजिंदरच्या पाठीवर थाप मारून) खूष! अरे यार, मेरे नाल रहोगे तो ऐष करोगे! (दोघेही हसतात.) तू एक काम कर. आगे जो चौक है ना उसके बाजू में देसाई यूज्ड कार्स करके शोरूम है। ये रिसीट ले (काढून देतो.) उनको तेरा इंटरनॅशनल ड्रायव्हिंग लायसन्स दिखाना। मै फोन करता हूँ। वहाँ मैने एक यूज्ड ब्लॅक कलर की स्कॉर्पिओ गाडी खरीदी है वो लेके आना। और ये ले। (खिशातून नोटांचे पुडके काढतो) फ्रेश चिकन, मटण, फिश, और जो भी स्पाईसेस तुझे लगते है वो सब और फ्रुट्स, सोडा लेके आना। नॉनव्हेज बहुत दिन से खाया नही। फटाफट जाके जल्दी आना और खाना बनाना। (तो जातो. आतून निर्मला येते.) ताई आज तारीख काय गं?

निर्मलाः का रे?

जनार्दनः आज चौदा नोव्हेंबर ना?

निर्मलाः होय. का? (एकदम लक्षात येऊन) अरे? दादा?

जनार्दनः (दोन्ही हात पुढे करतो) हॅपी बर्थ डे टू यू!

निर्मलाः (खूष होऊन हाती हात घेत) थॅंक्यू दादा!

जनार्दनः बघ तुझा बर्थ डे ना तुझ्या लक्षात, ना तुझ्या सासू सासऱ्यांच्या लक्षात, ना तुझ्या नवऱ्याच्या, ना मुलाच्या लक्षात! काय एंजॉय करता तुम्ही लाईफ? ओके! ह्या आनंदाच्या दिवशी मी तुझ्याजवळ काहीतरी मागणार आहे.

निर्मलाः अरे ज्याचा बर्थ डे असतो त्याला काही द्यायचं असतं! उलट तू काय मागणार आता? बरं ठीक. माग काय हवंय तुला.

जनार्दनः बघ हं! नाही म्हणायचं नाही.

निर्मलाः बरं बाबा! पण माझ्या अखत्यारीत असेल तर हो म्हणेन.

जनार्दनः दॅट्स गुड सिस्टर! बघ... आज तुझा बर्थ डे! मी म्हणेन आणि करेन तसा साजरा करायचा. ओके?

निर्मलाः म्हणजे नेमकं काय करणार आहेस तू?

जनार्दनः ते तू माझ्यावर सोड. आणि थोडं इथे बैस. संडे आहे ना आज?

निर्मलाः अरे रविवार असला तरी स्वयंपाकाचं बघावं लागणार मला!

जनार्दनः फ्रॉम टुडे यू डिव्होर्स द किचन! किचनला आजपासून सोडचिठ्ठी!

निर्मलाः (आश्चर्याने) म्हणजे?

जनार्दनः (तिचा हात हाती घेत) बैस येथे. (ती त्याच्यासमोर बसते) बरं ते नंतर सांगतो. आई जाताना केदारला काय म्हणत होती की, “कुणाच्याही मोटरसायकलवर बसायचं नाही! रिक्षाने जात जा कुठे जायचे असेल तेथे.”

निर्मलाः होय, त्याच्या सुरक्षिततेसाठी. एकदा तो गेला होता त्याच्या मित्राच्या मोटारसायकलवर आणि पडला! बरं काही लागलं नाही त्याला!

जनार्दनः आता ती समस्याच मिटली.

निर्मलाः म्हणजे?

जनार्दनः तुझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने फोर व्हिलर घेतली आहे. येईलच आता तासाभरात तुझ्या दारात.

निर्मलाः (आश्चर्याने) काय बोलतोस? आणि एवढे पैसे!

जनार्दनः तू पैशांची काळजी करू नकोस. आज तुझा वाढदिवस आहे ना? आधीपासून तजवीज करुन ठेवली होती. आता फक्त केदारचाच नाही तर तुम्हा सर्वांचा प्रश्न सुटणार! तू अधूनमधून शॉपिंगला घेऊन जात जा!

निर्मलाः आणि ड्रायव्हर?

जनार्दनः आपला हॅरी...हरजिंदर थ्री इन वन. ड्रायव्हर, कूक आणि इतर कामांसाठीही. (दिनकर येतो.)

दिनकरः काय गप्पा चालल्यात भावा-बहिणीच्या!

निर्मलाः अहो, ऐकलंत का? दादाने फोर व्हिलर घेतली माझ्या बर्थडेला!

दिनकरः (आश्चर्याने) काय? आज तुझा बर्थ डे?

निर्मलाः (लटक्या रागाने) विसरलात ना? आणि दादाने पंधरा दिवसांपूर्वीच तयारी करून ठेवली!

दिनकरः (ओशाळून) अगं! सॉरी हं (हात पुढे करीत) मेनी हॅप्पी रिटर्नस् ऑफ द डे! माय फेअर लेडी!

निर्मलाः (रागाने) हूं.... नका खोटं प्रेम दाखवू! तुमच्याकडूनही गिफ्ट हवं मला! आणि ते म्हणजे सोन्याचा नेकलेस (फणकारत निघून जाते.)

दिनकरः आली का पंचाईत!

जनार्दनः का? काय झालं?

दिनकरः अहो, बऱ्याच दिवसांपासून हट्ट करतेय! एके दिवशी ही अंगठी (बोटातील अंगठी दाखवितो) गच्च व्हायची म्हणून ज्वेलरकडे गेलो. तेव्हा ही तुमची बहना पण होती बरोबर. तिथे तिने शोकेसमध्ये लावलेला नेकलेस बघितला. तो होता चार तोळयांचा.....एक लाख वीस हजारांचा...तेव्हापासून हट्टच धरलाय! आता तुम्हीच सांगा जनूभाऊ,

एवढे पैसे आणायचेत कोठून? घरात किती दागिने पडलेत. माहेरचे सासरचे!

जनार्दनः तेच का चोरीला गेले होते ते?

दिनकरः होय तेच. चांगले ३०/३५ तोळयाचे आहेत. पण नाही, तोच नेकलेस तिला हवा! स्त्री हट्ट आणि बालहट्ट ह्यापुढे काहीही चालत नाही. मोठ्या पेचात पडलोय मी!

जनार्दनः तुम्ही काहीही काळजी करू नका दिनकरराव. तुमच्या ह्या पेचप्रसंगातून मी सोडवतो तुम्हाला. माझ्याकडे बिस्किटे आहेत....सोन्याची १०/१२ आजच सायंकाळी चला घेऊन मला त्या ज्वेलरकडे. केक कापण्याआधी गळयात घाला तो नेकलेस ताईच्या!

दिनकरः (अचंबित आणि हर्षभरीत होत, जनार्दनच्या गळयाला मिठी मारतो.) वा! वा! जनूभाऊ ग्रेट आहात तुम्ही!

जनार्दनः पण माझी एक रिक्वेस्ट आहे ती तुम्ही स्विकारली तर मला खूप आनंद होईल. आय विल बी व्हेरी हॅप्पी!

दिनकरः यस! आय विल डू व्हॉट एव्हर यू वॉन्ट! आफ्टर ऑल जोरू का भाई एक तरफ और सारी दुनिया एक तरफ!

जनार्दनः (बाटलीतून ग्लासात एक पेग भरतो) मग घ्या एवढा पेग!

दिनकरः अहो पण एवढ्या सकाळी!

जनार्दनः अहो अमेरिकेत आता रात्र होत आली असणार. घ्या (तो पण ग्लास घेतो. दोघे चिअर्स म्हणतात) आणि ही माझ्या स्टॉकमधली आहे बरं का.

तुमचा स्टॉक अगदी सेफ पॅक आहे. चांगला ३/४ महिने पुरेल आई-बाबा येईपर्यंत. (केदार येतो. दिनकर पटकन ग्लास संपवून टिपॉयवर ठेवतो)

केदारः पप्पा, तुम्हाला मम्मी बोलावतेय आत. (दिनकर आत जातो.) जनार्दनकडे व टीपॉयवरच्या ग्लास बाटलीकडे पाहून) काय मामा एवढ्या सकाळी?

जनार्दनः म्हणजे तू सायंकाळी घेतोस वाटतं?

केदारः (जीभ चावीत) नाही...तसं नाही... !

जनार्दनः (त्याच्या खांद्यावर हात ठेवीत) डोन्ट बी शाय माय चिकन! आय ऍम नॉट युवर पेरेन्ट्स ऑर ग्रँड पेरेन्ट्स! यू जस्ट बिहेव विथ मी ऍज अ फ्रेंड. आणि त्या टपोरी मित्रांबरोबर त्या घाणेरड्या डर्टी बारमध्ये जाऊन ती डुप्लिकेट दारू कशाला पितो? अरे तुझ्या मामाने तुमच्यासाठी जेन्युइन ओल्ड अँड ओरिजनल स्कॉच व्हिस्की, रम आणलेली आहे.

केदारः (शरमून) पण मामा हे तुम्हाला कसं... ?

जनार्दनः अरे, केदू आय नो एव्हरीथिंग! अँड आय ओल्सो नो द रिझन बिहाइंड युवर ड्रिंकिंग. का पितोस तेही ठाऊक आहे मला. पण मी तुला माझ्यासारखा बरबाद होऊ देणार नाही.

केदारः पण हे सारं तुम्हाला कसं ठाऊक?

जनार्दनः अरे हम उडती चिडिया के पंख गिनने वालो में से है बच्चू! पण ह्या चिमणीला तू जाळयात टाकले की तिने?

केदारः (किचनच्या दरवाज्याकडे बघत हळूच) मामा तुम्ही माझ्या पाळतीवर तर नसता ना?

जनार्दनः तसंच काही नाही... पण एकदा मोबाईलच्या दुकानात तुम्हा दोघांनाही मोबाईल आणि प्रेम रिचार्ज करताना बघितले. स्मार्ट ब्युटिफुल लेडी! आय मिन डॅमझल... मग काढला माग... अंजली देशमुख!

केदारः (घाबरून) अहो मामा हळू बोला.

जनार्दनः ह्या बंगल्यातील सर्वांचा विरोध आहे तुझ्या ह्या अफेअरला... म्हणून? (तो खाली मान घालून होकार देतो.) डोंट वरी! मी सर्व तपास केलाय. कॉर्पोरेटर जयंतराव देशमुखांची ज्येष्ठ कन्या... ऍम आय राईट?

केदारः ऍब्सल्यूटली!

जनार्दनः पण मला हे सांग साऱ्यांचा विरोध का तुझ्या प्रेमाला? की प्रेमाचा विटाळ आहे ह्या बंगल्याला?

केदारः काय झालं मामा, ती एकदा स्कूटरवरून येऊन थेट बंगल्याच्या गेटमधून आत शिरली व तिने हॉर्न वाजविला. बाबा तेथेच झाडांना पाणी घालीत होते. त्यांच्याकडे बघून तिने त्यांना डायरेक्ट विचारले, “केदू आहे का?” बाबा म्हणाले “कोण केदू?” तर तिने म्हटले कसे, “अहो माळीबुवा, केदार दिनकर दामले.” त्यांनी लगेच मला हाक मारली. मी बाहेर येऊन पाहतो तर ती स्कूटरवरूनच मला “हाय केदू!” असे म्हणाली. मी एकदम

वरमलो व तिला जायला सांगितले. ती फणकाऱ्याने निघून गेली. पण त्यानंतर घरात केवढा गदारोळ माजला! तिला कधीही न भेटण्याची मला सक्त ताकीद मिळाली.

जनार्दनः पण तिला भेटल्यावाचून तू राहत नाहीस, ओके? तिला भेटल्यावाचून तुझं पोट भरत नाही. (हसत त्याच्याकडे गमतीने रोखून बघत) आणि बऱ्याच दिवसांपासून उपाशी आहेत? (केदार लाजतो) डोळे रे! (दोघेही हसतात) मग करू मॅनेज सगळं?

केदारः इज इट पॉसिबल?

जनार्दनः यस! इट्स नॉट इम्पॉसिबल माय सनी बॉय! (एक पेग भरतो व त्याला देतो) इट्स अ टोस्ट! पटकन घे! (तो कां कू करतो) अरे मार पटकन. (तो पटकन घेतो) दॅट्स गुड बॉय! नाऊ आय विल ट्राय माय बेस्ट टू सॉल्व्ह युवर प्रॉब्लेम!

केदारः (जनार्दनला मिठी मारत) मामा यू आर ग्रेट! (रडत) तुम्ही आम्हा दोघांना आत्महत्येपासून वाचवलंत.

जनार्दनः (आश्चर्याने व चिंतेने) काय? तुम्ही दोघं?

केदारः होय मामा. त्याशिवाय आमच्याजवळ पर्यायच नव्हता.

जनार्दनः डू नॉट वरी. युवर लव्ह विल डेफिनेटली फाइंड अ वे!

केदारः मामा, माझा अजून एक प्रॉब्लेम आहे.

जनार्दनः काय? (तो कां कू करतो.) अरे सांग, मी तुमचे सर्व प्रॉब्लेम्स सॉल्व्ह करण्यासाठीच आलो आहे येथे! बोल.

केदारः मामा, सहा महिन्यांपासून प्रयत्न करतोय पण नोकरी मिळत नाही.

जनार्दनः ओ आय सी! जॉब! कळलं नोकरी नाही तर छोकरी नाही... ! डोंट वरी... उद्या आपण आपल्या गाडीने जाऊ. एका गुजराती माणसाची कंपनी आहे इम्पोर्ट-एक्सपोर्ट ची. तो अमेरिकेत इंडियन रेस्टॉरंट्स आणि ग्रोसरीजना सर्व काही वस्तू पुरवितो. अरे त्याच्यासाठीच तर आलोय. मला तो बिझनेस पार्टनर बनवून घेणार आहे. तो एक्सपोर्टर आणि मी डिस्ट्रिब्यूटर! तू तुझी रेझ्युमे वगैरेची फाईल तयार ठेव. उद्याच तुझं काम करतो. माझ्या बॅगेत लॅपटॉप आहे. तुझ्यासाठी आणलाय. ॲक्टिव्हेट कर.

केदारः व्हेरी व्हेरी थँक यू मामा! पण तुम्ही काय म्हणालात?...गाडी! (तेवढ्यात बाहेरून गाडीचा हॉर्न वाजतो.)

जनार्दनः यस! गाडी! फोर व्हिलर! स्कॉर्पिओ! (हरजिंदर आत येतो)

हरजिंदरः यस बॉस! (खाली वाकून नमस्कार करतो.)एव्हरीथिंग इज ओके! आय ब्रॉट द कार स्कॉर्पिओ. यू कॅन सी इट फॉर माय प्लेजर! (तो जातो)

जनार्दनः थँक यू! यू आर गुड शोफर! (सगळा गोंगाट ऐकून निर्मला व दिनकर बाहेर येतात.)

दिनकरः काय झालं?

केदारः पप्पा मम्मी बघा मामाने फोर व्हिलर आणली! (सर्व अचंबित होऊन दरवाज्यातून बाहेर बघतात.)

निर्मलाः अय्या खरंच की दादा! (हरजिंदर सर्व सामान घेऊन येतो.)

दिनकरः आणि हे काय?

जनार्दनः अहो दिनकरराव आज आमच्या बहनाचा बर्थ डे! वाढदिवस! तेव्हा आज आपण एन्जॉय करू. कधी नव्हे तो साजरा झाला असेल असा अविस्मरणीय वाढदिवस आज साजरा करू. (केदारला) केदार जा. मम्मीला मदत कर. हरजिंदर आहेच. बऱ्याच दिवसांपासून नॉनव्हेज डिशेस खाल्ल्या नाहीत. आज धमाल करू. इट, ड्रिंक अँड बी मेरी, फॉर टुमॉरो वी डाय! (तेवढ्यात फोन वाजतो. केदार उचलतो.)

केदारः मामा कुणीतरी बाई बोलतेय अमेरिकेहून.

जनार्दनः (रिसिव्हर उचलीत त्यावर हात ठेवून) ताई, केदार तुम्ही जा किचनमध्ये. हरजिंदरला मदत करा. (ते जातात.) हॅSSलो! (ऐकून) ओSS सेनोरिताSS माय डिअर जुनिता! हाऊ आर यू? (ऐकून) आय ऍम फाईन! बट टेल मी माय डिअर, हाऊ यू गॉट धिस नंबर? (ऐकून) ओ... फ्रॉम माय डायरी? इज इट विथ यू? बी केअरफुल अँड कीप इट सेफ! डोंट गिव्ह इट ऑर डोंट शो इट एनीबडी! यस यस आय ऍम कमिंग सून... नो नो... हाऊ आय फरगेट यू माय लिटिल स्कायलार्क माय स्वीट स्क्विरल? यस यस आय विल ब्रिंग द व्हेरी प्रेशियस गिफ्ट फॉर यू! डोंट वरी! ओके?.. यस... यस ग्रेशियस...! (फोन ठेवतो.) स्पॅनिश पोरगी आहे फार जीव टाकते माझ्यावर. अशी प्रेम करणारी माणसं असली की स्वतःवरचंच प्रेम आणि गर्व वाढतो. पण माणसाला एकच हृदय असतं

ना? ते मी ऑलरेडी दिलेलं आहे त्यामुळे ती बिचारीही दुर्दैवी आणि मीही! ओके! फरगेट इट!! (तेवढ्यात निर्मला येते व ती दिनकरला काही सांगणार तोच)

दिनकरः काय गं काय झालं?

निर्मलाः अरे ते...

जनार्दनः ते जाऊ दे मी काय म्हणतो ते तुम्ही दोघंही नीट ऐका. मी कुठल्या कामासाठी आलोय तुम्हाला ठाऊक आहे ना?

दिनकरः कुठल्या?

जनार्दनः अहो बिझनेस!

दिनकरः कसला बिझनेस?

जनार्दनः हे बघा दिनकरराव! न्यूयॉर्कमध्ये खूप इंडियन ग्रोसरीज आहेत. त्यांना इंडियातून माल पुरवायचा. स्पाईसेस... पापड लोणची, डाळी इ. इ. मी आत्तापर्यंत दहा पंधरा दुकानांच्या ऑर्डर्स घेतल्या आहेत. किमान दोनतीन कंटेनर्स भरतील एवढा माल खरेदी करून तो, बाय शीप पाठवायचा. मला त्यासाठी एका हुशार तरूणाची गरज होती. तो सापडला.

दिनकरः कोठे?

जनार्दनः अहो आपल्याच घरात! काखेत कळसा आणि गावाला वळसा! आपला केदार!

दिनकरः तो काय बरं तुम्हाला मदत करील?

जनार्दनः अहो, हिरा आहे केदार हिरा! तुम्हाला काय त्याची कदर?

निर्मलाः म्हणजे?

जनार्दनः म्हणजे केदार एक्स्पोर्टचं सांभाळील आणि तो माल न्यूयॉर्कमध्ये आल्यावर मी डिस्ट्रिब्यूट करीन. कशाला इंडियातल्या फडतूस नोकऱ्या शोधायला लावता त्याला? किती मिळणार महिन्याचे २५/५० हजार रुपये? तो तेवढे अमेरिकन डॉलर्स कमविल! कमीत कमी इंडियन रुपीज? ....५/६ लाख! (निर्मला व दिनकर एकमेकांकडे हर्षाने बघतात व दोघेही थँक यू म्हणतात.)

दिनकरः पण केदारला हे ठाऊक आहे सर्व?

जनार्दनः आमचं आधीच प्लॅनिंग झालंय सारं! फक्त तुमच्या दोघांची परवानगी हवी होती.

निर्मलाः अरे दादा, तुझे किती उपकार होताहेत आमच्यावर, नाही काहो? (दिनकरला) सहा महिन्यांपासून नोकरीच्या शोधात होता.

जनार्दनः मी आलो ना आता बहना, सर्व प्रॉब्लेम सॉल्व्ह होतील तुमचे. बिलीव्ह मी! पण एक सांगू? म्हणजे एक रिक्वेस्ट होती.

निर्मलाः काय दादा सांग ना!

जनार्दनः केदारच्या रुममध्ये फक्त केदारने रहावे व त्याने मी सांगितल्याप्रमाणे लॅपटॉपवर सर्व कामे करावीत.

दिनकरः ठिक आहे.

जनार्दनः अहो पण मी आणि आता सोबत हरजिंदर पण आहे. त्याला आमची अडचण नको व्हायला.

निर्मलाः मग?

जनार्दनः दिनकरराव, प्लीज डोंट माईंड! आम्हाला बाबांची अभ्यासिका हवी होती.

दिनकरः मग घ्या ना ती.

जनार्दनः अहो पण ते किती जाडी जाडी पुस्तके आहेत तेथे?

निर्मलाः मग? वाचायची आहेत? (तो हसतो)

जनार्दनः अगं बहना, मी दोन चार गोण्यांमध्ये भरून ती सारी पुस्तके खाली तळघरात ठेवतो. चालेल? तू काळजी करू नकोस. आई बाबा येण्याच्या आत अगदी जशीच्या तशी लावून देईन. पण फक्त एवढ्या २/३ महिन्यांसाठी! प्लीज ताई! दिनकरराव! तुम्ही तसदी घेऊ नका, हरजिंदर आणि मी, आम्ही ठेवू व्यवस्थित.

दिनकरः ठीक आहे. पण बाबा येण्याच्या आत जशीच्या तशी व्यवस्थित ठेवून द्या. मी येऊ का मदतीला तुमच्या?

जनार्दनः ओ! नो! इट्स नॉट ए बीग डील!

दिनकरः अगं चावी दे त्यांना तळघराची! (आत जाते व चावी आणून त्याच्या हातात देते)

निर्मलाः हे बघ दादा, ह्या जुडग्यातली ही स्टीलची चावी दारावरच्या कुलुपाची आहे. पुस्तकं ठेवून झाल्यावर परत माझ्याकडे दे. हरवायला नको!

जनार्दनः तू त्याची काळजी करू नको. हॅरी.... हरजिंदर किचनमध्येच आहे ना?

निर्मलाः होय...चांगला स्वयंपाकी आहे. फटाफट ५/६ प्रकार करून टाकले नॉनव्हेजचे त्याने!

जनार्दनः बघतो मी जाऊन आणि जातो त्याला तळघरात घेऊन! त्याच्याकडून पुस्तकांच्या गोण्या घेतो वाहून. (तो जातो. तेवढ्यात गणेश मंदिराची घंटा वाजते. निर्मला जाऊन दरवाजा उघडते. दारात यशवंत असतो)

निर्मलाः अरे वा! काका, याना!! अहो ऐकलंत का? यशवंत काका आलेत.

दिनकरः या या, काका बऱ्याच दिवसांनंतर बंगल्याला पाय लावलेत.

यशवंतः काय करणार, थोडा बिझी होतो. (हातातील साडीचे पॅकिंग तिच्या हातात देत) मेनी हॅपी रिटर्नस् ऑफ द डे! हॅपी बर्थ डे!

दिनकरः ओ! काका तुमच्या लक्षात होता हिचा बर्थ डे?

निर्मलाः तुमच्यासारखे विसराळू आणि निर्दयी नाहीत ते!

यशवंतः बरं, कसं चाललय? महेश आणि वहिनींचा फोन येतो ना?

दिनकरः आमचं उत्तम! बाबा आणि आई पण तिकडे मजेत आहेत. तुम्हालाही येत असतील ना त्यांचे फोन?

यशवंतः होय, वहिनींच्या तब्येतीत बरीच सुधारणा झाली आहे. तरी पण... म्हणजे महेश यायला म्हणत होता. तुमची साऱ्यांची आठवण येते आहे दोघांना! पण डॉक्टरांनी त्यांना पूर्ण कोर्स करायला सांगितला म्हणजे पुन्हा त्रास व्हायला नको... त्यांना सांगितलंय की अजून फक्त तीन महिने राहिलेत. आणि तसं माझं लक्ष आहेच बंगल्याकडे! तेव्हा त्यांना हायसे वाटले. (तेवढ्यात आतून जनार्दन येतो.)

जनार्दनः (यशवंतकडे बघून) ओ हाऊ हॅपी आय ऍम टू सी यू!

यशवंतः आय ऍम टू!

जनार्दनः हाऊ आर द किड्स? मिन्स चिल्ड्रन?

यशवंतः आय डोंट हॅव एनी किड.

जनार्दनः हाऊ इज युवर वाईफ? मिन्स आंटी?

यशवंतः आय ऍम नॉट मॅरीड!

जनार्दनः (वरमून) हाऊ आर यू?

यशवंतः आय ऍम फाईन. (सारे मोठ्याने हसतात. तेवढ्यात हरजिंदर कचऱ्याची कुंडी घेऊन येतो.)

दिनकरः हॅरी साहब ये क्या है?

हरजिंदरः गारबेज! बाहेर टाकून येतो.

जनार्दनः अहो कचरा! (हरजिंदरला) तुम बाहर ठहरो मैं आता हूँ।

हरजिंदरः ओके. (तो जातो.)

जनार्दनः सॉरी! मला एक महत्त्वाचे काम आठवले. मी जाऊन येतो बाहेर. आय विल बी राईट बॅक! (तो जातो.)

यशवंतः हा जॉन, काही गडबड तर नाही केली ना ह्याने?

निर्मलाः नाही हो काका असं कसं बोलता?

यशवंतः बाहेर गेटजवळ मी ती काळी स्कॉर्पिओ गाडी बघितली. ती कुणाची?

दिनकरः अहो काका ती जानूने त्याच्या बहिणीला वाढदिवसाची गिफ्ट दिलेली आहे. आजच आणली.

यशवंतः आणि तो कचरावाला कोण होता?

निर्मलाः अहो काका तो दादाचा मित्र. त्याला दादाने कूक आणि शोफर म्हणून ठेवलंय.

यशवंतः अस्सं! बंगल्याची शोभा वाढविली म्हणजे, तुझ्या दादाने?

दिनकरः एवढंच नाही काका! केदारला काम मिळवून दिले. अमेरिकेलाही जाऊ शकतो तो जानूबरोबर!

यशवंतः अस्सं? अजून काय काय भूलथापा... नाही पराक्रम केलेत ह्याने?

निर्मलाः नाही काका... माझा भाऊ तसा नाही!

यशवंतः इतका विश्वास आणि भरवसा आहे तुमचा त्याच्यावर? फार भोळी पोरं आहात तुम्ही! टाईम विल टेल! पण सावध रहा एवढंच सांगायला आलो होतो. महेश आणि वहिनीला हे सारं कळलं असतं तर ह्या क्षणी ते इथे आले असते. पण त्यांची तब्येत आणि प्रकृती आणि डॉ.चा सल्ला ह्यामुळे मी त्यांना इत्थंभूत सांगितलं नाही. तुम्हाला काय वाटलं मी इथे येत नाही म्हणून मला काहीच ठाऊक होत नाही?

दिनकरः काका तुम्ही माझ्या बायकोच्या भावाविरूद्ध काही बाही बोलता आहात. तुम्ही माझ्या बाबांचे मित्र म्हणून ऐकून घेतलं. नाही तर.....!

यशवंतः नाही तर काय दिनू?.... अं.... अरे सारी दुनिया एक तरफ और जोरू का भाई एक तरफ... मग तेथे माझी काय किंमत?

(दिनकर व निर्मला दोघेही एकदम रागात) काका!

यशवंतः ठीक आहे जातो मी! पण लक्षात ठेवा हा गाढव तुमच्या बंगल्यावर गाढवाचा नांगर फिरविण्याचा विडा उचलून आला आहे. देव तुमचे रक्षण करो! (जातो.)

दिनकरः निमू अगं हा काका!!

निर्मलाः माझा भाऊ अमेरिकेहून काय आला.... सर्वांना त्याचा राग... लोकांना सहन होत नाही दिनू दुसऱ्यांचा उत्कर्ष, सुख, आनंद! माझा भाऊ केवळ माझ्यासाठीच नाही तर तुमच्यासाठी, केदारसाठी देव बनून आला. ते त्यांना सहन झाले नाही. ह्यापुढे त्यांनी माझ्या भावाच्या विरोधात एक शब्दही काढलेला मला आवडणार नाही आणि तुम्हीही आवडून घेऊ नका! तुम्हाला माझी शपथ!

दिनकरः  नाही निर्मला. नाही ऐकून घेणार मी त्यांच्या विरोधात. तू काही काळजी करू नकोस! आज तुझा वाढदिवस, तुझ्या चेहऱ्यावर मला फक्त आनंद आणि हास्य बघायचेय, फक्त हास्य! डोंट वरी, बी हॅपी! असं वाटतं आपले सोनेरी दिवस आलेत. ज्या दिवशी आपले लग्न झाले तो दिवस आठवण्याचा हा दिवस! गुड मेमरीज ऑफ गोल्डन डेज! मौज मस्ती करू! नाचू! बागडू!!

निर्मलाः  खरंच! आनंदात सहभागी झाल्यावर आनंद द्विगुणित होतो.

दिनकरः  मी राजा तू राणी गाऊ आनंदाने गाणी.

निर्मलाः  मलाही किती आनंद झाला ते मला वर्णन करता येत नाही!

दिनकरः  तू म्हणालीस ना निर्मला की आनंदात सहभागी झाल्यावर आनंद द्विगुणित होतो म्हणून?

निर्मलाः  मग?

दिनकरः  (तिचे दोन्ही हात हातात धरून) तू पण आज आमच्या मौजमस्तीत सहभागी व्हायचंस.

निर्मलाः  म्हणजे? कशात?

दिनकरः  खाणं, पिणं, मौजमस्ती, नाचगाणं!

निर्मलाः  (लाजते) काय हो असं? बरं ठीक आहे. पण एक अट आहे.

दिनकरः  काय?

निर्मलाः माझं गिफ्ट मला मिळायला हवं.

दिनकरः कोणतं गिफ्ट बुवा?

निर्मलाः काय हो? विसरलात की विसरायचं ढोंग चाललंय?

दिनकरः काही केल्या आठवेना!

निर्मलाः (रागाने) नेकलेस!

दिनकरः अरे हो विसरलोच! ओ माय डियर नाईटिंगेल! डोंट वरी! आय हॅव ऑलरेडी... !

निर्मलाः हो? नाईटिंगेल! डोंट वरी! म्हणून फसवू नका मला!

दिनकरः नेव्हर, बिलकुल नाही! तू बर्थ डेचा केक कापला आणि तुझ्या प्रेमळ हातांनी तो गोड मधाळ तुकडा माझ्या तोंडात टाकला की तात्काळ तुझ्या गळयात तो नेकलेस मी टाकलाच म्हणून समज!

निर्मलाः (अतिशय आनंदाने त्याला मिठी मारीत) अय्या! खरंच?

दिनकरः यस, माय लव्ह! बिलिव्ह मी! माय डार्लिंग!

निर्मलाः मला विश्वास नाही वाटत! (जनार्दन अचानक येतो.)

जनार्दनः मग शपथ घ्या! शपथ घ्या!!

निर्मलाः नको शपथा नको.

जनार्दनः का गं बहना?

निर्मलाः शपथा घेणारा खोटारडा असतो.

दिनकरः मग?

निर्मलाः अंतःकरणावर हात ठेवून निर्मळ वचन द्या! (दिनकर एक हात स्वतःच्या छातीवर व दुसरा हात तिच्या हातावर ठेवतो.)

दिनकरः दिले मी वचन तुला!

ठेवून हृदय साक्षीला!

पडदा.

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

सहा महिन्यांचा काळ लोटलेला असतो. पडदा वर जातो तेव्हा हॉलची परिस्थिती, अवस्था पूर्णपणे बदललेली दिसते. रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, सरस्वती देवी इ. सारी जुनी पेंटिंग्ज जाऊन तेथे मायकेल जॅक्सन, मर्लिन मन्ऱो इ. अमेरिकन फोटो लावलेले दिसतात. टीपॉयवर पुस्तके, मासिके किंवा वर्तमानपत्रांऐवजी उंची मद्याच्या बाटल्या, ग्लासेस व काही मंचींगच्या पदार्थांच्या डिशेस दिसतात. त्याच्याच बाजूला ऑडिओ सीडी प्लेअर लावलेला असतो. पडदा वर जातो तेव्हा रंगीबेरंगी झगमगत्या प्रकाशांनी रंगमंच उजळलेला दिसतो. ऑडिओ सीडी प्लेअर चालू असून धुंद करणारे अमेरिकन संगीत सुरू होते. हे अमेरिकन हक्लेबक् नावाचे बॉल डान्सचे संगीत असते. जनार्दन प्रवेश करतो. डान्स करीत. त्याने चित्रविचित्र अमेरिकन पोषाख केलेला असतो व डोक्यावर हॅट असते. त्याच्या पाठोपाठ केदारही डान्स करीत येतो. त्यानेही अमेरिकन पेहराव घातलेला आहे. त्याच्या मागून डान्स करीत दिनकर येतो, त्यानेही मॉडर्न कपडे घातले आहेत. त्याच्या मागोमाग निर्मला येते. तिनेही टी शर्ट, तंग जीन पॅंट, पोनीटेल केशरचना केलेली असून तीही डान्स करीतच येते. मध्यभागी जनार्दन डान्स करतो व त्याच्याभोवती फेर धरून हातात हात घालून केदार, दिनकर व निर्मला नाचतात. दोन-तीन मिनिटे ते नाचण्यात गर्क असतात....सगळा रंगमंच

दुमदुमून जातो. दरवाजा उघडाच असतो....अचानक महेश व उमा दरवाजातून प्रवेश करतात. त्यांच्या हातात प्रवासी बॅगा असतात. हे सारं विचित्र दृष्य बघून स्तंभित होतात. त्यांच्या हातातील बॅगा खाली गळून पडतात. नाचणाऱ्यात फक्त केदारचेच लक्ष त्यांच्याकडे जाते. तो निर्मला व दिनकरचा हात सोडून ऑडिओ सीडी प्लेअर बंद करतो. नृत्य करणारे सारे क्षणभर पुतळयासारखे होतात व त्यांचे डोळे आश्चर्याने विस्फारले जातात. केदार आत पळून जातो.

महेशः (संतापाने) काय प्रकार चालला आहे हा दिनू?

जनार्दनः (स्वतःभोवती गिरकी घेत पोहणाऱ्या बदकासारखी मान पुढे मागे हलवीत) धिस इज ए ब्युटिफुल अमेरिकन बॉल डांस साँग! हक...बक...! अंकल!

महेशः स्टॉप युवर फुलिश बकबक...!

उमाः (अतिशय संतापाने) बाई...बाई... सहा महिने बाहेर काय गेलो... घराचा उकिरडा करून टाकलाय! (वास घेऊन) शी SSS दारू?

महेशः घरातच रेस्टॉरंट आणि बार उघडलाय वाटतं!

उमाः आणि हा नंगा नाच...? की कॅब्रे?

महेशः ह्या गाढवानेच केलंय हे सारं!

उमाः (दिनूकडे संतापाने बघत) काय रे दिनू आणि निमू तू पण?

महेशः काय चालवलंत काय तुम्ही? (तेवढ्यात हरजिंदर येतो. त्याने एप्रन व डोक्याला शेफची पांढरी टोपी घातली आहे. दिनकर हरजिंदरकडे पाहून

टी पॉयवरचे सर्व साहित्य आवरायचे सुचवितो. हरजिंदर सर्व सामान आवरून आत घेऊन जातो.) आणि हा आत गेला तो उपटसुंभ कोण?

जनार्दनः हा शेफ कम ड्रायव्हर कम हेल्पर! थ्री-इन-वन!

उमाः आणि काय रे दिनू गणपतीच्या मंदिरातली घंटा काय झाली?

जनार्दनः काय म्हणता? घंटा नाही? बऱ्याच दिवसांपासून कुणी फिरकलंच नाही तिकडे! त्यामुळे त्या घंटेविषयी कुणालाच काही माहित नाही! नो बडी नोज अबाऊट दॅट. नाहीतर कुणीतरी बांधली असेल एखाद्या मोठ्या मांजरीच्या गळयात! आमच्या सारख्या निष्पाप उंदरांना वाचवायला! किंवा ना आई! कुणी तरी नेली असेल ती चोरून! आजकाल काही कुणाचा भरवसा नाही! मंदिरातली घंटा, शंकराच्या पिंडीजवळच्या पितळी किंवा तांब्याचा नाग पण चोरून नेतात हे भुरटे चोर!

उमाः तूच चोरून नेऊन विकली असणार!

जनार्दनः व्हॉट रबिश यू आर टॉकिंग? काय बोलता तुम्ही आई! इन्सल्ट करताय तुम्ही माझा! ती फतरूड घंटा... काय सोन्याची होती ती? (निर्मला फणकाऱ्याने आत निघून जाते.)

उमाः आमच्यासाठी सोन्याहून मौल्यवान होती ती! सैताना तूच चोरून विकली असणार ती!

दिनकरः नाही गं आई असं कसं करतील ते? एवढे सोन्याचे दागिने देणारा माणूस त्या क्षुद्र घंटेला हात लावील?

महेशः क्षुद्र? तू त्या घंटेला क्षुद्र म्हणतोस? अरे त्या घंटेच्या निनादाने आपला बंगला झंकारून उठायचा! श्री गणेशाच्या मंदिरातून त्या पवित्र लहरी थेट बंगल्यात यायच्या! किती प्रसन्न वाटायचे! कुणीतरी अतिथी किंवा पाहुणा नव्हे तर देवदूत आला असेल असे वाटायचे. पण ह्या सैतानाचा प्रवेश झाला आणि ह्या स्वर्गाचा नरक झाला!

उमाः आणि काय रे ती काळी गाडी उभी आहे दारात ती कुणाची? आणि ते तुळशी वृंदावन कुणी मोडलं?

जनार्दनः ओह! ती गाडी फोर व्हिलर स्कॉर्पिओ! चार पायांचा काळा विंचू ना? ती गाडी आपल्या सर्वांसाठी आणली. अहो एवढा मोठा बंगला आणि साधी फोर व्हिलर नाही दारासमोर! बंगल्याची प्रतिष्ठा, ऑनर, रेप्युटेशन म्हणजे काय असते ती ह्या काळया विंचवाने वाढविली! आय मिन त्या ब्लॅक स्कॉर्पिओने.

महेशः तुझा तो काळा विंचू आणि तू ब्लॅक कोब्रा, काळा भुजंग! डसलास आमच्या पोरांना! सगळीकडे, सगळया बंगल्यात विष पसरविलेस तू! तरी मी म्हणत होतो त्या निर्मलेला की ह्या सर्पाला दूध पाजू नकोस. एके दिवशी डंख मारील! झालं ना तेच!

जनार्दनः सर्पाच्या शेपटीवर पाय दिल्यावर तो डूख धरणार नाही का? तुझ्यासारखी कजाग थेरडी आणि हा गर्विष्ठ थेरडा आला होतात माझ्या प्रेमाच्या आड!

उमाः म्हणून तू हा बदला घेतलास? अरे खाल्ल्या मिठाला तरी जागायला हवे होतेस तू! दुष्ट! दुराचारी! नराधमा!

जनार्दनः तुमच्यामुळे माझी सारी स्वप्ने भंगून गेली! राखरांगोळी केली तुम्ही माझ्या गुलाबी स्वप्नांची! काय गुन्हा केला होता मी? प्रेमच केलं होतं ना तुमच्या मुलीवर, कंचनवर? का तुम्ही आम्हा दोघांना आयुष्यभर झुरायला आणि जळायला लावून दिलंत?

महेशः ती सुखात आहे! तुझ्यासारख्या निष्कांचन, कर्मदरिद्र्याला मी माझी सोन्यासारखी पोरगी देईन होय?

जनार्दनः मी निष्कांचन जरूर होतो पण कर्मदरिद्री नव्हतो. मला माझं प्रेम मिळालं असतं तर मी खूप काही करून दाखवलं असतं! पण... पण मी आता... पूर्ण उद्ध्वस्त झालो. काहीच उरलं नाही! राखेचा ढीग झालो आहे. पण मी ह्याचा बदला घेणार! सूड उगवणार मी ह्याचा तुमच्यावर... तिला मात्र आचही लागू देणार नाही. अजूनही माझं प्रेम आहे तिच्यावर आणि मरेपर्यंत राहिल. पण तिच्या सुखी संसारावर माझी काळी छायादेखील पडू देणार नाही. तुमच्या घरादारावर गाढवाचा नांगर फिरवणं हेच माझं मिशन... अर्ध पूर्ण केलंच आहे... आता उरलेलं पूर्ण करायच्या कामाला लागतो. (तेवढ्यात हरजिंदर येतो. त्याने कूकचे कपडे बदलून ड्रायव्हरचा पोषाख घातला आहे.)

हरजिंदरः जॉन साहब गाडी निकालू?

जनार्दनः ओ! यस ऑफकोर्स! निघायचं कायमचं येथून. सर्व सामान घेतलं? विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर!

उमाः (हरजिंदरला) काय ती काळी गाडी तू चालवतोस?

हरजिंदरः यस मॅडम.

उमाः ते तुळशी वृंदावन तू मोडलंस?

हरजिंदरः (दोन्ही हाताने स्वतःचे कान पकडून) ग्रंथ साहिब की शपथ! मैने नही तोडा।

उमाः फिर किसने तोडा?

हरजिंदरः (शरमेने खाली मान घालून भीत भीत) जॉन साहब... ! गाडी चलाना सिख रहे थे। एक दिन गेट के अंदर आते ही वृंदावन को टक्कर लगा दी।

महेशः काय रे जन्या, तू मोडलंस तुळशी वृंदावन?

जनार्दनः (कपाळावरच्या जखमेला हात लावीत) ते वृंदावन असं मध्येच दारात आणि आमच्या बहनाला दारातच गाडी उभी असलेली आवडते. म्हणून गाडी दारात लावायला गेलो तर लागला धक्का वृंदावनाला! आणि किती नुकसान झालं माझ्या स्कॉर्पिओ गाडीचं! गाडीचे हेडलाईट फुटले. क्रॅश रेडिएटरलाही धक्का लागला. १५-२० हजार खर्च लागला. सांगा काय घेऊन बसलात तुळशी वृंदावनाचं?

उमाः अरे मुर्खा! पापी! जे प्राणी मोडिती तुळशी वृंदावन। यम सांगे दूता लागून। कुंभी पाकी टाका नेऊन।। कुंभी पाक नावाच्या नरकात जाशील मेल्यावर. कुंभाराच्या भट्टीत मडके भाजतात तसे तुला भाजतील.

जनार्दनः हे सारे थोतांड आहे. ब्लाईंड फेथ! ब्लाईंड फॉलोइंग द ब्लाईंड! अंधविश्वास. आय डोंट बिलिव्ह धिस टेल अँड कर्सिंग टू!

उमाः होय माझा शाप आहे तुला!

जनार्दनः मी तर कधीच मरून गेलो! तिचं.. कंचनचं लग्न झालं तेव्हा! पण मी नव्याने जन्म घेतला एका भयंकर सैतानाच्या रूपात!

उमाः अरे सैताना! तू आत्ताच्या आत्ता काळं कर येथून! (दिनकर व निर्मला येतात.)

दिनकरः ते जाणार नाहीत येथून!

उमाः काय? तू अजूनही ह्या राक्षसाची तरफदारी करतोस? (महेशला) बघा हो! हा तमाशा! काढा ना त्याला बाहेर!

महेशः बऱ्या बोलानं जातोस की पूर्वीसारखं धक्के बुक्के मारून काढू?

जनार्दनः (कपाळाला हात लावून) ओ नो मला पुन्हा कपाळमोक्ष करून घ्यायचा नाही! (निर्मला व दिनकर येतात.)

दिनकरः चला जनुभाऊ आम्ही पण येतो. (महेश व उमा एकमेकांकडे आश्चर्याने बघतात.)

महेशः आम्ही? म्हणजे?

दिनकरः आम्ही म्हणजे मी, निर्मला आणि केदार!

उमाः अरे पण कुठे चाललात तुम्ही?

दिनकरः जिथे जनुभाऊ तिथे आम्ही! चला जनुभाऊ! निर्मला सारं सामान घेतलं ना? (निर्मला मान हलवून होकार देते.)

निर्मलाः हरजिंदरने आधीच ठेवलं आहे गाडीत. (ते जातात. उमा व महेश दोघेही त्यांना हाक मारतात निर्मला! दिनू!!)

उमाः (ओंजळीने तोंड झाकून घेत) त्या माकडानं कारस्थान करून हातात कोलीत घेऊन आपलं सारं घर जाळलं.

महेशः माणसाची बुद्धी नीच लोकांच्या सहवासाने निकृष्ट होते.

उमाः आपल्या बंगल्यातील सर्वांवरच त्याने चेटुक करून भुरळ पाडून वश करून घेतले आहे. (तिचा चेहरा रडवेला होतो.)

महेशः उमा शांत रहा! (तेवढ्यात आतून केदार येतो.) केदार तू कुठे चाललास? थांब. (तो थांबतो.)

उमाः तुलाही आमचा राग आला आहे? तूही जाणार आम्हाला सोडून?

केदारः (हाताची घडी घालून त्यांच्याकडे पाठ करून कठोरपणे) हो!

उमाः अरे पण का? कसला राग काढतो आहेस तू आमच्यावर?

केदारः प्रेमाचा!

महेशः प्रेमाचा?

केदारः होय. प्रेमाचा! अंजलीचा!

उमाः कोण ती उर्मट कार्टी?

केदारः आई, माझं प्रेम आहे तिच्यावर.

महेशः अरे पण ती...?

केदारः तुम्हाला मुळीच पसंत नव्हती! होय ना?

उमाः अरे पण ती तुझ्या योग्यतेची नव्हती!

महेशः ना मॅनर्स ना एटीकेट्स!

केदारः माझं प्रेम आहे तिच्यावर! आणि मी...!

उमाः काय? तिच्याशी लग्न करणार तू? आमच्या विरोधात जाऊन?

केदारः ती मला प्रिय आहे.

उमा-महेशः (एकदम) आमच्यापेक्षा?

केदारः होय. तुम्ही नेहमी माझ्या प्रेमाच्या विरोधात होता... ! पण मामाने माझ्यासाठी... !

महेशः म्हणजे ह्या प्रकरणातही त्या सैतानाने धुडगुस घातला?

केदारः धुडगुस नाही... लग्न लावून दिलं आमचं! रजिस्टर मॅरेज.

उमाः तिचे आई वडिल? त्यांना ठाऊक आहे हे सारं?

केदारः (तुसडेपणाने) तुमच्यासारखेच तेही! नाही म्हणत होते...म्हणत होते हे शक्य नाही... काळया दगडावरची रेघ आहे. (तुच्छतेने हसत) मामाने

ती रेघ पाण्यावरच्या रेघेसाखी केली. काय करायचं असेल माझ्याविरूद्ध तर करा तुम्ही आणि ते. मामा आहे माझ्या पाठीशी... मामा! फार उपकार आहेत माझ्या मामाचे माझ्यावर!... (जातो.)

उमाः (अगतिक होऊन खुर्चीच्या हाताचा आधार घेऊन बसत) काय हो आपण थोड्या दिवसांसाठी बाहेर काय गेलो आणि हे काय झालं?

महेशः विनाश करायला काळाला एक क्षणही लागत नाही, उमा!

उमाः अहो पण एकामागून एक ही सारी पाखरं उडून गेलीत. येतील का ती परत?

महेशः येतील. वेडी आहेत ती! त्यांना आपण काय करतोय हे कळत नाही. ठोकर बसली की उमज पडेल मग येतील.

उमाः होईल तसं? येतील ती परत?

महेशः हे बघ उमे, अगोदरच तुला ब्लड प्रेशर त्यात ५-६ महिने ट्रीटमेंट घेतलेली तू खूपच दुबळी झाली आहेस... शरीरानं आणि मनानं देखील. परमेश्वर काहीतरी मार्ग दाखवील. तो हेरंब येईल आपल्या मदतीला धावून. अरे हो यशवंताचं काय झालं देव जाणे.

उमाः त्या बिचाऱ्याने आपल्यासाठी खूप केलं, पण त्याचाच ॲक्सिडेंट झाला. आपण काय करणार? त्यात ही पोरं फोन उचलत नव्हती.

महेशः एका फोर व्हिलरने त्याला जबरदस्त धक्का दिला होता. काही फ्रॅक्चर्स पण झाली. काही दिवस तो ऍडमिट होता. आता कसा आहे, कोठे आहे कुणास ठाऊक... (यशवंत येतो.)

यशवंतः अरे? तुम्ही कधी आलात? मी ठीक आहे. बाकी सारं काही कळलंय मला.

महेशः पण यशवंता! हे कसं झालं? तुझा अचानक ऍक्सिडेंट?

यशवंतः अचानक नाही, जाणून बुजून केला गेला.

उमाः जाणून बुजून? कुणी?

यशवंतः जनार्दनच्या स्कॉर्पिओने दंश केला आय मिन धक्का दिला. पण वाचलो मी.

महेशः म्हणजे? कसा?

यशवंतः जनार्दनचा मित्र शोफर, कूक आहे ना तो हरजिंदर सिंग!

महेशः होय तो पंजाबी?

यशवंतः होय तोच! त्याला मी आपलसं करुन घेतलं होतं. त्याने मला जनार्दनची सारी कारस्थानं, कारवाया उघडकीस आणून दिल्या. त्याला माझा संशय आल्यामुळे माझा ऍक्सिडेंट करून मला जीवे मारण्याचा त्याने प्रयत्न केला होता. पण हरजिंदर गुप्तपणे माझ्या बाजूने होता हे त्याला ठाऊक नव्हते. अजुनही नाही. हरजिंदरने वाचवलं मला. पण मला थोडे

लागले व पायाच्या बोटांना फ्रॅक्चर झाल्यामुळे १५/२० दिवस हॉस्पिटलमध्येच रहावे लागले.... तेवढ्या वेळात त्याचं फावलं.

उमाः म्हणजे आणखी कोणती कारस्थानं केलीत मेल्यानं?

यशवंतः पहिलं म्हणजे निर्मलेला गोडीत घेऊन फसवलं! भामटेगिरी करुन डल्ला मारलेल्या पैशांवर बढाया मारल्या!

महेशः काय केलं त्याने?

यशवंतः त्याला आणि हरजिंदरला जागा कमी पडत होती असा बहाणा करून तुझ्या अभ्यासिकेतल्या साऱ्या पुस्तकांची गाठोडी बांधून तळघरात ठेवण्याच्या निमित्ताने दागिने आणि मृत्युपत्र कचऱ्याच्या डब्यामधून पसार केलं!

उमाः अरे देवा!

यशवंतः तुम्ही घाबरू नका मी त्याच्या विरोधात पोलिस कंप्लेंट केली आहे. पोलिस त्याच्या मागावर आहेत. लवकरच दागिन्यांसह चतुर्भुज होईल तो!

महेशः यशवंता ते २०-२५ लाखांवरचे दागिने होते.

यशवंतः त्याने दिनकरवर चांगलीच जादू केली. तू बंगला दिनकरच्या नावाने केला आहेस, होय ना?

महेशः होय.

यशवंतः त्याने हा बंगला दिनकरच्या मदतीने बिल्डरला देऊन येथे टॉवर बांधायचा प्लॅन केला होता. पण तो बिल्डर माझ्या परिचयातला

असल्याने मी त्याचा हा प्लॅन गुप्तपणे उधळून लावला. पण मला एक गोष्ट करता आली नाही.

महेशः कोणती?

यशवंतः त्याने दिनकरला बंगला गहाण ठेवायला लावून एका गुजराथी व्यापाऱ्याकडून पन्नास लाख काढले व एक फ्लॅट विकत घेतला. (उमा व महेश अचंबित होतात) बरंचसं सामान तेथे हलवलंही त्यांनी!

उमाः म्हणूनच तर सगळी कार्टी त्याच्या मागे गेली.

यशवंतः आता तो व्यापारी बंगल्याचा लवकरात लवकर ताबा घेईल... एवढ्या एक दोन दिवसात तरी.

उमाः काय? मग आम्ही कोठे जाणार? (कपाळाला हात लावून म्हणते) हाय रे देवा! हेरंबा, गणराया तुलाही दया आली नाही आमची? (रडू लागते.)

महेशः तू जरा शांत हो पाहू!

यशवंतः मी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. अमेरिकेत न्यूयॉर्कला ज्या मोटलमध्ये तो काम करीत होता तेथून व गुजराथी मालक हसमुख पटेल ह्यांच्या बंगल्यावर चोरी करून दोन लाख डॉलर्स पळविले होते. त्या मालकाने एफ. बी. आय., न्यूयॉर्क पोलिस आणि इमिग्रेशन डिपार्टमेंटकडे त्याच्या विरोधात तक्रार केलेली आहेच.

महेशः पण तो तर येथे आहे.

यशवंतः तेथील पोलिस डिपार्टमेंटने न्यूयॉर्कला असलेली त्याची स्पॅनिश गर्लफ्रेंड जुनिताकडे चौकशी करुन डायरीतील त्याचा येथील पत्ता व टेलिफोन

नंबर मिळविला. आता तो त्यांच्या पंजातून सुटत नाही. तो लवकरच पकडला जाऊन त्याच्यावर न्यूयॉर्कमध्येच खटला चालेल. कारण तो ह्या स्पॅनिश मुलीला बरोबर घेऊन ड्रग्जचा व्यवसाय करीत होता... व ह्या बाबतीतील सर्व पुरावे न्यूयॉर्क पोलिस डिपार्टमेंटला त्या स्पॅनिश मुलीकडून कळले. त्यामुळे त्याला जन्मठेप होणार हे नक्की. (घड्याळ बघतो.) मी येतो जरा पोलिस स्टेशनला जाऊन. काळजी घ्या! (जातो.)

उमाः (रडवेल्या सुरात) काय हो कसं आणि का झालं हे असं? म्हणजे हे घरटं, हा बंगला सोडून जावं लागणार?

महेशः दैवगती, त्याला काय करणार उमा? ही वास्तूच उलटली आपल्यावर!

उमाः पण देवापेक्षा दैव बलवत्तर असतं?

महेशः होय. कारण दैवाला एक मात्रा जास्त असते.

उमाः तुमच्या आजोबांनी बांधलेला हा बंगला. तुमचं बालपण गेलं येथे! कितीतरी आठवणी आहेत ह्यात सामावलेल्या. आठवतंय? आपलं लग्न झालं तेव्हा ह्याच बंगल्याच्या उंबरठ्यावरचं माप ओलांडलं होतं मी. येथेच तुमच्या प्रेमाची आणि तुमच्या आई वडिलांच्या मायेची ऊब मिळाली होती मला! त्यांनी मला कधीही सून मानलं नव्हतं. सासरला राहूनही मला कधीही माहेरची आठवण येऊ दिली नाही. तुमच्या आई वडिलांसारखीच वागले ना मी निर्मलेशी?

महेशः उमा आपण दिलेल्या कुठल्याही गोष्टींच्या श्रेयाची आता अपेक्षा करणं वेडेपणाचं आहे. हृदय कुणाला नसते ठाऊक आहे तुला? दगडाला! हे सर्व

दगड झालेत उमा! आता फक्त वेगाने वाहतेय आठवणींची नदी! तुला आठवतं? आपलं लग्न झालं तेव्हा मी तुला प्रथम आपल्या श्री गणेशाच्या मंदिरात नेऊन दोघांनी त्या हेरंबाचं जोडीने दर्शन घेतलं. त्या गौरवर्ण, सर्व कामना पूर्ण करणाऱ्या गणपतीचे आपण दोघांनी डोळे मिटून ध्यान केले होते.

उमाः होय ना, तेव्हापासून रोज त्या विघ्नहर्त्याचे दर्शन घेतल्याशिवाय दिवस सुरू झाला नाही. येथून जाताना फोटो काढून नेला होता तो रोज बघायची, दर्शन घ्यायची.

महेशः तो फोटो आपण जपून ठेवला. तो हा बंगला सोडून जेथे जाऊन राहू तेथे त्याचे दर्शन घेत जाऊ.

उमाः आपण ह्या विघ्नहर्त्याला सोडून गेलो आणि विघ्ने आपल्या पाठीशी लागली.

महेशः आता जेथे जाऊ तेथे कसले कसले फोटो काढून नेणार?... घेऊन जाऊ फक्त आठवणी...

उमाः होय! जुन्या नव्या साऱ्या... साऱ्या! तुम्हाला आठवतं? आपलं लग्न झालं तेव्हा एकदा माझा हात धरून तुम्ही मला ह्या बागेत घेऊन आला होतात. बंगल्याभोवतीच्या बागेतील सर्व फुलझाडांची तुम्ही मला ओळख करून दिली होती.

महेशः होय ना! गेट जवळचा तो आम्रवृक्ष- त्याला मोहोर आला म्हणजे त्यावर येऊन कोकिळा गायची! तेव्हा मी म्हणायचो अगं बघ ना किती मधुर सुरात गातेय कोकिळा!

उमाः तेव्हा मी म्हणायचे, ती आता माहेरी आली आहे ना, म्हणून खूष असेल इतकी! आणि आठवतं का मी एके दिवशी सकाळी तुळशीला पाणी घातल्यावर बागेत तुम्हाला शोधीत होते तर तुम्ही त्या आम्रवृक्षाजवळील पारिजातकाच्या झाडाखाली फुले वेचित होता. मी तुमच्याजवळ बसले तेव्हा तुम्ही मला एक फूल हातात घेऊन त्याचं वर्णन करून सांगितलंत!

महेशः कसं? आठवतंय तुला अजूनही ते?

उमाः कधीच विसरणार नाही... तुम्ही एक फुल अलगदपणे माझ्या हातावर ठेवलं आणि म्हणालात, “बघ किती नाजूक आहे, रंग दुधावरच्या सायीसारखा, कधी सहा तर कधी पाच पाकळया, मध्ये कुंकवासारखा ठिपका आणि त्यात एक पिवळा बिंदू! सौंदर्याचा पूर्णविराम! आणि असंही म्हणाला होता की सागर मंथनातून जी चौदा रत्ने निघाली त्यापैकी हे एक! त्याचा केशरी देठ म्हणजे कृष्णाच्या उजव्या हाताची तर्जनी, सुदर्शन चक्र धारण केलेली. कृष्णाने रुक्मिणी आणि सत्यभामेचा हट्ट पूर्ण करण्यासाठी इंद्राशी युद्ध करून ह्याला स्वर्गातून पृथ्वीवर आणले आहे.” आणि त्याचा गजरा करुन तुम्ही माझ्या वेणीत माळला....आणि म्हणालात, “प्राजक्ताच्या फुलांचा गजरा जिच्या डोक्यात, स्वर्ग सुखे तिच्या पायाजवळ आणि खरंच स्वर्ग सुख होतं आपल्या संसारात. मग तुम्ही म्हणाला होतात, “पारिजात हा स्त्रियांना

सौभाग्य देणारा आहे.” आणि मग अचानक मी तुमचा हात धरून म्हटलं होतं, “मला एक वचन द्या!”

महेशः कसलं?

उमाः मला अहेव मरण हवं! करणार ना वचन पूर्ण?

महेशः काय उमा काहीतरीच काय मागतेस? मला एकटं सोडून जायचं ठरवतेस की काय? लग्न झाल्यापासून ह्या बंगल्यातली आपल्या संसारातली सगळी सुख-दुःखं आपण एकत्र भोगली. आपण एकमेकांना साथ दिली आणि आता हात सोडून जायचा विचार करतेस? जायचंच असेल तर बरोबरच जाऊ.

उमाः पण आपला दिनू असं करील अशी आशा... अपेक्षाच नव्हती!

महेशः आशा... अपेक्षा ठेवू नयेत कधी... त्या पूर्ण झाल्या नाहीत की मनाला त्रास होतो फार!

उमाः दिनूच्या वेळी तुम्ही मला माहेरी जाऊ दिलं नव्हतं. त्याचा जन्म येथेच झाला होता. तेव्हा तुम्ही आनंदाने नाचला होतात. किती जीव लावून मोठा केला! त्याच्या बोटाला धरून चालायला शिकवलंत, आधार दिला. आज आपल्याला आधाराची गरज आहे तर त्याने पाठ वळवली!

महेशः आणि कंचन, कळीचं फूल व्हावं तशी ती मोठी झाली. फुलबागेत फुलपाखरासारखी बागडायची. त्या जन्याच्या जाळयातून सोडविल्यावर आपण तिचा विवाह करून टाकला!

उमाः आणि पाठवणीच्या वेळी किती रडली आणि रडवलं होतं तिने? अश्रू ओघळू नयेत म्हणून स्वतःचा ओठ चावून धरला होता तुम्ही!

महेशः आपला विवाह, त्यानंतर मुलांचे जन्म, त्यांचं लहानपण, त्यांचं संगोपन, त्यांचा विवाह, त्यांची आणि आपली आजारपणं, सुखाचे दिवस, दुःखाचे दिवस साऱ्या आठवणी जोडलेल्या आहेत ह्या बंगल्याशी.

उमाः (खिडकी जवळ जाऊन पडदा बाजूला करते व स्लायडिंग उघडते) आS हाS हाS अहो बघा ना किती छान सुगंध आला रातराणीचा! (महेश खिडकीजवळ जातो.)

महेशः अगं खरंच की! (बाहेर डोकावून बघतो) बघितलंस किती बहरलीय ती! साऱ्या कळया उमलून फुलं झालीत. गुच्छच्या गुच्छ फुललेत.

उमाः इवलंसं फूल असतं पण सुगंध किती? अजून काय म्हणतात हो हिला?

महेशः रजनीगंधा, निशिगंध, गुलछबू, गुलछडी... ह्या फुलांनी कितीतरी रात्री सुगंधित केल्या आपल्या!

उमाः त्यांचा सुगंध आला की आठवणींनाही बहर येतो...

महेशः (कुठेतरी हरवून) सुगंधी आठवणी! आता फक्त आठवणींचीच शिदोरी उरली... उर्वरित आयुष्य जगायला... !

उमाः खरंच काहो हा बंगला सोडावा लागणार आपल्याला?

महेशः होय, आज ना उद्या...! (ती रडते) काय हा तुझा वेडेपणा? कुठल्याही दुःखाला, संकटाला सामोरं जायचं हे मी शिकवलं ना तुला! विसरलीस?

उमाः मी कुठलीही दुःखं, संकटं सहन करीन, पण हे माझं घरटं सोडून जायची कल्पनाही सहन करणार नाही मी! काहीही झालं तरी! ह्या घरट्यात ज्यांना चिमणीचारा भरवला त्यांना त्या सैतानाने पंख दिले आणि ती उडून गेलीत... पण मी प्राण गेला तरी हे घरटं सोडून कोठेही... कोठेही जाणार नाही. (दिनकर आणि निर्मला येतात.)

दिनकरः (निर्मलेस) तू आत जाऊन तुझी आणि माझी बॅग घेऊन ये. तू आणि तो हरजिंदर कसे विसरलात कोण जाणे. (उमा व महेश स्तब्ध राहतात, त्यांच्याकडे बघून) आई, बाबा! सांगताना वाईट वाटतंय, पण त्याला ईलाज नाही. तुम्ही ह्या जुनाट बंगल्याचं आम्हाला रिनोव्हेशन करू दिलं नाहीत, रिनोव्हेशन राहू द्या साधा खिळा, चूक ठोकू दिली नाहीत. माझी बेडरूम म्हणजे कोंडवाडा आहे! कोंडवाडा! ना तेथे व्हेंटिलेशन... ना खिडकी ना पंखा भिंतीवरचे प्लॅस्टर निघून विटा दिसायला लागल्यात. काही ठिकाणी छिद्रेही पडली आहेत. एके रात्री तर उंदरांनी आम्हाला झोपू देखील दिले नाही. एक बिल्डर आला होता ३-४ टॉवर्सचे मोठे कॉम्प्लेक्स बनवून देतो म्हणून. ३-४ बी.एच.के चे मोठे फ्लॅट आणि वर रक्कमही देऊ करत होता, त्याला तुम्ही हाकलून लावले. बंगल्याची ही दैन्यावस्था व आमची गैरसोय बघून जनुभाऊंना दया आली. त्यांनी मार्ग काढला. त्यांच्याच मदतीने हा बंगला गहाण ठेवला. दुर्दैवाने आजची शेवटची तारीख आहे. उद्या बंगला त्या माणसाला खाली करून द्या!

महेशः मग आम्ही रहायचं कुठे?

दिनकरः आम्ही एक थ्री रूम किचन फ्लॅट घेतला आहे. त्यात मी, निर्मला, केदारचं लग्न झालेलं तुम्हाला केदारने सांगितलेलंच आहे तो व आमची सून आणि जनूभाऊ आम्ही तेथे राहू.

उमाः अरे पण निर्दया आम्ही कोठे राहू हे विचारताहेत तुझे बाबा!

दिनकरः अरे हो ते सांगायचं राहिलंच. शेवटी तुम्ही आमचे जन्मदाते! जसे तुम्ही तुमचे कर्तव्य, दायित्व पार पाडलेत तसेच आम्ही केले. अगदी वाऱ्यावर सोडणार नाही आम्ही तुम्हाला.

उमाः म्हणजे काय उपकार केलेस तू आमच्यावर?

दिनकरः तुमची व्यवस्था वृद्धाश्रमात केली आहे. ३-४ महिन्यांचे ऍडव्हान्स पैसे भरले आहेत. तेथे तुमची उत्तम सोय केली आहे. अधून मधून आम्ही भेटायला येऊ तुम्हाला.

उमाः (अतिशय संतापून) दिन्याSS अरे काही लाज तुला? तुला जन्म दिला आम्ही, प्रेमाने वाढवलं, शिकवलं, नोकरीला लावलं, लग्न लावलं! आणि तू... !

दिनकरः (निर्दयपणे) सगळेच आईबाप करतात. त्यांचं कर्तव्यच असतं ते! दायित्व असतं प्रत्येक आईबापाचं, त्यात तुम्ही काय विशेष केलं? (आतून निर्मला दोन बॅगा घेऊन येते.)

निर्मलाः चल दिनू. घेतल्यात दोन्ही बॅगा. सांगितलंत सर्व आईबाबांना (तो मानेने होकार देतो) बरं झालं बाबा आपण आपलं कर्तव्य केलं. इतर मुलांसारखं उघड्यावर पाडलं नाही त्यांना!

उमाः (क्रोधाने) अगं कर्कशा, हडळ, बदमाश, कृतघ्न! अखेर गेलीस ना तुझ्या भावाच्या वळणावर!

महेशः उमा तू थांब! दिनकर, अरे हा बंगला गहाण ठेवण्यापूर्वी आम्हाला एका शब्दाने तरी विचारायला हवे होतेस तू! (निर्मला मध्ये बोलायचा प्रयत्न करते, तिला थांबवून)

दिनकरः आणि तुम्ही त्या गोष्टीला संमती दिली असती?

महेशः अरे पण आपण काही विचार केला असता... इतका आततायीपणा करण्याआधी! ह्या बंगल्याशी जुळलेल्या काही स्मृती आहेत पोरा आपल्या!

दिनकरः तुम्हाला आणि आईला सांगून सांगून थकलो. माझे मित्र किती छानछोकीने मॉडर्न फ्लॅटमध्ये राहतात... हेवा वाटला मला त्यांचा!

महेशः अरे पण!

निर्मलाः (दिनकरला) अहो आता इमोशनली ब्लॅकमेल होण्यापूर्वी चला येथून! तुमच्या बोलण्याचा त्यांच्यावर काहीही परिणाम व्हायचा नाही. बघितलं ना आई मला काय म्हणाल्या ते? कर्कशा, हडळ, बदमाश, कृतघ्न! आतापर्यंत नव्हते आता होऊनच दाखविते! शेवटी सासू ती सासूच असते.

दिनकरः बाबा, आई, आता जास्त बोलण्यात काही अर्थ नाही! माझं वय आता चाळीशीच्या पुढे गेलं आहे त्यामुळे मला चांगलं वाईट काय ते कळतंय! आम्हाला आता आमचा संसार सुखानं करू द्या! उद्या तो माणूस येईल. त्यामुळे रात्रीच सामान बांधून ठेवा! उद्या सकाळी अकरा बरोबर तो येईल, त्याच्या हाती बंगल्याच्या चाव्या द्या! मी हरजिंदरला गाडी घेऊन पाठवितो तो तुम्हाला वृद्धाश्रमात पोहचवेल. (यशवंत येतो.)

यशवंतः अरे दिनकर, काय चालवलंय तुम्ही हे? आणि ह्या बॅगा? बाहेर ती गाडी उभी आहे काळी स्कॉर्पिओ!

दिनकरः (निर्मलेला) तू बॅगा घेऊन गाडीत बस. मी आलोच. (यशवंताला) काका! तुम्हाला तर ठाऊक आहेच! उद्या बंगला खाली करायचाय ते! वृद्धाश्रम जवळच आहे! मी आई बाबांची तेथे व्यवस्था लावली आहे. तुम्ही बरोबर जाऊन त्यांना तेथे पोहचवून द्या! (निर्मला जाते)

उमाः (दिनकरच्या अंगावर धावून) अरे कार्ट्या दिन्या! इतका उलटलास आमच्यावर? (महेश व यशवंत तिला शांत करण्याचा प्रयत्न करतात) त्यापेक्षा सरळ स्मशानातच पाठवना आम्हाला! एवढे आम्ही तुला नकोसे झालो तर! टाका दोन्ही कुड्या जिवंत जाळून आणि मग बसा सुखानं संसार करीत! (उमा स्वतःला सोफ्यावर झोकून ओक्साबोक्शी रडू लागते. दिनकर त्याच्याकडे लक्ष न देता झरकन निघून जातो)

महेशः (यशवंतास) बस ना यशवंत! तुझ्यावर छान जबाबदारी टाकून गेला दिनकर... आम्हाला वृद्धाश्रमात पोहोचवायची. (हसतो.) वृद्धाश्रम!... तुला माहित आहे? बालपणानंतर गुरूगृही राहून संयमपूर्ण पवित्र आचरण करीत वेदाध्ययन करणे म्हणजे ब्रम्हचर्याश्रम, नंतर विवाह

करून संतती निर्माण करायची, अध्ययन अध्यापन करायचे, कौटुंबिक, सामाजिक ऋण फेडायचे म्हणजे गृहस्थाश्रम. नंतर... नंतर नातवंडे बघितल्यावर वृद्धापकाळात प्रापंचिक मायापाशापासून मुक्त होण्याकरिता अरण्यात जाऊन निवृत्त असा जीवनक्रम आचरावयाचा म्हणजे वानप्रस्थाश्रम. हे सारं पूर्वीच्याच काळी होतं असं नाही... आत्ताही तेच आहे फक्त तोंडावळा बदलला आहे. वानप्रस्थाश्रम म्हणजेच आजचा वृद्धाश्रम!

उमाः पण वृद्धाश्रमात अरण्ये कुठे? झाडी कुठे?

महेशः आपल्यासारखी वृद्ध माणसे म्हणजेच झाडी... फळाफुलांशी आणि पानांशी फारकत झालेली. दुष्काळातल्या जमिनीवरच्या भेगांसारख्या सुरकुत्या असलेले... शुष्क डोळयांना आकाशाकडे लावून... वाळलेल्या हातांच्या फांद्या पसरून आम्हाला लवकर ने अशी आर्जवे करणाऱ्या झाडांची अरण्ये आहेत तेथे!

उमाः (केविलवाणे हसून) म्हणजे तुमची तयारी झाली वाटतं वृद्धाश्रमात जायची!

महेशः आपली तयारी असो वा नसो... तुला आठवतं? दोन-तीनशे वर्षांपूर्वीच्या जपानमधली गोष्ट मी तुला एकदा सांगितली होती ते?

उमाः मला काही एक आठवत नाहीये!

महेशः बरं का यशवंता ही गोष्ट आहे त्या काळातली जेव्हा जपानमधील लोकांना खायला पुरेसं अन्न धान्य मिळत नसे तेव्हा ते म्हाताऱ्या आईबापांना दूर सोडून यायचे. एक तरूण मुलगा त्याच्या म्हाताऱ्या आईला पाठीवर टाकून जंगलात सोडायला जात होता. तेव्हा त्याची

म्हातारी आई झाडाची एकेक फांदी तोडून रस्त्यावर टाकीत होती. ते पाहून त्या मुलाने त्याच्या पाठीवरच्या म्हाताऱ्या आईला विचारले, "आई हे काय करतेस? फांद्या तोडून रस्त्यावर का फेकतेस?" तेव्हा ती त्याची म्हातारी आई म्हणाली, "बाळा, मला दूरवर जंगलात सोडून दिल्यावर घराकडे परत येताना तुला रस्त्यावर पडलेल्या फांद्या दिसतील. मग त्यांचा माग काढीत तू रस्ता न चुकता घरी निश्चिंत पोहोचशील."

उमाः आठवलंय मला, त्या गोष्टीचं नाव होतं 'कोकोरो'.

महेशः अगदी बरोबर!

यशवंतः म्हणजे?

महेशः अरे, जपानी भाषेत हृदयाला कोकोरो म्हणतात!

उमाः होय भाओजी, कोकोरो, हृदय!... आईचं हृदय!

महेशः होय! (आवंढा गिळत) बरं का यशवंता मला आणि उमाला त्या म्हातारीसारखी हृदये करावी लागणार! आम्हाला वनात- वानप्रस्थ आश्रमात... वृद्धाश्रमात सोडल्यावर... ह्या अरण्यात! जेथे कोकिळेचा मधुर कुहू कुहू आवाज येणार नाही! रंगीबेरंगी फुलपाखरं जेथे बागडणार नाहीत. सुंदर सुंदर विहंग जेथे विहरणार नाहीत, आपल्या जुन्या आसुसलेल्या हृदयांना जे हवं ते त्या ठिकाणी कुणीही देऊ शकणार नाही. ज्या अरण्यात आपले अरण्यरुदन कुणालाही कळणार नाही, ऐकू येणार

नाही, ते अरण्य म्हणजे... वृद्धाश्रम. जेथे आपल्याला पदार्पण करायचे आहे.

उमाः इतका कृतघ्न निघाला आपला मुलगा? ययातीच्या पुत्राने पुरूने आपले तारूण्य पित्याला दिले होते. तो काळ गेला.

महेशः माझं रक्त आणि तुझं दूध बेईमान झालं आपल्याशी!

उमाः मी नाही जाणार वृद्धाश्रमात! मला जिवंतपणी जळायचं नाही हो!

महेशः उमा तुला डॉक्टरांनी टेन्शन घ्यायला नाही सांगितलंय! तुला ब्लड प्रेशर आणि डायबेटिस पण आहे. यशवंता तू तरी सांग रे हिला समजावून!

यशवंतः वहिनी!

उमाः (ताडकन् उठते) नाही मला आता जिवंत रहायचं नाही! (बेडरूममध्ये निघून जाते. तिच्या पाठोपाठ महेश जातो. यशवंत कपाळाला हात लावून बसतो. तेवढ्यात आतून महेशचा जोरात ओरडण्याचा आवाज येतो... उमाSSS उमा... महेश धावत बाहेर येतो...)

महेशः यशवंता... उमा गेली रे... गेली मला कायमची सोडून, बघ बघ ये ना इकडे! ये ना! बघ! बघ! काहीच राहिलं नाही तिच्यात! (यशवंत व महेश दोघेही आत जातात.)

महेशः उमा तुला मी अशी एकटी जाऊ देणार नाही आणि तुझ्याशिवाय मी जगू शकणार नाही! (महेश जोरात हंबरडा फोडतो.)

यशवंतः (अत्यंत घाबरलेला...) महेश.. महेश.. वहिनी... (असा ओरडत बाहेर येतो. तेवढ्यात दिनकर येतो.)

दिनकरः	काका गाडी अचानक बंद पडली!

यशवंतः	दिनू! (रडत) गेलेत दोघेही!

दिनकरः	काय? काय म्हणताय तुम्ही मला काहीच कळत नाहीये!

यशवंतः	तुझे बाबा आणि तुझी आई गेलेत दोघे! संपलं सारं! संपवलं तुम्ही सारं!

दिनकरः	नका हो असं बोलू काका! सांगा हे खोटं आहे!

यशवंतः	जा! स्वतः आत जा! तुझ्या स्वतःच्या डोळयांनी बघ तुझ्या मातापित्याचे निष्प्राण देह!

दिनकरः	आई sss! बाबा sss! (म्हणत जोराने ओरडत आत जातो.)

रंगमंचावर अंधार होतो.

# अंक दुसरा

# प्रवेश दुसरा

पडदा वर जातो तेव्हा रंगमंचावर अंधार असतो. मध्यरात्रीची वेळ असते. बाहेरील श्री गणेशाच्या मंदिरातल्या घंटेचा मंद नाद ऐकू येतो व पाठोपाठ मंद स्वरातः

*वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।*

*निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।*

हे स्तोत्र ऐकू येते. हे स्तोत्र चालू असतानाच अंधार हळूहळू नाहीसा होऊन मंद निळा प्रकाश पसरत जातो. हॉलमध्ये पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशात आरंभी जे दृश्य दिसते तेच हुबेहूब दिसते आहे. मायकेल जॅक्सन आणि मर्लिन मन्रोचे फोटो जाऊन तेथे पूर्ववत रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, देवी सरस्वतीचे फोटो लावलेले दिसतात. व त्यांच्याच बाजूला उमा आणि महेशच्या तसबिरी लावलेल्या असून त्यांना चंदनाचे हार घातलेले आहेत. प्रकाश अधिक स्पष्ट होत जातो तेव्हा उमा आणि महेश बंद दरवाज्यातून आत येताना दिसतात. त्यांनी एकमेकांचे हात हातात धरलेले असून ते एकमेकांशी बोलताहेत. दोघांची वस्त्रे पांढरी शुभ्र आहेत व त्यांच्या चेहऱ्यावर तेज आहे. त्यांची शरीरे दिव्य आहेत.)

महेशः (हळूच) बाहेर टिपूर चांदणं पडलं आहे.

उमाः शरदाचं आहे ना!

महेशः कसं मोरपिसासारखं हलकं, निरामय वाटतं. मध्यरात्रीच्या निरव शांततेत तो मंद शीतल वारा झुलवतोय आपल्या मोरपिसांना!

उमाः पण काय हो आपण सॅनिटारियमकडे जाण्यापूर्वी ह्या आपल्या... बंगल्याची जी अवस्था होती तशीच आत्ता आहे. बंगल्या भोवतीचं उद्यान! गेटमध्ये प्रवेश केल्याबरोबर दिसला तो मोहोराने फुलून गेलेला आम्रवृक्ष आणि दुसऱ्या बाजूला कळयांनी बहरलेला तो पारिजात!

महेशः जणू काही ते आपल्या स्वागतासाठीच उभे ठाकले होते.

उमाः त्यानंतर आपण श्री गणेशाचं दर्शन घेतलं!

महेशः पण काय गं उमा, श्री गणेशाचं मंदिर अगदी पूर्ववत किंबहुना त्याहीपेक्षा स्वच्छ! चंदन धुपाचा घमघमाट, मंदपणे तेवत असलेला तो नंदादीप आणि त्या लखलखत्या इवल्याशा मंदिरात तेजोमय हेरंबाची मूर्ती!

उमाः वक्रतुंडाचं स्तोत्र आपोआप ओठांवर आलं!

महेशः नेहमीच्या सवयीप्रमाणे घंटा वाजवायला हात वर केल्याक्षणी लक्षात आलं की घंटा नसेल, पण अगं काय आश्चर्य पूर्वीचीच घंटा जशीच्या तशी!

उमाः आणि त्यावर कळस म्हणजे दारात प्रवेश करण्यापूर्वी दिसले ते तुळशी वृंदावन! जसेच्या तसे! फक्त रंग दिलेला होता... नवा. तुळशीच्या बुडाशी शालिग्राम ठेवलेला. गच्च हिरव्या पानांनी आणि बारीक, नाजूक, निळसर फुलांनी बहरलेल्या मंजिऱ्यांनी किती सुंदर दिसत होती तुळस! वृंदावनाच्या देवळीत गणेश मंदिरातल्या नंदादीपासारखाच तेवत असलेला दीप!

महेशः	आणि ही रातराणीही किती फुललेली, झुबक्या-झुबक्यांनी बहरलेली!

उमाः	बघाना, आपण आत आलो आणि आपल्या पाठोपाठ तो धुंद करणारा सुगंध पाठविला तिने आपल्या पाठोपाठ बंगल्यात!

महेशः	(दोघेही सोफ्यावर बसतात.) बघितल्यात का आपल्या तसबिरी? किती सुंदर हार लावलेत त्यांना. पण हा बंगला तर गहाण ठेवला गेलाय! त्या मालकाने आपल्या ह्या तसबिरी कशा लावू दिल्या असतील?

महेशः	काय गौडबंगाल असेल हे त्या एकट्या यशवंतालाच ठाऊक! पण एवढं खरं आपण गेल्याचं दुःख त्यालाच अधिक असणार! जुना मित्र वाया गेला नाही, स्नेहाला जागला.

उमाः	खरंच! मी अखेरचा श्वास सोडला आणि ते पाहून तुम्ही हंबरडा फोडला तेव्हा धावून आले होते ते!

महेशः	खूप प्रयत्न केले त्याने. पण डॉ.नी आपल्या दोघांना मृत घोषित केले तेव्हा ओक्साबोक्शी रडला होता तो!

उमाः	पण काय हो, एक विचारू?

महेशः	काय ते?

उमाः	माझ्या मागोमाग लगोलग येण्याची घाई का केली तुम्ही?

महेशः	प्रेमाखातर, प्रेमासाठी, रामापाठी सीता वनवासी! वृंदेस्तव हरि स्मशानातला वृंदावनवासी तसंच!

उमाः म्हणजे?

महेशः अगं तुझ्याशिवाय मी जगूच शकलो नसतो. चंद्र तेथे चंद्रिका आणि शंभू तेथे अंबिका...

उमाः आणि?

महेशः आणि दुर्गा तेथे दुर्गेश आणि उमा तेथे महेश! (दोघेही हसतात.) तुझ्यामागे मी जिवंत राहिलो असतो तर तूच फक्त चितेत जळली असती पण मी जिवंतपणी जळत राहिलो असतो, रात्रंदिवस तुझ्या आठवणीत शेवटपर्यंत... शारीरिक यातना तर होत्याच त्यात मानसिक यातनांची अधिक भर पडली असती. सत्तरी ओलांडली मी! त्या निरंतर श्वासोच्छवासांना काही गणती? आणि अजून किती वर्षे स्पंदने चालवायला लावायची त्या बिचाऱ्या हृदयाला? आधीच बायपास होताना दुखावलं गेलं होतं बिचारं... डॉक्टरांच्या शस्त्रक्रियेने! सॅनिटोरियमला जाऊन प्रकृती जरा सुधारली होती पण त्या जन्याने आपल्या संसाराला लावलेली आग... आणि त्या आगीत आपला संसार भस्मसात होताना पहावं लागलं असतं. पोरांची बेईमानी आठवत वृद्धाश्रमात दुसऱ्यांनी टाकलेल्या तुकड्यांनी पोटाचं खळगं भरावं लागलं असतं. हं, तूच राहिली असती एकटी मागे तर!

उमाः तर काय?

महेशः स्त्रिया सोशिक असतात, केलं असतं तू सारं सहन.

उमाः नसतं झालं माझ्याच्याने सहन! नसती राहिली असती मी एकटी! तुम्ही गेल्यावर हातातला हा हिरवा चुडा दगडावर आपटून फोडावा लागला असता. कपाळावरचं कुंकू पुसावं लागलं असतं. आणि हे अभद्र वैधव्य मरणापर्यंत मला एका युगासारखं वाटलं असतं. कुणीही ढुंकून पाहिलं नसतं माझ्याकडे! काळजाचा दगड करावा लागला असता! मलाही या बंगल्याचा नरक पाहवला गेला नसता! कोमामध्ये गेलेल्या देहाच्या डोळयांच्या गारगोट्या होतात तशा माझ्या डोळयांच्या बुब्बुळाच्या गारगोट्या झाल्या असत्या! आणि जे काही घडून गेलं व जे काही घडत आहे ते पाहण्याचा व सहन करण्याचा प्रसंग माझ्यावर आला असता! आणि मला दिलेलं वचन?

महेशः कोणतं?

उमाः विसरलात का?! मी तुमच्याजवळ “मला अहेव मरण हवं असं वचन मागितलं होतं!”

महेशः होय! मग केली ना तुझी वचनपूर्ती?

उमाः होय केलीत. सौभाग्याचं लेणं सोबत घेऊन येता आलं. पण म्हणून काही तुम्हाला माझ्या मागे लगेच या असं वचन मागितलं नव्हतं!

महेशः त्या अर्धनारीनटेश्वरासारखं... तुझ्यात मी होतो आणि माझ्यात तू! मग कसं... !

उमाः तुम्ही तुमच्या मांडीवर माझं डोकं ठेवलंत आणि त्या निष्प्राण देहाकडे बघून... !

महेशः तेवढ्यात सूर्यपुत्र यमराजाचे दूत आले... त्यांनी काळी वस्त्रे परिधान केलेली होती. त्यांचे नेत्र रक्तासारखे लाल होते आणि त्यांचे रोम तरतरीत उभे असून मांड्या, नेत्र व नासिका कावळ्यासारखा होत्या.

उमाः आपल्या शरीरातून त्यांनी अंगठ्याएवढे प्राण काढले.

महेशः त्यामुळे आपली शरीरे श्वासोच्छ्वास शून्य, निस्तेज, चलनवलन क्रियारहित झाली. त्यानंतर त्यांनी आपल्याला हवेत तरंगत वर नेले... दक्षिण दिशेकडे...!

उमाः तेथे आपण अचानक पुतळ्यासारखे झालो... व पुन्हा खाली आलो. पण आपल्याला आपल्या शरीरात पुन्हा प्रवेश करता येईना...!

महेशः त्या निष्प्राण देहांपासून आपण लांब अंतरावर उभे होतो... अदृश्य! आणि बघत होतो आपल्या प्रेतांची अंत्येष्टी... अंत्यविधी! आपल्या दोघांच्या प्रेतांसाठी दोन तिरड्या सजविलेल्या होत्या.

उमाः आपली दोन्ही प्रेते आंब्याच्या झाडाखाली ठेवलेली होती. दिनकर, केदार, कंचन आणि निर्मला ह्यांच्या डोळयात अश्रू मावत नव्हते.

महेशः पण उमा मी यशवंताकडे पाहिलं, तो पारिजातकाच्या खोडाला डोकं टेकून हमसून हमसून रडत होता! आपल्या विषयीची आस्था, प्रेम, बंध मला तेथे दिसत होते.

उमाः होय ना! आपले सगे सोयरे लोकांच्या नजरेत यावं म्हणून नसलेले अश्रू पुसत होते. आणि तिकडे बघाना माझ्या प्रेताचे सचैल स्नान करून चंदनाची उटी लावत होते सर्वांगाला. केसांच्या भांगामधून कुंकू पेरत

होत्या सुवासिनी. मोठं कुंकू लावलं होतं कपाळावर! ओटीभरण करून ब्राम्हणांना सौभाग्यवाण देत होते. किती मनोरम दृश्य होतं माझ्या पाठवणीचं!

महेशः लाल पैठणीत लक्ष्मी दिसत होती जशी!

उमाः होय पण त्यांनी सोनाराला बोलावून माझ्या अंगावरचे सारे दागिने काढून घेतले! अगदी लंकेची पार्वती बनवून टाकली होती मला! एक मंगळसूत्र सोडून!

महेशः होय! कारण तुला माझ्यासोबत अग्नी प्रवेश करायचा होता. सती जायचं होतं! तेथे दागिन्यांचं काय काम? मला पण पांढरी वस्त्रे लेवविण्यात आली होती.

उमाः सारे जण अगदी रांगा लावून आपले पादप्रक्षालन करीत होते. त्यात आपल्याला जिवंतपणी लाथाडणारेही होते.

महेशः जिवंतपणी काट्यांनी बोचकारणारे आपल्या निर्जिव शरीरावर फुले वाहत होते. गळा दाबून मारणाऱ्यांचे हात सुगंधी फुलांच्या माळा गळ्यात घालीत होते. बाजूला काही लोक टाळ मृदुंगावर भजने म्हणत होती.

उमाः नंतर आपली प्रेते तिरड्यांवर ठेवली गेली, करकचून बांधली गेली. आपल्याच वृंदावनाच्या तुळशीची पाने तोंडात ठेवली गेली. सर्वांनी गणेशाची आरती म्हटली.

महेशः टाळमृदुंगाच्या गजरात जेव्हा खांदेकरांनी प्रेते उचलली तेव्हा स्त्रियांच्या रडारडीचा एकच हलकल्लोळ उडाला होता. जळत्या गोवरीचे मडके हातात घेऊन केदार पुढे चालला होता. यशवंत आणि दिनकरनेही खांदा

दिला होता. ज्याला आपल्या अंगाखांद्यावर खेळविले तो खांदा देऊन ऋणमुक्त होऊ पाहत होता. याचंही एक थोडंसं समाधान होतं!

उमाः ह्या प्रेतयात्रेत आपल्या प्रेतांवर रामनामाच्या घोषांत चुरमुऱ्यांचा आणि खोट्या छोट्या पै पैशांचा वर्षाव होत होता. पण काय हो आपण बांधून दिलेल्या गावाबाहेरच्या गणेश मंदिराच्या जवळ प्रेते खाली का ठेवली गेलीत?

महेशः खांदेकरांनी विसावा घ्यावा म्हणून. आणि त्याबरोबर एक छोटासा दगडही उचलून घेतला एकाने.

उमाः तो कशासाठी?

महेशः पाण्याने भरलेली मातीची घागर खांद्यावर घेतल्यावर चितेभोवती प्रदक्षिणा घालण्यापूर्वी त्या घागरीला छोटे छिद्र पाडण्यासाठी त्या दगडाचा उपयोग करतात.

उमाः खूप गर्दी होती आपल्या प्रेतयात्रेला! आपल्या साक्षीने! आपुले मरण पाहिले म्यां डोळा। तो जाहला सोहळा अनुपम्य।।

महेशः ती काही आपण खूप प्रसिद्ध व ख्यातनाम व्यक्ती म्हणून नव्हे किंवा आपल्यावरील प्रेमापोटीही नव्हे! तर एक शिष्टाचार म्हणून! फक्त एक माझा जिवलग मित्र यशवंत सोडून.

उमाः प्रेतयात्रेच्या मागोमाग आपणही पोहोचलो स्मशानात. तेथील वेदींवर आपल्या दोघांच्या चिता शेजारी शेजारी रचल्या गेलेल्या होत्या. मी पहिल्यांदाच स्मशानभूमी बघत होते.

महेशः आणि शेवटची! बघितलंय ना- जुनाट वाळक्या झाडांची खोडी आधी अंथरली होती.

उमाः	का?

महेशः	आपली जख्खड, चिवट, जुनाट शरीरे लवकर जळून खाक व्हावीत म्हणून. त्यावर आपली प्रेते ठेवली गेली आणि त्यावर झाडांच्या वाळक्या फांद्या रचल्या गेल्या. श्री भगवान कृष्णाने गीतेत सांगितले नाही का?

*उर्ध्वमूलमधः शाखम् अश्वथं प्राहुरव्ययम्।*

आपली शरीरे म्हणजे वाळकी झाडे! संसार वृक्ष! तो जळून खाक झाल्यावर परमात्म्यात विलिन होतो.

उमाः	त्या प्रेतांवरून अग्निला स्वाहा करण्यासाठी प्रिय असलेले घृत म्हणजे तूप टाकले गेले. केदारने भडाग्नि दिला दोन्ही प्रेतांना! वाळक्या लाकडांनी पेट घेतला. केदार व दिनकरने सचैल स्नान केले. दिनकरने मला तिलांजली दिली आणि केदारने तुम्हाला. दोघांनी पाण्याने भरलेल्या मातीच्या घागरी खांद्यावर घेतल्या. यशवंताने त्या घागरींना दगडाने छिद्रं पाडली. त्यातून वाहू लागलेल्या पाण्याच्या धारेसह त्यांनी आपल्या चितेला प्रदक्षिणा घातल्या आणि ते ओल्या वस्त्रांनी मागे न पाहता निघून गेले.

महेशः	तू ऐकलीत ना त्या लोकांनी नंतर कशी भाषणे केली ते? कुणी म्हणाले, “जन्म आणि मृत्यु अटळ आहे,” “मृत्यु येताना चाहूल सुद्धा लागू देत नाही,” “राजा असो वा रंक, त्याला कुणाची तमा नाही,” “श्री दामले व सौ. दामले बरोबरच स्वर्गवासी झाले, हा एक विचित्र योगायोगच

म्हणावा," "त्यांच्या मागे त्यांचे सुपुत्र दिनकर व त्यांची सून व नातू आणि विवाहित मुलगी आहे," "त्यांच्या मुलाने व सुनेने त्यांची अखेरपर्यंत खूप सेवा सुश्रुषा केली," "दामले कुटुंबावर जे दुःख कोसळले आहे त्यात आपण सहभागी होऊया," "त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून आपण सर्वजण दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून त्यांना श्रद्धांजली वाहू," इ. इ.

उमाः किती बडबडत होते इतरही!... गप्पा काय करीत होते... थट्टा मस्करी काय करीत होते... मोठमोठ्याने हसत काय होते!... वाटत होतं का कुणाला दुःख झालं असेल असं? आणि ती खोटी भाषणं करणाऱ्यांना तरी काही लाज लज्जा? काय मिळवतात ते ह्यातून?

महेशः आत्मप्रौढी मिरविणे, ख्याती, कीर्ती आणि प्रसिद्धी! ह्या साऱ्या गोष्टींना हपापलेले! दुसरं काय मिळवणार?

उमाः पण ज्यांना आपल्या घरातल्या गोष्टी माहित नव्हत्या तरी ते किती अवास्तव बडबडत होते!

महेशः शेक्सपिअरने म्हटले आहे, 'हॅव मोअर दॅन दाऊ शोएस्ट, स्पिक लेस दॅन दाऊ नोएस्ट!'

उमाः म्हणजे?

महेशः म्हणजे दिसते त्याहून अधिक असावे, कळते त्याहून कमी बकावे.

उमाः पण ह्या लोकांचं मात्र उलटंच! सुखात सहभागी होता येतं दुःखात नाही!

महेशः होय, पण ते निघून गेल्यावर खरोखरीची स्मशानशांतता पसरली होती.

उमाः फक्त आवाज येत होता तो आपल्या भडकलेल्या चितांचा!

महेशः लाकडांच्या फटीतून ज्वालांबरोबर ताड ताड आवाज करीत ठिणग्याही बाहेर येत होत्या.

उमाः कितीतरी वेळ स्तब्ध राहून आपण आपल्यालाच जळताना बघत होतो. आपल्या प्रेतांतून निघणाऱ्या अग्निशिखा एकमेकांना आलिंगन देत होत्या.

महेशः देवाने प्रदान केलेले रमणीय देह वृद्धापकाळाने जीर्ण होऊन अगणित व्याधींनी पछाडलेले होते. दोन नद्यांच्या संगमावर व जवळच असलेल्या शिवालयातील महेशाच्या पिंडीच्या साक्षीने त्यांची चितेत आहुती पडत होती. मोत्यासारख्या पाणीदार डोळयांच्या गारगोट्या झालेल्या होत्या, श्रवणाची शक्ती देणारे कर्ण बधिर होत चालले होते. हृदयाची स्पंदने अविरत चालावीत म्हणून श्वासोच्छवास करण्यात सतत कार्यरत असलेल्या नासिका आता सर्द होत चालल्या होत्या. सुखदुःखाने द्रवणाऱ्या हृदयांची स्पंदने मंद होऊ लागली होती. जगन्नाथाचे अस्तित्व असणारे हात दुबळे होऊन दुसऱ्याच्या आधाराची अपेक्षा करायला लागले होते. दाही दिशांना फिरविणारे पाय गलितगात्र होत होते. अशा त्या देहाचा रथ पार मोडकळीस आला होता व त्याचा सारथी तो मेंदूही आता बधिर होऊ लागला होता.

उमाः वाईट ह्याचं वाटत होतं की इतकी वर्षे आपण ह्या देहांच्या आश्रयाला राहत होतो, त्यांवर प्रेम करीत होतो, त्यांना सुंदर व निरोगी ठेवण्याचा

प्रयत्न करीत होतो ती गलितगात्र झालेली होती, ती आपल्या आत्म्यांची घरे मोडकळीस येऊन जळून खाक होत होती. मरणाआधी चिंतेने जाळलं आणि आता मरणानंतर चिता जाळतेय.

महेशः चिंता दहती जीवनं चिता दहति निर्जिवम्। आणि संतोष ह्याचा वाटत होता की ह्या देहांना जडलेल्या व्याधींमुळे होणाऱ्या असह्य दुःखद वेदना सहन करणं दुरापास्त झालं होतं, त्या सर्व जळून खाक होत आहेत, आता ह्या नरक यातनेतून सुटका झाली ह्याचा! आणि आता सारे काही वेदनाहीन झाले... हर्ष खेद ते मावळले, हास्य निमाले! अश्रू पळाले अशी अवस्था झाली आहे.

उमाः नंतर मी तुम्हाला म्हणाले होते, 'अहो बघितलंत का? सगळं काही खाक होऊन राख झाली.'

महेशः होय! आणि तो वारा मात्र अजूनही थांबत नव्हता. तो तुझ्या चितेतली राख माझ्या चितेत मिसळीत होता. तो धूमध्वज, वैश्वानर आपली आहुती घेऊन शांत झाला होता.

उमाः आणि ती राख, ते चिताभस्म वाऱ्यामुळे शिवालयाच्या पायरीला स्पर्श करीत होते. पण मला याचं आश्चर्य वाटतं की ह्या महेश्वराची मंदिरे स्मशानाजवळच का असतात?

महेशः उमानेही महेश्वराला असाच प्रश्न विचारला होता की, "भगवन्, स्वर्गामध्ये बहुत प्रकारची व सर्व गुणांनी मंडित अशी आपली मंदिरे

असताना, त्या सर्वांचा त्याग करून आपण स्मशानात रममाण असता, ते का? किती अमंगल वातावरण असते तेथे?

उमाः मग महेश्वरांनी काय उत्तर दिले?

महेशः महेश्वर म्हणाले, प्रिये गिरिजे, मी सदोदित एकसारखा अखिल पृथ्वी हिंडून शुद्ध असे स्थळ शोधीत असतो, परंतु मला स्मशानापेक्षा अधिक शुद्ध असे स्थळ या जगात अद्याप सापडले नाही! यास्तव, सर्व निवासस्थानात स्मशानामध्ये माझे मन रमले!

उमाः आणि आपण येथे रमलोत! आपल्याजवळ फार वेळ नाही.

महेशः होय ना! निदान यशवंताची एकदाची शेवटची भेट झाली असती तरी बरं झालं असतं.

उमाः खरंच! आपण गेल्यानंतर ह्या बंगल्यात काय काय घडलं हे जाणून घ्यायची फार इच्छा होती.

महेशः आपण वाट पाहू. तो नक्की येईल. आता आपण इच्छाधारी झाल्यामुळे आपल्या इच्छेप्रमाणेच होणार! (तेवढ्यात गणेशमंदिरातील घंटा ऐकू येते...व दाराचे कुलूप व दार उघडण्याचा आवाज ऐकू येतो. पाठोपाठ यशवंत येतो व हॉलमधील सर्व लाईट्स ऑन करतो.)

यशवंतः (स्वतःशीच पुटपुटत) कुठे ठेवल्या असतील बरे मी त्या फाईल्स? (उमा व महेशकडे पाहून एकदम दचकतो.... व घाबरतो) म....म.....हे....श? व.....व.....व...हिनी? त....त....त...तुम्ही?

महेशः घाबरु नको यशवंता! आम्ही दोघेही तुझीच वाट बघत होतो...(यशवंत खिशातून रुमाल काढून कपाळावरचा घाम पुसतो.) शांत रहा!

यशवंतः प...प...पण मी तुमच्या प्रेतांना चितेत जळताना बघितलं होतं. अस्थीविसर्जनही करुन आलो तुमच्या! गंगेत!

महेशः ते सारं आम्हाला ठाऊक आहे.

यशवंतः (डोळे विस्फारुन) काय?

महेशः होय, पण ह्या वास्तुत बरीच वर्षे वास्तव्य केले ना! त्यामुळे आत्मे घुटमळताहेत आमचे येथे!

उमाः होय भावोजी, आम्हीही आमचे अंत्यसंस्कार स्वतःच्या डोळयांनी बघितलेत. पण ते यमदूत परत आले आणि आमच्या प्राणांना घेऊन त्यांनी पुन्हा दक्षिणेकडे तोंड करुन आकाशमार्गे प्रयाण केले.

महेशः सूर्यपुत्र-विश्वकर्माचे जावई-संजनाचे पती यमराजाचे सुद्धा आम्हाला दर्शन घडले. निळी कांती, सोन्याचा मुकूट, चार हात, हातात पाश व दंड – रेड्यावर आरूढ!

उमाः ब्रम्हदेवाचे पुत्र- यमाचे जावई व इरावतीचे पती चित्रगुप्त ह्यांनी भली मोठी थोरली नोंदवही उघडली व आमच्या पाप-पुण्याचा हिशोब केला व म्हणाले, “तुम्हाला स्वर्गप्राप्ती झाली आहे. तरीपण आधी नरक हा सर्वांना बघावाच लागतो.”

महेशः असे म्हणून चित्रगुप्ताने एका देवदूताकडे बोट दाखवित म्हटले, ‘देवांनी ह्या देवदूतास तुम्हाला सोबत घेऊन जाण्याची आज्ञा केली आहे, त्याच्याबरोबर जा.’

उमाः देवदूत पुढे चालत होता व त्याच्या मागून आम्ही!

महेशः ज्या रस्त्याने आम्ही जात होतो, तो रस्ता अपवित्र व अवघड असून फक्त पातकी जनांच्याच वहिवाटीचा होता. तो आधीच भयंकर असून अंधःकाराने व्याप्त होता आणि केश व शेवाल यांचा त्यावर खच पडला होता तो निराळाच!

उमाः घोर रुपधारी उग्र प्रकृतीचे भयानक यमदूत कितीतरी प्राण्यांना मारीत आणि पीडा देत होते. त्यामुळे ते प्राणी जोरजारात किंकाळ्या फोडीत होते. कित्येकांना किडे खात होते आणि कित्येकांना भयंकर कुत्रे बोचकारीत होते. ते सर्वच्या सर्व दुःखी होऊन कानांना त्रस्त करणारे भयंकर चीत्कार करीत होते. मी ह्यांचा हात धरला, कारण मला खूप भिती वाटत होती.

महेशः कोणाला वारंवार रक्ताने भरलेली वैतरणानदी पार करण्यासाठी विवश करण्यात येत होते, तर कोणाला तापलेल्या वाळूवर वारंवार चालवून संतप्त करण्यात येत होते. काही पापींना असिपत्रवनात ज्याची पाने तलवारीच्या धारेसारखी तीक्ष्ण होती, तेथे – विदीर्ण करण्यात येत होते. कोणाला रौरव नरकात ढकलण्यात येत होते. कित्येकांना खाऱ्या पाण्याच्या नदीत बुचकळण्यात येत होते आणि काहींना सुऱ्यांच्या धारेवरून पळविले जात होते.

उमाः	कित्येक प्राणी भूक तहानेने तडफडत होते आणि थोड्याशा पाण्याची याचना करीत होते. कोणी प्रेतासारखे कंगाल, दीन, दुर्बल, उदास आणि विस्कटलेल्या केसांनी युक्त दिसत होते.

महेशः	कितीतरी प्राणी आपल्या अंगांना मैला आणि चिखल लावलेल्या दयनीय आणि रूक्ष शरीराने चहुकडे धावत होते.

उमाः	अपवित्र पदार्थांचे दुर्गंध सुटले होते. रक्ता-मांसाचा चिखल पसरला होता. जिकडे तिकडे प्रेतेच प्रेते पडली होती. सभोवार प्रदीप्त अग्नीचा घेरा पडला होते. भावोजी, तेवढ्यात आम्हाला जन्याचा आवाज ऐकू आला.

महेशः	आम्ही थोडे थांबलो. ते पाहून देवदूत म्हणाला, 'पाहिलंत ह्या पाप्याला उलटा टांगलेला आहे!'

उमाः	आम्ही पाहिलं तर त्याला खरोखर उलटा टांगलेला होता आणि खालून आगीच्या ज्वाळा उफाळत होत्या.

यशवंतः	(आश्चर्याने) मग?

महेशः	आम्ही देवदूताकडे प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले, तेव्हा तो म्हणाला, 'ह्या पाप्याने तुलसीवृंदावन मोडले, म्हणून त्याला कुंभीपाक नरकात अशा यातना भोगाव्या लागत आहेत. कुंभार कच्च्या मडक्यांना कसा आवात भाजतो तसे ह्याला भाजले जात आहे.'

उमाः मी ह्यांना म्हणाले, ह्या पाप्यास योग्य तीच शिक्षा मिळत आहे, त्याच्याकडे बघू सुद्धा नका.

यशवंतः जनार्दनच्या मागे पोलीस लागले होते, ह्या पाठलागात त्याचा ॲक्सिडेंट झाला व तेथेच तो मृत्यूमुखी पडला....(आश्चर्याने) पण लगेच तो नरकात गेलाही?

महेशः यमदरबारी काळ फार शीघ्र असतो, यशवंत!

उमाः नंतर देवदूत मागे फिरला आणि म्हणाला, ‘तुम्हाला येथपर्यंतच यावयाचे होते. आता देवांच्या आज्ञेप्रमाणे मला आपणास घेऊन परत गेले पाहिजे.

महेशः त्या नरकयात्रेच्या दुर्गंधाने आमची मस्तके अगदी फिरुन गेली होती. देवदूताच्या बोलण्याने आम्हाला हायसे वाटले.

उमाः आम्ही त्वरित देवदूताबरोबर स्वर्गात गेलो.

महेशः त्याच्या बरोबर स्वर्गात नेताना देवदूत आम्हाला म्हणाला, ‘शांती, दया, सत्य, दानधर्म आणि पुण्यकर्म ह्यामुळे तुम्हाला स्वर्गप्राप्ती होणार आहे.

उमाः आम्ही स्वर्गलोकी पोहोचल्यावर....... !

यशवंतः (मोठ्या जिज्ञासेने) मला सांगा ना, स्वर्गलोकी तुम्ही काय पाहिले ते…! कसा दिसतो स्वर्ग? काय काय आहे तेथे?

महेशः प्रथमतः आम्हा दोघांना दिव्य, ज्योतिर्मय शरीरे मिळाली.

उमाः पुण्यकर्मांच्या प्रभावाने आम्हाला अतिशय सुंदर घर रहायला मिळाले जे संगीत आणि वाद्यांच्या मनोहर ध्वनीने भरलेले होते. वृद्धाश्रमासारखे नाही बरं का भावोजी! निवासस्थान म्हणजे देवभवन!

महेशः स्वर्ग म्हणजे देवराज इंद्राची अमरावती. तेथील नंदनवन, इंद्राचा ऐरावत, उच्चैश्रवा नावाचा घोडा, त्याचे धनुष्य-इंद्रधनुष्य सारं पाहिलं. त्याच्या पुढे नृत्य करणाऱ्या लावण्यवती अप्सरा रंभा, मेनका, उर्वशी अहाहा! काय त्यांचे सौंदर्य! (उमा त्याना नजरेने दाबते.)

उमाः तेथे सहासष्ट हजार मैल उंच सोन्याचा मेरू पर्वत असून तेथे देवांची नंदनवनादिक पवित्र उपवने, पुण्यकर्म करणाऱ्या लोकांची विहार स्थाने आहेत.

महेशः त्याठिकाणी क्षुधा, तृषा, ग्लानी, शीत, उष्ण, भिती ही नसून बिभत्स व अशुभ असेही काही नाही. अरे यशवंता त्याठिकाणी चोहीकडे चित्ताकर्षक सुगंध, सुखकारक स्पर्श असलेले पदार्थ आणि श्रवणेंद्रिय व अंतःकरणास आकर्षित करून घेणारे शब्द असून शोक, जरा, सायास अथवा विलाप ही मुळीच नाहीत.

उमाः घर्म, दुर्गंध आणि मूत्रपुरिष ही नसतात. वस्त्रांना मळाचा संपर्क होत नाही. त्यांच्या दिव्यगंध संपन्न पुष्पमाळा कधीही म्लान होत नाहीत. पवित्र गंधयुक्त सुखस्पर्श व सुखद असा देवलोकीचा वायु वाहत असतो.

यशवंतः किती सुंदर! मला पण न्या ना तुमच्याबरोबर स्वर्गात!

महेशः अरे पण तुला त्यासाठी आधी खूप पुण्यसंचय करावा लागेल.

यशवंतः मग?

महेशः मग मरावे लागेल!

यशवंतः (आश्चर्याने व दुःखाने) काय?

महेशः अरे मग मेल्याशिवाय का स्वर्ग दिसेल? बरं आम्ही तुझी शिफारस केली असती, पण ह्या गोष्टी स्वर्गात चालत नाहीत.

उमाः ऐका ना भाओजी, आम्ही चित्रगुप्ताकडे एक विनंती केली होती, की आम्हाला एकदा फक्त एकदा पृथ्वीवर जाऊन येऊ द्या.

महेशः अरे यशवंता तो देवदूत काही वेळानंतर आमच्या निवासस्थानी प्रगट झाला आणि म्हणाला की तुमची विनंती मान्य झाली असून तुम्हाला फक्त एक वेळ पृथ्वीवर जाऊन उजेडायच्या आत परत यायची आज्ञा केली गेली आहे.

उमाः आम्हाला खूप आनंद झाला आणि आम्ही येथे आलो.

यशवंतः पण दाराला तर भलं मोठं कुलूप लावलेलं होतं!

महेशः आमच्यासाठी कुलुपं, दारं, भिंती ह्यांना काहीच अस्तित्व नाही. (यशवंत अचंबित होतो.)

उमाः बरं, भाओजी आम्हाला हे सांगा की हा बंगला गहाण होता व ज्याच्याकडे गहाण होता तो दुसऱ्याच दिवशी ताबा घेणार होता व आमची रवानगी वृद्धाश्रमात होणार होती! मग येथे हे आमचे फोटो कसे?

महेशः आणि आमच्या मागे काय काय धिंगाणा घातला जन्याने?

उमाः त्याला त्याच्या पापाची शिक्षा मिळाली तरीही जेव्हा त्याला आम्ही नरकाच्या आगीत होरपळताना बघितलं तेव्हा आम्हाला त्याची कीव आली होती.

यशवंतः पण त्याने तर तुमचा बदला घेतला. तुमच्या वैऱ्यासारखा वागून तुमचं घर उद्ध्वस्त केलं. तुमच्यापासून तुमच्या पोटच्या पोरांची ताटातूट केली आणि त्यांना देशोधडीस लावलं, वाताहत केली त्यांची, तरीही त्याची कीव आली तुम्हाला?

महेशः 'मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम्।' – वैर जीवनकालापर्यंतच राहते. मृत्युनंतर त्या वैराचा अंत होतो. – अशी प्रसिद्ध उक्ती आहे. तोही मृत् पावला आणि आम्हीही!

उमाः म्हणून आम्ही त्याला माफ केलं!

यशवंतः तुम्ही जर त्या जन्याला- बदमाशाला, सैतानाला, राक्षसाला माफ केलं तर मग तुम्ही निर्मला, दिनकर व केदारलाही माफ करावं अशी माझी विनवणी आहे. (तो हात जोडतो.)

महेशः अरे कसली विनवणी करतोस यशवंता? अरे तो जन्या परका होता, कृतघ्न होता तरी त्याला आम्ही माफ केलं! मग ही तर आमची लेकरं आहेत.

उमाः पुत्राचे सहस्त्र अपराध। माता काय मानी तयांचा खेद?

यशवंतः म्हणजे तुम्ही दोघांनी त्यांना माफ केलं?

महेशः खचितच!

यशवंतः मग त्यांच्या बाबतीत काय घडलं ते सांगायलाच हवं तुम्हाला.

उमाः (काळजीने) भावोजी! ठिक तर आहेत ना ते? काही संकटात तर नाहीत ना आमची बाळं?

महेशः सांग बाबा लवकर, काय झालं ते! नीच लोकांच्या सहवासात माणूस संकटात सापडतोच!

उमाः सांगा ना भावोजी काय झालं ते?

यशवंतः तुमच्या समोरच येथून गेल्यानंतर जनार्दन पळून गेला होता. पण पोलिसांच्या पाठलागात त्याचा ऍक्सिडेंट होऊन तो मृत्यूमुखी पडला हे मी तुम्हाला सांगितलेच आहे. त्याच्या गाडीतून तुमचे दागिने, मृत्यूपत्र व पैसे मिळाले. मात्र त्याने दिनूला आणि निर्मलेला चांगलेच फसवले!

महेशः आणखी काय काय कारस्थानं केली त्याने?

यशवंतः जो फ्लॅट त्याने बंगला गहाण ठेवून घेतला होता तो थ्री रूम किचन व पन्नास लाखांचा नसून फक्त वीस लाखांचा वन रूम किचन होता. तोही रिसेलचा!

उमाः मग?

यशवंतः मग काय? तेथे फक्त केदार आणि त्याची बायकोच राहू शकत होती. आणि त्याने दुसरा डाव असा खेळला होता की तो फ्लॅट त्याने केदारच्या बायकोच्या नावाने केला होता व ह्या कारस्थानासाठी त्याने गोडीगुलाबीने केदारच्या सासऱ्याकडूनही काही पैसे उकळले.

महेशः मग?

यशवंतः केदारच्या लग्नाला तुमचा सर्वांचा विरोध! त्यामुळे तिने चांगलेच उट्टे काढले.

उमाः काय केलं त्या उद्धट कार्टीने?

यशवंतः तिने दिनू आणि निर्मलेला दुसरं घर बघायला सांगितलं!

महेशः मग कुठं गेली ही पोरं?

यशवंतः तुमच्या दोघांसाठी ज्या वृद्धाश्रमात जागा बुक केल्या होत्या तेथे जा असे केदारनेच त्यांना सांगितले.

उमाः मग ही दीनवाणी बेघर पोरं तेथे गेलीत? वृद्धाश्रमात?

यशवंतः होय. फक्त दोन दिवसांसाठी नंतर त्यांना दुसरीकडे निवारा शोधावा लागेल. जनार्दन जे पैसे व दागिने घेऊन पळाला होता ते मिळाले २५/३० लाख, शिवाय तुमच्या तळघरातून चोरलेले १० लाख.

उमाः पण हा बंगला अजून गहाणच आहे?

यशवंतः नाही! आनंदाची गोष्ट म्हणजे मी बंगला परवाच सोडविला.

महेशः पण एवढे पैसे? बंगला तर पन्नास लाखाला गहाण होता ना?

यशवंतः सांगतो ना! खरी गंमत सांगितलीच नाही मी अजून!

उमाः काय ती?

यशवंतः महेश तुझी पाचही पुस्तके प्रकाशकाने घेतलीत..... आणि ती प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

महेशः (आश्चर्याने) होय?

यशवंतः तुझी ती कादंबरी 'दायित्व' छापून झाल्याबरोबर हजार प्रती खपल्या व दुसरी आवृत्ती तयार होते आहे. आता ही तुझी कादंबरी खूपच गाजते आहे. शिवाय, काय ना लोकांना दिवंगत लेखकाबद्दल विशेष आत्मियता व उत्सुकता वाटते.

महेशः खरे आहे!

यशवंतः प्रकाशक आणि वितरक ह्यांनी सारे मिळून १५ लाख दिलेत. त्यामुळे मी बंगला सोडवू शकलो आणि तो पूर्ववत ठेवू शकलो. तू मृत्यूपत्रात लिहिल्याप्रमाणे सर्व पुस्तकांचे सर्व हक्क दिनकर व निर्मलाला दिले.

उमाः पूर्वीपेक्षाही नूतन वाटतोय आता भावोजी हा बंगला!

महेशः यशवंता!....(सद्गदित होत) तू खरा जागलास दोस्तीला. प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षा मदतीचे हात अधिक पवित्र असतात. तुझे उपकार मानावे तेवढे थोडेच..... !

यशवंतः मला लाजवू नकोस!

महेशः	बरं माझ्यावर अजून एक उपकार करशील?

यशवंतः	सांग ना!

महेशः	बंगला ऋणमुक्त झाला. खूप चांगले झाले. आता तू माझ्या बाळांना- माझ्या दिनूला आणि निमूला आत्ताच्या आत्ता त्वरित वृद्धाश्रमातून येथे घेऊन येशील? आम्हाला त्यांना भेटायचंय, बघायचंय!

उमाः	होय भावोजी, त्यांना येथे आणा! आमच्या लेकरांना नाही राहू देणार आम्ही वृद्धाश्रमात!

यशवंतः	कसं माझ्या मनातलं बोललात! आता खरं माझं दायित्व पूर्ण होणार!

महेशः	पण आपल्या ह्या अद्भूत भेटीबद्दल त्यांना तू काहीही सांगू नकोस! तू लगेचच वृद्धाश्रमात जा आणि त्यांना पटकन घेऊन ये.....उशीर लावू नकोस. आमच्याजवळ वेळ खूप कमी आहे.

उमाः	होय भावोजी, उजाडायच्या आत आम्हाला परतायला हवं!

यशवंतः	मी आपल्या ह्या अपूर्व भेटीबद्दल दिनू आणि निर्मलाला काहीही सांगणार नाही. लगेच येतो त्यांना घेऊन येथे.

महेशः	कारण, यशवंता ही आपली व त्यांची शेवटची भेट राहील.

यशवंतः	समजलो मी! ठीक आहे, येतो मी. (जातो.)

उमाः	(खिडकीतून बाहेर बघत) अहो बघा ना! (महेशही खिडकीतून बाहेर डोकावतो.) रजनीगंधाची फुले मिटायला लागलीत आणि पारिजातकाच्या कळया उमलायला लागल्यात!

महेशः	होय ना, पूर्व दिशा अरूणवर्णी होऊन लाल दिसू लागली. सूर्याची चाहूल लागताच आकाशातील एक-एक तारका नाहीशी होऊ लागली. जणूकाही आकाशातील पारिजातकाचं एकएक फूलच गळून पडत आहे. पानाआड एखादी कळी राहून जावी तशी एखादीच चांदणी लुकलुकतांना दिसत आहे.

उमाः	झुंजूमुंजू व्हायला लागलंय! ही पोरं लवकर येतील तर बरं!

(तेवढ्यात गणपती मंदिरातील घंटा वाजते व निर्मलेच्या आवाजातील श्री गणेशाचे स्तोत्र ऐकू येते व काही क्षणातच दिनकर, निर्मला व यशवंत आत येतात. आत आल्याबरोबर दिनकर व निर्मलाचे लक्ष उमा व महेशकडे न जाता हार घातलेल्या फोटोंकडे जाते. दोघेही फोटोंपुढे हात जोडून उभे राहतात व सद्गदित अंतःकरणाने म्हणतात)

दिनकरः	आई, बाबा आम्हाला क्षमा करा!

निर्मलाः	आम्ही तुम्हाला खूप त्रास दिला!

दिनकरः	त्याचीच शिक्षा देवाने दिली! आम्ही फार चुका केल्या. जनूच्या नादी लागून तुमचा वडिलोपार्जित, प्रिय व बहुमूल्य बंगला गहाण ठेवला.

निर्मलाः	हो ना! ज्यात तुमच्या लहानपणापासून ते वृद्धापकाळापर्यंतच्या साऱ्या प्रिय स्मृती होत्या... सुखद स्मृती होत्या!

दिनकरः	त्यांची आम्ही राखरांगोळी केली. निर्मला आपण त्यांचे फार मोठे अपराधी आहोत.

निर्मलाः	जेव्हा त्यांना आपल्या आधाराची गरज होती तेव्हा आपण त्या जन्याच्या नादी लागून वृद्धाश्रमात त्यांची पाठवणी करणार होतो.

दिनकरः किती नामुष्कीची गोष्ट आहे ही! समाजातील त्यांचा आदर, त्यांची प्रतिष्ठा आपण सारी धुळीस मिळविली असती!

निर्मलाः हो ना! एवढ्या ख्यातनाम प्राध्यापकास त्यांच्या उतारवयात वृद्धाश्रमात पाठविणारा असा स्वार्थी, लबाड, बदमाश मुलगा कसा त्यांच्या पोटी जन्माला आला? आणि त्यांची ती सून? त्याच हलकट, नीच, नालायकाच्या बायकोने त्याच्या आईवडिलांविरूद्ध त्याचे कान भरले असतील! बाई असून किती पाषाणहृदयी आहे हो ही!

दिनकरः पण आपल्या आईबाबांनी तेही दोष आपल्याला लागू दिले नाहीत. आपल्या छळवणुकीचा, उर्मटपणाचा, नादानपणाचा लोकांना पत्ता लागू नये म्हणून त्यांनी हताश निराश होऊन हे जगच सोडले. (रडतो.) आई! तुझ्या दुधाला जागलो नाही मी!... बाबा तुमचं रक्त उलटलं तुमच्यावर!

निर्मलाः माझा पाठचा भाऊ तो जन्या! त्याच्या भूलथापांना मी भुलले! बाबांनी व आईंनी त्या भामट्याला बरोबर ओळखले होते. माझी पाठही वैरी झाली आणि पोटही!

दिनकरः होय! निर्मला मी माझ्या आईबाबांशी कृतघ्न झालो. म्हणून तुला आणि मला केदारने बाहेर काढलं!

निर्मलाः मी त्याला जेव्हा म्हटले की, अरे केदू तू आमचा मुलगा. आम्ही तुझे आईवडिल. अरे ह्याची तरी जाणीव ठेव तेव्हा तो जिव्हारी लागेल असे पण अगदी खरे बोलला!

दिनकरः होय ना, तो म्हणाला की “तुम्हाला असं बोलण्याचा अधिकारच नाही मुळी... कारण तुम्ही तरी कोठे शहाजोग आहात तुमचा कित्ता

गिरवायला? तुम्हीही तुमच्या आईवडिलांची किंमत कवडीमोलच केलीत ना? हाकलून लावलं होतंत ना त्यांना वृद्धाश्रमात? मातापित्यांशी कठोर वागण्याचा वारसा मी तुमच्याकडूनच घेतला!

निर्मलाः खुनी कैद्यांसारख्या आपण खाली माना घातल्या होत्या!

दिनकरः खरंच आपण आपल्या आईबाबांच्या मायेचा, प्रेमाचा, वात्सल्याचा खून केला.

निर्मलाः क्षमा मागण्याचीही पात्रता नाही आमची!

दिनकरः दोघांनी एकमेकांवरही आयुष्यभर खूप प्रेम केलं... अगदी अखेरपर्यंत... मरेपर्यंत!

निर्मलाः मृत्यूपर्यंत त्यांनी एकमेकांची संगत, सोबत सोडली नाही.

दिनकरः आई बाबा आम्ही तरीही निर्लज्जपणे तुमची माफी मागतो! आम्हाला माफ करा! (दोघे मोठ्याने हुंदके देत रडतात.)

उमा-महेशः माफ केलं तुम्हाला आम्ही! पोरांनो माफ केलं! (दिनकर व निर्मला दचकून मागे बघतात....तेव्हा सोफ्यामागे खिडकीजवळ मंद प्रकाशात पांढऱ्या शुभ्र वेशातील उमा व महेश त्यांना दिसतात. ते खूप घाबरतात.)

महेशः दिनू, निर्मला भिऊ नका बाळांनो! आम्ही तुम्हाला भेटायला आलो आहोत.

दिनकरः (यशवंताकडे बघून) पण....तुम्ही तर.... !

उमाः होय! आम्ही स्वर्गवासी झालोत! पण आमचे आत्मे तुमच्याभोवती, बंगल्याभोवती घुटमळत होते....(दिनकर व निर्मला दोघेही त्यांच्याजवळ जाऊन वाकून नमस्कार करतात.)

निर्मलाः बाबा, आई!....

उमाः बोल बेटा. आम्ही सारं काही ऐकलं.

महेशः यशवंताने हा बंगला सोडवून घेतला आहेच. जन्या गेला त्याबरोबर बंगल्यावरचं सैतानाचं सावटही गेलं!....पीडा गेली!

उमाः दिनू, निमू आपला हा बंगला पुन्हा शुचिर्भूत झाला! आता तुम्ही येथेच राहणार!

दिनकरः काय? (दिनकर व निर्मला एकमेकांकडे बघतात.)

महेशः अरे आपला एवढा सोन्यासारखा बंगला सोडून आम्ही तुम्हाला वृद्धाश्रमात जाऊ देऊ?

उमाः आता हा बंगला तुमच्या हवाली केला. ह्याची काळजी घ्या.

महेशः ही वास्तु खरोखर मंगलकारक आहे. आमचे तुमचे संसार फुलले येथे.

उमाः हेरंब नाव उगीचच ठेवलं नाही आपल्या आजोबा-पणजोबांनी. त्यानेच सुखदुःखात आपणा सर्वांचं रक्षण केलं.

महेशः हा बंगला शुभंकर आहे.

उमाः गणेश मंदिरात नेहमी चंदन धुपाचा घमघमाट हवा. नंदादीपाने मंदिर सदा लखलखते ठेवा. निर्मला रोज सकाळी तुळशीला पाणी घालीत जा. तुलसीस घालिती उदक, त्या प्राणीयासी कैसे दुःख?

महेशः जन्याच्या रूपाने कलिच शिरला होता आपल्या बंगल्यात आणि तुमच्या अंगातही! तो आता गेला....पण तसं काही घडू नये म्हणून गणेशाची निरंतर पूजा करीत जा. पण एक गोष्ट ध्यानात ठेवा, हे कलियुग आहे. जसा जसा त्याचा प्रभाव वाढेल तसा तसा माणूस सदाचार आणि सुस्वभावाचा त्याग करुन असत्य भाषण करु लागेल. लोकांचे बल, आयुष्य, वीर्य, पराक्रम, धैर्य व सामर्थ्य यांचा उत्तरोत्तर ऱ्हास होत जाईल. अध्ययन व सात्विक विचार सोडून लोकं दुराचार करु लागतील. लोकं नास्तिक, क्रूर व कठोर स्वभावाचे होतील. दुष्काळ येईल. त्यामुळे धन धान्ये पिकणार नाही. त्यामुळे दारिद्र्य येऊन लोकं दंगे-धोपे व हिंसाचार करतील.

उमाः ह्या साऱ्या गोष्टींची तुम्हाला आच लागू नये, कलियुगाची झळ बसू नये म्हणून गणेशाचे तर स्मरण कराच पण त्याचबरोबर कलिमलदहन लक्ष्मी नारायणाचेही स्मरण करीत जा.

महेशः त्यावेळी मग कालाच्या प्रेरणेने महाबुद्धिमान, अत्यंत उत्साह संपन्न आणि महापराक्रमी अशा विष्णु यशा नामक ब्राम्हणाच्या रुपाने ब्राम्हणांचे वास्तव्य असलेल्या शंभल नामक उत्कृष्ट गावामध्ये कल्कीचा अवतार होईल. त्याच्या मनात येताच सर्व प्रकारची वाहने, आयुधे,

योद्धे, शस्त्रे आणि कवचे ही त्याजपाशी येतील. मग सर्व काही मंगल होईल.

उमाः आम्ही चित्रगुप्ताकडून खास विनवणी करुन तुमच्या ह्या अखेरच्या भेटीसाठी मुद्दाम आले होतो. आता आमची जायची वेळ झाली.

महेशः सुखाने रहा! सुखाने नांदा!

उमाः (खिडकीतून बाहेर व वर बघत) पूर्व दिशा अरुणवर्णी होऊन लालसर दिसू लागली आहे. एक तारका दिसत होती लुकलुकणारी, तीही नाहीशी झाली!

महेशः पारिजातकांच्या फुलांचा सडा जमिनीवर पडला आहे. जणूकाही आकाशातील तारकाच खाली गळून पडल्या आहेत.

उमाः उजाडायच्या आत आपल्याला निघायला हवं!

महेशः होय उमा चल. (महेश उमाचा हात धरतो. त्यांच्या आकृत्या हळूहळू अस्पष्ट होत जातात....... तेव्हा दिनकर व निर्मला आई!!.... बाबा!!! म्हणून जोरात हंबरडा फोडतात व दोघेही त्या दिशेने जमिनीला डोके टेकतात.... रंगमंचावरचा प्रकाश हळूहळू मंद होत जातो.... तशी मंद स्वरात उमा आणि महेश यांच्या मिसळलेल्या शब्दांत पुढील ओळी ऐकू येतात......

सुखी रहा मुलांनो नका डोळयात आणू पाणी

दायित्व पूर्ण झाले संपली एक कहाणी

जातो आम्ही आता येणार ना फिरूनी

निरोप द्या बाळांनो.... संपली एक कहाणी

....संपली एक कहाणी....

(पडदा पडतो.)

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा  .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.